ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४५ अंक १२ पाने ५६ जुलै २०१८ मूल्य २२रु.

## नवभारत निर्माण









किफायतशीर घरे : कुटुंबांना निवारा
हरदीप एस. पुरी

पेयजल पुरवठा, स्वच्छतेबाबत महाराष्ट्राची आघाडी
बबनराव लोणीकर

उर्जेची प्रकाशवाट....
चंद्रशेखर बावनकुळे

(विशेष लेख)
युवक आणि समुदायाप्रती प्रतिबद्धता
अमरेंद्र कुमार दुबे

(फोकस)
शेतकऱ्यांचे कल्याण: बांधिलकीसह प्राधान्य
डॉ. जगदीप सक्सेना

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

## वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | २२.०० रुपये |
| विशेषांक | ३०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | २३०.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | ४३०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | ६१०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी. किंवा www.bharatkosh.gov.in/product
येथे ऑनलाईन भरावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव, पत्ता व संपर्क क्रमांक कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४५ ❖ ❖ अंक १२ ❖ ❖ जुलै २०१८ ❖ ❖ मूल्य २२ रु. ❖

मुख्य संपादक
**दिपीका कच्छल**
संपादक
**उमेश उजगरे**
मुखपृष्ठ
**गजानन धोपे**

## सूचना

**'योजना'** हे निती आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाश विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. योजना मासिकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मते-विचार त्या-त्या लेखकांची असतात. सरकार किंवा लेखक कार्यरत असलेल्या संस्था त्या मतांशी/विचारांशी सहमत असतीलच असे नव्हे. लेखांमध्ये वापरण्यात आलेले नकाशे/ध्वज हे केवळ प्रातिनिधिक आहेत. राजकीय नकाशा तसेच भारताचा अथवा अन्य देशाचा राष्ट्रध्वज म्हणून ते न्यायालयीन बाबींसाठी ग्राह्य नसतील. स्पर्धा परीक्षा पुस्तक प्रकाशक तसेच मार्गदर्शक संस्थाच्या योजना मासिकातील जाहिरातीमध्ये केलेल्या दाव्यांची वाचकांनी स्वत: खात्री करून घ्यावी. अशा जाहिरातींमधील मजकुराबाबत 'योजना' कुठल्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. योजना मासिकातील मजकुराचे लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत:पुन:प्रकाशन किंवा पुन: प्रसारण तसेच 'योजना' मासिकाच्या नावाचा वापर व्यावसायिक कारणांसाठी करण्यास मनाई आहे.

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| किफायतशीर घरे : कुटुंबांना निवारा | हरदीप एस. पुरी | ५ |
| माफक किमतीत सर्वांसाठी घरे | डॉ. रणजीत मेहता | ८ |
| शेतकऱ्यांचे कल्याण : बांधिलकीसह प्राधान्य (फोकस) | डॉ. जगदीप सक्सेना | १४ |
| पेयजल पुरवठा, स्वच्छतेबाबत महाराष्ट्राची आघाडी | बबनराव लोणीकर | १९ |
| १००० दिवसांत गावांच्या १०० टक्के विद्युतीकरणाचा प्रवास | ए. के. भल्ला | २७ |
| युवक आणि समुदायाप्रती प्रतिबद्धता (विशेष लेख) | अमरेंद्र कुमार दुबे | ३१ |
| उर्जेची प्रकाशवाट.... | चंद्रशेखर बावनकुळे | ३८ |
| नवीकरणीय ऊर्जा विस्तार कार्यक्रम २०२२ | मनोज कुमार<br>डॉ. अभिनव त्रिवेदी | ४३ |
| फरार आर्थिक गुन्हेगार विधेयक २०१८ | डॉ. सीएमए व्ही. मुरली | ४७ |
| उडान योजनेचे यश व पुढील आव्हाने | सिंधू भट्टाचार्य | ५० |


योजना मासिकासाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'बी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. दुरध्वनी - योजना -०२२-२७५६६५८२
email - myojanadpd@gmail.com

ISSN-0971-8397
विकास समर्पित मासिक
योजना

# विकासाचा मार्ग

विकास या शब्दाचा अर्थ व्यक्तीसापेक्ष आहे. प्रत्येक व्यकीनुसार विकास या शब्दाचा अर्थ बदलतो. काही जणांसाठी विकास म्हणजे अन्न,वस्त्र आणि निवाऱ्याची सोय. तर काही जणांसाठी अन्न म्हणजे अन्नसुरक्षा, वस्त्र म्हणजे स्वत:ला व्यक्त करण्याची संधी आणि घर म्हणजे डोक्यावरील फक्त छप्पर नव्हे, त्यांना घरात जीम,प्ले एरिया अशा सोयी सुविधांनी असलेले घर हवे असते.

अन्न सुरक्षा या अर्थानेचे आपण अन्न या शब्दाचा उल्लेख करतो. अन्न सुरक्षेत शेतकऱ्यांचे महत्वाचे स्थान आहे. अन्न पुरवठ्यात शेतकरी महत्वाचा आहे. ज्या नागरिकांना शेतकरी अन्न पुरवतो तसेच धोरणकर्त्यांनी आतापर्यंत शेतकरी कल्याणाकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळेच केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत आहे. तसेच २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी केंद्र सरकारने निर्धार केला आहे.

नैसर्गिक आपत्तीपासून पीकांचे फार मोठी हानी होते. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान होते. आता या नुकसानीच्या वेळी शेतकऱ्यांना पतंप्रधान पीक विमा योजनेचे कवच मिळाले आहे. मृदा आरोग्य पत्रिकेमुळे जमिनीची सुपिकता पाहून शेतकरी पिकांची लागवड करु लागले आहेत. पंतप्रधान कृषी समृद्धी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना शेतमाल प्रक्रिया उद्योग उभारणीस आणि मार्केटिंगला प्रोत्साहन देण्यात येत आहे. शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल देशांतर्गत बाजारपेठेमध्ये कुठेही विक्री करता यावा, यासाठी केंद्र सरकारने ऑनलाइन नॅशनल ॲग्रिकल्चर मार्केट अर्थात ई-नाम सेवा केंद्र सुरु केले आहे. शेतकरी कल्याणासाठी सरकारने विविध योजनांनी अर्थसंकल्पातही भरपूर तरतूद केली आहे.

निवारा म्हणजे सर्वसामान्यांसाठी परवडणारी घरे. परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीसाठी केंद्र सरकारकडून पंतप्रधान आवास योजना सुरु करण्यात आली. या योजनेअंतर्गत २०२२ पर्यंत सर्व सामान्यांचे घराचे स्वप्न साकार होणार आहे. २०२२ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण होतील त्यावेळी प्रत्येक कुटुंबाला नळाचे कनेक्शन, शौचालय,वीजेची सोय असलेले पक्के घर मिळणार आहे.

विकासात रस्त्यांची भूमिका महत्वाची आहे. प्रत्येकाला कामावर जाताना खड्डे मुक्त रस्ते आणि वाहन कोंडी नको आहे. केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्रालयाने मार्च २०१९ पर्यंत ३०० रस्त्यांचे प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्धार केला आहे. जून २०१९ पर्यंत १२७ राष्ट्रीय महामार्ग राष्ट्रीय रस्ते महामार्गे प्राधिकरणाकडून पूर्ण करण्यात येणार आहे. तर रस्ते आणि वाहतूक मंत्रालयाकडून १५३ प्रकल्पाचे काम जून २०१९ पर्यंत पूर्ण करण्यात येणार होते ते आता मार्च २०१९ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. यासोबतच डिसेंबर २०१८ पर्यंत सुमारे शंभर प्रकल्पाचे काम पूर्ण केले जाणार आहे. २०१८-१९ यावर्षात सुमारे ६ हजार किलोमीटर रस्ते बांधण्याचे राष्ट्रीय रस्ते महामार्ग प्राधिकरणाने ठरवले आहे. यासोबतच देशभरातील लहान शहरांमध्ये 'उड्डान' या योजनेअंतर्गत विमान सेवा सुरु करण्यात आली आहे.

१५ ऑगस्ट २०१५ रोजी लाल किल्ल्यावरुन भाषणात पंतप्रधानांनी देशभरातील सर्व गावांमध्ये येत्या एक हजार दिवसात वीज पोहचवणार असल्याचा संकल्प केला. यासाठी केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाने दीनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजना सुरुवात केली आहे. पंतप्रधानांच्या संकल्पानंतर सुमारे १८,००० गावात वीज पोहचली आहे. १००० दिवसांच्या आत देशातल्या सर्व खेड्यांमध्ये वीज पोहचवण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घालून दिलेले उदिष्ट पूर्ण झाले आहे.

कोणत्याही देशाच्या विकासात तरुणांचा सहभाग मोलाचा आहे. भारत तरुणांचा देश आहे. देशाचा विकास करताना या उर्जेचा वापर फायदेशीर ठरणार आहे. केंद्र सरकरने नेहरु युवा केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजनेत समाजाच्या विकासासाठी तरुणांना सहभागी करुन घेतले आहे. भारताच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी तरुणांना सहभागी करुन घेण्यात आले आहे. स्कील इंडिया,स्टार्ट अप इंडिया,मुद्रा योजनेअंतर्गत तरुणांना विकासामध्ये सहभागी करुन घेण्यात येत आहे.

विविध स्तरावर प्रयत्न केल्यासच देशाचा विकास शक्य आहे. केंद्र सरकारने सुरु केलेल्या विविध योजनेमुळे देश शाश्वत विकासाच्या महामार्गाकडे वाटचाल करत आहे.

■■■

उद्दिष्ट

# किफायतशीर घरे : कुटुंबांना निवारा

- हरदीप एस. पुरी




**देशाच्या इतिहासात प्रथमच केंद्र सरकारने नागरीकरणाची संकल्पना आपलीशी केली आहे. भारताच्या स्वातंत्र्योत्तर इतिहासात, नागरीकरणासाठी सहज स्वीकार न करणारा देश अशी आपली प्रतिमा होती.उत्पन्न आणि रोजगार या दोनही बाबतीत कृषी क्षेत्र आपल्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे या तथ्यावर ही नाखुशी आधारित होती.सध्या कृषी क्षेत्र ४० % रोजगार पुरवते मात्र भारताच्या सकल मूल्य वर्धनातले या क्षेत्राचे योगदान १६.४ %पर्यंत कमी झाले आहे.**

सार्वत्रिक निवडणुकीनंतर एका महिन्याने जुलै २०१४ मध्ये संसदेच्या संयुक्त सत्राला संबोधित करताना,पंतप्रधान म्हणाले, 'देशाच्या स्वातंत्र्याला ७५ वर्षे होतील त्यावेळेपर्यंत प्रत्येक कुटुंबाकडे, पाणी, स्वच्छतागृह,अखंड वीजपुरवठा यांनी युक्त असलेले पक्के घर असेल.' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पंतप्रधान आवास योजना (पी एम ए वाय) किंवा सर्वांसाठी किफायतशीर घरे हे अभियान सुरु करण्यात आले. या अभियानाची दोन भागात विभागणी करण्यात आली. पी एम ए वाय ( ग्रामीण )हे ग्रामीण विकास मंत्रालयाच्या अखत्यारीत येते तर आणि पी एम ए वाय ( नागरी ) हे गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाच्या अखत्यारीत येते.

जून २०१५ मधे सुरु झालेल्या पी एम ए वाय ( नागरी ) अभियानाचे उद्दिष्ट आहे, नागरी भागात २०२२पर्यंत सुमारे १.२ कोटी परवडणाऱ्या दरातली घरे बांधणे.सध्याच्या सरकारच्या चार वर्षाच्या कार्यकाळात गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार मंत्रालयाने ४७.५ लाख किफायतशीर घरांसाठी मंजुरी दिली असून ८ लाख घरे पूर्ण करून लाभार्थीकडे सुपूर्द करण्यात आली आहेत. तर २००४ ते २०१४ या काळात केवळ १३.४६ लाख घरांसाठी मंजुरी देण्यात आली आणि ५.६५ लाख घरांचा ताबा देण्यात आला.जे एन एन यु आर एम सुरु करण्यात आली तेव्हा हा भारताचा सर्वात मोठा नागरी विकास कार्यक्रम मानण्यात आला होता, मात्र, जे एन एन यु आर एम च्या १० वर्षाच्या काळात मंजूर झालेल्या घराच्या तुलनेत सध्याच्या सरकारने चार वर्षाच्या काळात चौपट किफायतशीर घरांना मंजुरी दिली आहे.

### नागरीकरणाचा स्वीकार

पी एम ए वाय (शहरी) चे यश जाणण्यासाठी भारतात नागरीकरणाविषयी मानसिकतेत घडत असलेला बदल समजून घेणे आवश्यक आहे. देशाच्या इतिहासात प्रथमच केंद्र सरकारने नागरीकरणाची संकल्पना आपलीशी केली आहे. भारताच्या स्वातंत्र्योत्तर इतिहासात, नागरीकरणासाठी सहज स्वीकार न करणारा देश अशी आपली प्रतिमा होती.उत्पन्न आणि रोजगार या दोनही बाबतीत कृषी क्षेत्र आपल्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे या तथ्यावर ही नाखुशी आधारित होती. सध्या कृषी क्षेत्र ४० % रोजगार पुरवते मात्र भारताच्या सकल मूल्य वर्धनातले या क्षेत्राचे योगदान १६.४ %पर्यंत कमी झाले आहे. याउलट सेवा क्षेत्राचे योगदान लक्षणीय वाढले असून सध्या ते ५५.२ % आहे. सेवा क्षेत्र नागरी भागातच वसते.भारतीय नागरिकांच्या वाढत्या आकांक्षा पाहता, सेवा क्षेत्रातच रोजगार मिळवण्यासाठी जनता इच्छुक असणार हे साहजिकच आहे. २०३० पर्यंत भारतातली सुमारे ६०० दशलक्ष जनता किंवा ४०% लोकसंख्या

भारतीय शहरात राहील असा कयास आहे.

लोकसंख्येचा हा बदलता कल लक्षात घेऊन पंतप्रधानांनी नागरीकरणाचा स्वीकार केला.शहरे आणि मानवी वस्त्या समावेशक,सुरक्षित आणि शाश्वत बनवणे हे शाश्वत विकास उद्दिष्टे याचे उद्दिष्ट ११ चे तत्व भारताने आपल्या विकास आराखड्यात आणि प्रयत्नात अंगिकारले आहे. शाश्वत विकास उद्दिष्टे आणि संयुक्त राष्ट्रांनी २०१५ मध्ये, २०३० विकास कार्यक्रमाचा औपचारिक स्वीकार करण्याआधीपासून भारताने या तत्वाचा अवलंब केला आहे. प्रधान मंत्री आवास योजना (शहरी) अभियान जून २०१५ मधे सुरु करण्यात आले.

एस डी जी अर्थात शाश्वत विकास उद्दिष्ट अंतर्गत असलेले उद्दिष्ट २०३० पर्यंत साध्य करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे तर प्रधान मंत्री आवास योजना (शहरी) साठी देशाच्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे म्हणजे २०२२ पर्यंत प्रत्येक भारतीय कुटुंबाकडे घर असेल याची सुनिश्चिती करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

व्यापक नागरी विकासाच्या चर्चेमध्ये मानसिक बदल घडल्याने किफायतशीर घरांसंदर्भातही हा बदल घडला आहे. प्रधान मंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत बांधण्यात येणारी घरे म्हणजे दगड मातीच्या केवळ चार भिंती आणि विटा, सिमेंट नव्हे. हा केवळ निवारा नव्हे तर ते घर आहे. प्रधान मंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांमध्ये स्वच्छता गृह, वीजपुरवठा,नळाचे पाणी आणि घराघरात जाऊन कचरा गोळा करण्याची व्यवस्था आवश्यक आहे.

सर्वात महत्वाचे म्हणजे प्रधान मंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत, घरातल्या महिलेच्या नावाने किंवा संयुक्तपणे घर नोंदवता येऊ शकते. प्रधान मंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत कुटुंबाना केवळ छप्पर मिळते एवढेच नव्हे तर प्रतिष्ठा, सुरक्षितता आणि भरभराट यांनी युक्त आयुष्यासाठी सर्व सुविधाही मिळतात.

### राज्यांच्या भूमिकांची पुनर्निश्चिती

भारताकडे उत्तम कल्पनांची कधीच कमतरता नव्हती,आपल्या शहरांचा कायापालट घडवण्यासाठी,आपल्या विद्वतजनांनी त्यावर उपाय योजना आणि शिफारसी सुचवणारे असंख्य पेपर प्रसिद्ध केले.याआधी अनेक वेळा या कल्पनांना मूर्त स्वरूप येण्यापुर्वीच त्या तिथेच ठप्प राहिल्या. प्रधान मंत्री आवास योजना (शहरी) चे यश म्हणजे वस्तू आणि सेवा प्रदान करणे ही राज्याची सर्वात महत्वाची जबाबदारी आहे यासाठी पंतप्रधानांची कटीबद्धता आहे. केवळ तात्विक चर्चा करून वस्तू आणि सेवा पुरवता येऊ शकत नाहीत.त्या यशस्वीपणे पुरवण्यासाठी अंमलबजावणी आवश्यक आहे आणि त्यामध्ये सातत्यपूर्ण देखरेख आणि मूल्यांकनाचा समावेश आहे.

**प्रधान मंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत बांधण्यात येणारी घरे म्हणजे दगड मातीच्या केवळ चार भिंती आणि विटा, सिमेंट नव्हे. हा केवळ निवारा नव्हे तर ते घर आहे. प्रधान मंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांमध्ये स्वच्छता गृह, वीजपुरवठा,नळाचे पाणी आणि घराघरात जाऊन कचरा गोळा करण्याची व्यवस्था आवश्यक आहे.**

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) ची अंमलबजावणी चार स्तंभावर आधारित आहे. झोपडपट्टी पुनर्विकास, एएचपी म्हणजे भागीदारी तत्वावर किफायतशीर घरे, सी एल एस एस अर्थात पत आधारित अनुदान योजना आणि बी एल सी म्हणजे लाभार्थी केन्द्री बांधकाम.या चार स्तंभाद्वारे किफायतशीर घरांचा संपूर्ण आवाका या अभियानात सामावला आहे. अतिशय विपरीत स्थितीमध्ये राहणारे झोपडपट्टीवासी, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक आणि परवडणाऱ्या दरात बँकेकडून वित्त पुरवठा आवश्यक असणारा मध्यम वर्ग आणि ज्यांच्याकडे जमिनीचा तुकडा आहे मात्र त्यावर घर बांधण्यासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता असणारे लोक या सर्वांचा यात समावेश होतो.सर्वात महत्वाचे म्हणजे या योजनेमधे अनेक पर्यायातून निवडीचा मार्ग उपलब्ध आहे. लाभार्थी आपल्या गरजेनुसार सर्वोत्तम पर्याय निवडेल यावर या अभियानाचा विश्वास आहे.

२०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर, लोकसभेतल्या पहिल्या भाषणात, पंतप्रधानांनी,सहकार्यात्मक संघीयवादाच्या गरजेवर भर दिला होता. महत्वाच्या राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषवल्यामुळे यासंदर्भातल्या मर्यादांची त्यांना जाणीव आहे.अनेकवेळा,एखाद्या अभियानाची संकल्पना मांडून देशाच्या राजधानीद्वारे त्याची अंमलबजावणी करताना त्यातला जोम गमावलेला असतो कारण त्यामध्ये राज्यांना विचारात घेतलेले नसते.प्रधानमंत्री आवास योजना ही सरकारच्या अनेक विकासात्मक कार्यक्रमांपैकी एक योजना आहे जी सहकार्यात्मक संघीयवादावर आधारित आहे. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी )अंतर्गत राज्य सरकार स्वत: या प्रकल्पांना मंजुरी देते आणि काही किरकोळ सूचना असल्यास त्या केंद्रीय स्तरावर केल्या जातात.

या आधीचा ढाचा बदलत केंद्र सरकारने उत्प्रेरकाप्रमाणे भूमिका स्वीकारली आहे.२०१७-१८ च्या अर्थसंकल्पात किफायतशीर घरांना

पायाभूत दर्जा देण्यात आला आहे आणि २०१८- १९ च्या अर्थसंकल्पात,या क्षेत्रासाठी वित्त पुरवठ्याला चालना देण्यासाठी, नॅशनल हाउसिंग बँकेअंतर्गत किफायतशीर घरांसाठी निधी स्थापन करण्यात येत आहे.या उपाय योजनांबरोबरच या अभियानात खाजगी सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी प्राप्ती कर कायद्याच्या ८०-IBA अंतर्गत आता किफायतशीर घरांसाठीच्या प्रकल्पातल्या नफ्याला १०० % वजावट मिळते.

प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) च्या आकार आणि प्रमाणाच्या कोणत्याही अभियानाला त्याच्या सुरळीत कार्यासाठी पुरेशी नियामक यंत्रणा लागते. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) ही व्यापक प्रमाणात स्थावर मालमत्ता अंतर्गत येत असल्याने अधिक योग्य असणे आवश्यक आहे.

भारतात, स्थावर मालमत्ता क्षेत्र म्हणजे प्रामाणिकपणाला शिक्षा आणि विवेकहीन वर्तणुकीला इनाम असेच यापूर्वी मानले जात असे.राजकारणी-अधिकारी-बिल्डर यांचे लागेबांधे यांचे वर्चस्व यावर होते.एखाद्या व्यक्तीला घर खरेदी करायचे असल्यास त्याला भ्रष्ट पद्धतीचा अवलंब करणे भाग पडत असे आणि त्यानंतरही, खरेदी केलेली मालमत्ता त्याच्या मालकाकडे सुपूर्द केली जाईल याची शाश्वती नसे. या पद्धतीला पूर्णविराम देण्यासाठी सरकारने स्थावर मालमत्ता (नियमन) कायदा किंवा रेरा २०१६ निर्माण केला.स्थावर मालमत्ता क्षेत्र नियमनासाठी देशात ७० वर्षात प्रथमच रेरा निर्माण करण्यात आला. संसदेत संमत करण्यात आलेल्या या कायद्यामुळे गृह खरेदीदाराची आयुष्यभराची मेहनतीची कमाई आता देशाच्या कायद्याच्या चौकटीपेक्षा वरचढ होऊ पाहणाऱ्या आणि ही चौकट खिळखिळी करू पाहणाऱ्या भ्रष्ट व्यवस्थेच्या दयेवर अवलंबून राहिली नाही. घर खरेदी करणाऱ्याना दिवाळखोरी आणि नादारी कायद्याने धनकोच्या शेजारी आणले, त्याचबरोबर या क्षेत्रातल्या भ्रष्ट बाबींचा नायनाट करण्यासाठी अधिक पाठबळ पुरवले आहे

**निष्कर्ष :**

भारताच्या शहरी मागणीची पूर्तता करण्यासाठी २०३० पर्यंत, देशाला, दरवर्षी, ७०० ते ९०० दशलक्ष चौरस मीटर निवासी आणि वाणिज्यिक बांधकाम निर्मिती करावी लागेल असे अनुमान आहे. नागरी राहणीमानासाठीची नागरिकांची मागणी पूर्ण करण्यासाठी २०३० पर्यंत भारताला दरवर्षी नवे शिकागो निर्माण करावे लागेल.

**स्वच्छ भारत किंवा क्लीन इंडिया मिशन हे जन चळवळ बनले आहे. गावे आणि शहरे हागणदारीमुक्त व्हावीत यासाठी केवळ स्वच्छतागृहे बांधण्यावर भर न ठेवता, देशात मानसिकतेत बदल घडवण्यासाठीही प्रयत्न सुरु आहेत. प्रधान मंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत येणाऱ्या किफायतशीर घरात बांधण्यात येणाऱ्या ४७.५ लाख स्वच्छतागृहाशिवाय ५७ लाख वैयक्तिक स्वच्छतागृहे तर ३. ८ लाख सामाईक स्वच्छता गृहे बांधण्यात येत आहेत**

देशात सुरु असलेले नियोजनबद्ध नागरीकरण लक्षात घेऊन प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) चे यश पाहिले पाहिजे. स्वच्छ भारत किंवा क्लीन इंडिया मिशन हे जन चळवळ बनले आहे. गावे आणि शहरे हागणदारीमुक्त व्हावीत यासाठी केवळ स्वच्छतागृहे बांधण्यावर भर न ठेवता, देशात मानसिकतेत बदल घडवण्यासाठीही प्रयत्न सुरु आहेत. प्रधान मंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत येणाऱ्या किफायतशीर घरात बांधण्यात येणाऱ्या ४७.५ लाख स्वच्छतागृहाशिवाय ५७ लाख वैयक्तिक स्वच्छतागृहे तर ३. ८ लाख सामाईक स्वच्छता गृहे बांधण्यात येत आहेत. अमृत योजने अंतर्गत निवडण्यात आलेल्या ५०० शहरांना सार्वत्रिक पाणी पुरवठा आणि मलनिस्सारण व्यवस्थेत सुधारणा यामुळे या किफायतशीर घरात राहणाऱ्या रहिवाश्यांच्या जीवनमानात सुधारणा होणार आहे. स्मार्ट शहरे अभियाना अंतर्गत ९९ शहरांची निवड करण्यात आली असून यामधे नागरिकांचा व्यापक सहभाग राहणार आहे,शहराच्या विकासासाठी, किफायतशीर घरात राहणाऱ्या नागरिकांनाही आपले मत मांडता येईल.

आपल्या अर्बन सेंटर मधला व्यापक प्रभाव प्रधानमंत्री आवास योजना (शहरी ) विषद करते त्याच बरोबर भारतातली शहरे उत्तम दर्जाची रहावीत यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. भारतीयांसाठी सुखकर राहणीमान पुरवण्याच्या पंतप्रधानांच्या कटीबद्ध्तेत ते प्रतीत होत आहे.सबका साथ, सबका विकास, सर्वांसाठी विकास ही या सरकारची मुल्ये आहेत. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी ) च्या व्याप्तीची जगातल्या इतर देशातल्या अनुभवाशी तुलना करता येणार नाही. परिणामी किफायतशीर घरांच्या भारतीय मॉडेलच्या यशावर जागतिक नागरी विकासाचे भवितव्य निश्चित होईल.

■■■

*लेखक केंद्रीय गृहनिर्माण आणि शहर विकास खात्याचे राज्यमंत्री (स्वतंत्र पदभार) असून संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे कायम प्रतिनिधी म्हणून त्यांनी काम पाहीले आहे.*

*ई मेल: minister-mohua@nic.in*

# माफक किमतीत सर्वांसाठी घरे

- डॉ. रणजीत मेहता



**सध्याच्या वेगवान जगात, विशेषत:वेगाने उदयाला येणाऱ्या अर्थव्यवस्थांच्या काळात शहरीकरणाचे परिणाम दिसणे अनिवार्य आहे. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे विशेषत: महानगरांकडे आणि राज्यांच्या राजधान्यांकडे अचानकआणि मोठ्या प्रमाणावर येणारा स्थलांतरितांचा ओघ ही सर्व शहरांमधील सगळ्यात महत्त्वाची समस्या आहे. प्रत्येक शहरातल्या घरांच्या टंचाईमुळे शहरी भागातली पन्नास टक्के जनता झोपडपट्टीत राहते.**

नागरीकरणाचा उदय झाल्यापासून सुरक्षित निवारा किंवा घर मिळवणे ही प्रत्येक व्यक्तीची, कुटुंबाची,गटांची आणि सरकारची मोठी चिंता होती. एकविसावे शतक हे शहरी शतक मानले जाते कारण नागरीकरणाच्या उदयानंतर प्रथमच ग्रामीण भागापेक्षा जास्त नागरिक शहरी, विकसित भागात वास्तव्य करत आहेत. सध्याच्या वेगवान जगात, विशेषत:वेगाने उदयाला येणाऱ्या अर्थव्यवस्थांच्या काळात शहरीकरणाचे परिणाम दिसणे अनिवार्य आहे. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे विशेषत: महानगरांकडे आणि राज्यांच्या राजधान्यांकडे अचानकआणि मोठ्या प्रमाणावर येणारा स्थलांतरितांचा ओघ ही सर्व शहरांमधील सगळ्यात महत्त्वाची समस्या आहे. प्रत्येक शहरातल्या घरांच्या टंचाईमुळे शहरी भागातली पन्नास टक्के जनता झोपडपट्टीत राहते.

गेल्या काही दशकांत आपण बघितले की मोठ्या प्रमाणावर झालेले शहरीकरण, उत्पन्नाची वाढती पातळी आणि लोकसंख्येचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर या सगळ्यांमुळे, भविष्यातल्या वाढत्या लोकसंख्येला सामावून घेण्यासाठी वाहतूकव्यवस्था, घरे, जमीन आणि इतर नागरी सेवांवर दबाव वाढत आहे. गेल्या दशकात एकंदर लोकसंख्यावाढीचा दर कमी झाला असला तरी शहरी भागातल्या लोकसंख्येच्या वाढीचा दर देशाच्या वार्षिक लोकसंख्यावाढीच्या दराच्या जवळ जवळ दुप्पट राहिला आहे. सन २०१३पर्यंत भारताच्या शहरी भागाची लोकसंख्या ६०कोटी(एकूण लोकसंख्येच्या ५०% पेक्षाही जास्त), जी २०११ मध्ये ३७.७ कोटी होती. तसेच सन २०११ मध्ये एकूण शहरांची संख्या ५० होती ती २०३१पर्यंत ८७ पर्यंत पोहोचेल.याशिवाय, शहरी भागाचा स्थूल राष्ट्रीय उत्पादनामधला वाटा ७५% पर्यंत वाढेल, जो२००९-१० मध्ये ६२-६३% होता. (उच्चाधिकार समिती,२०११ च्या अहवालानुसार.) त्यामुळे, आपल्या शहरी जीवनाचा दर्जा उंचावायची पराकोटीची गरज आहे, त्याबरोबरच सध्याची आणि भविष्यातली घरांची टंचाई, आपल्या शहरी विभागातल्या पायाभूत सुविधांमधल्या नेहमीच्या तुटीबाबतदेखील काहीतरी उपाय शोधायची गरज आहे.

शहरी गृहनिर्माणाबाबतच्या तंत्रज्ञ गटाने २०११ मध्ये बाराव्या पंचवार्षिक योजनेत सरकारने १ कोटी ८७ लाख ८० हजार शहरी घरांच्या टंचाईचे अनुमान वर्तवले होते. या एकूण घरांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आणि निम्न उत्पन्न गटातील (LIG) व्यक्तींचे प्रमाण एकूण टंचाईच्या सुमारे ९६% आहे. गृहनिर्माण आणि शहरी दारिद्र्य निर्मुलन मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार EWS आणिLIG यांची

वार्षिक उत्पन्न मर्यादा अनुक्रमे एक लाख आणि एक ते दोन लाख अशी ठरविण्यात आली आहे. ग्रामीण भागात किमान ४ कोटी ३६ लाख ७० हजार घरांची कमतरता आहे असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ज्यापैकी नव्वद टक्के घरे दारिद्र्यरेषेखालील आहेत. घरांची ही कमतरता भरून काढण्यासाठी सरकारच्या अंदाजाप्रमाणे १कोटी ६२ लाख९० हजार नवीन परवडणाऱ्या घरांची गरज आहे.त्याचबरोबर,सध्या घराच्या क्षमतेपेक्षा जास्त व्यक्ती वास्तव्य करत असलेल्या घरांमधील गर्दी कमी करण्यासाठी १कोटी २६लाख७० हजार घरांची आवश्यकता आहे. काही घरे अशीही आहेत ज्यांना दुरुस्तीची गरज आहे आणि त्यांच्यापर्यंत मुलभूत सुविधादेखील अजूनपर्यंत पोहोचलेल्या नाहीत.

ही समस्या लक्षात घेऊनच परवडणाऱ्या घरांची निर्मिती हे मोदी सरकारच्या मुख्य ध्येयांपैकी एक ठरले आहे. सरकारने सन २०२२ पर्यंत प्रत्येकाला घर उपलब्ध करून देण्याचे वचन दिले आहे. हे लक्ष्य या क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी नाट्यमयरित्या विविध संधी आणि गरजा घेऊन आले आहे आणि हे स्वप्न पूर्ण करणे हे अधिक उज्ज्वल भारत निर्मितीकडे नेणारे पाऊल ठरू शकेल.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत शहरी भागातल्या गरिबांसाठी भारत सरकारने १७ जून २०१५ ला 'सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे' ही परिवर्तनशील योजना सुरु केली.

प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) – सर्वांसाठी घरे.

नागरिकांना जरी कमी खर्चातली, स्वस्त घरे पुरवण्याचे प्रयत्न गेली अनेक वर्षे सुरु आहेत तरी २०१५ मध्ये सुरु करण्यात आलेल्याPMAY मुळे या प्रक्रियेला नवी चालना मिळाली.प्रधान मंत्री शहरी आवास योजनेत(PMAY-U) आधी सुरु असलेल्या सगळ्या शहरी गृहनिर्माण योजनांचा समावेश होता आणि या योजनेचे लक्ष्य २०२२ पर्यंत प्रत्येकासाठी घर मिळवून देणे हेच आहे. PMAY-U योजनेद्वारे २ कोटी घरांच्या टंचाईच्या समस्येवर उपाय करता येईल अशी कल्पना मांडली जात आहे.

**ग्रामीण भागात किमान ४ कोटी ३६ लाख ७० हजार घरांची कमतरता आहे असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ज्यापैकी नव्वद टक्के घरे दारिद्र्यरेषेखालील आहेत. घरांची ही कमतरता भरून काढण्यासाठी सरकारच्या अंदाजाप्रमाणे १कोटी ६२ लाख९० हजार नवीन परवडणाऱ्या घरांची गरज आहे.त्याचबरोबर,सध्या घराच्या क्षमतेपेक्षा जास्त व्यक्ती वास्तव्य करत असलेल्या घरांमधील गर्दी कमी करण्यासाठी १कोटी २६लाख७० हजार घरांची आवश्यकता आहे**

**या मोहिमेचे चार घटक आहेत:**

अ–झोपडपट्टी पुनर्विकास (ISSR)

यामध्ये जमिनीचा साधन म्हणून उपयोग केला जातो.सरकारी किंवा खासगी जागेवर सध्या अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीचा पुनर्विकास करून पात्र झोपडीधारकांना घरे देणारी ही योजना आहे. या योजनेअंतर्गत राज्यात या योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी करणाऱ्या प्राधिकरणांना केंद्र सरकारकडून प्रत्येक घरासाठी एक लाख या प्रमाणात अनुदान दिले जाणार आहे.

ब–सहकारी तत्वावर परवडणाऱ्या घरांची निर्मिती (AHP)

या योजनेत खासगी विकासकांना आर्थिक मदत देऊन परवडणाऱ्या घरांच्या निर्मिती प्रकल्पात खासगी क्षेत्राचा सहभाग वाढवला जातो. ज्या खासगी गृहप्रकल्पांमध्ये किमान ३५% घरे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी बांधली आहेत अशा प्रकल्पांसाठी या वर्गातल्या प्रत्येक घरासाठी दीड लाख रुपये अशा दराने केंद्राकडून मदत उपलब्ध करून दिली जाते.

क – कर्जाशी जोडलेली अनुदान योजना (CLSS)

या प्रकारच्या योजनेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, निम्नउत्पन्न गट आणि मध्यम उत्पन्न गटातल्या नागरिकांना गृहखरेदीसाठी संस्थात्मक कर्ज उपलब्ध करून दिले जाते. या कर्जाच्या व्याजावरील अनुदान प्राथमिककर्जवाटप संस्थांच्या माध्यमातून परस्पर कर्जदाराच्या खात्यावर जमा केले जाते. यामुळे गृहकर्ज आणि त्याचा मासिक हप्ता दोन्ही लक्षणीयरीत्या कमी होतात.त्यामुळे घर खरेदी करणाऱ्यांना मोठा दिलासा मिळतो.

ड–लाभार्थ्यांसाठीची घराचे बांधकाम किंवा सुधारणांसाठीची योजना (BLC)

या योजनेतून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधल्या तसेच निम्न उत्पन्न गटातल्या प्रत्येक कुटुंबाला नवीन घर बांधण्यासाठी किंवा राहत्या घरात सुधारणा करण्यासाठी दीड लाख रुपयांची मदत केंद्र सरकारकडून दिली जाते.चोवीस तास पाणीपुरवठा, स्वच्छतेची सोय आणि वीजपुरवठा उपलब्ध असणाऱ्या, परवडणाऱ्या पक्क्या घरांच्या बांधकामाची कल्पना प्रत्यक्षात आणायचे सरकारचे लक्ष्य आहे.केंद्र सरकारकडून दोन लाख कोटी रुपयांच्या आर्थिक मदतीच्या माध्यमातून, २०२२ सालापर्यंत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि निम्न उत्पन्न गटासह

सर्व शहरी गरिबांसाठी दोन कोटी घरे बांधण्याचा सरकारचा प्रस्ताव आहे. यातल्या प्रत्येक घरात शौचालय, सौभाग्य योजनेद्वारे वीज जोडणी, उज्ज्वला योजनेद्वारे स्वयंपाकाच्या गॅसची जोडणी, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता तसेच जन धन बँकिंगची सोय असेल याची निश्चिती करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेसोबत इतर योजनांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे.

ही योजना मुख्यत: शहरी विभागासाठी असून सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश तसेच शहरांमध्ये ती कार्यान्वित करण्यासाठी खालील घटक किंवा पर्याय उपलब्ध आहेत.

- खासगी विकासकाच्या मदतीने जमिनीचा वापर करून झोपडपट्टीधारकांचे आहेत त्याच जागेवर पुनर्वसन करणे.
- गृहकर्जाला जोडलेल्या अनुदान योजनेद्वारे दुर्बल घटकांना परवडणाऱ्या घरांच्या खरेदीसाठी प्रोत्साहन देणे.
- सरकारी-खासगी भागीदारी तत्वावर परवडणाऱ्या दरातली घरे उपलब्ध करून देणे.
- व्यक्तिगत पातळीवर लाभार्थ्याला घर बांधणी किंवा राहत्या घराच्या सुधारणेसाठी अनुदान उपलब्ध करून देणे.

या सर्व प्रयत्नांखेरीज, अर्थसंकल्पात काही तरतुदी करून देखील भारत सरकार सर्वांसाठी घरे पुरवण्याचा प्रयत्न करत आहे.

सन २०१७-१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पातल्या काही तरतुदी बांधकाम क्षेत्रासाठी दिशा बदलवणाऱ्या ठरल्या, विशेषत: '२०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे' हे लक्ष्य साध्य करण्याच्या दृष्टीने त्या खूप महत्त्वाच्या ठरल्या.

परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीला प्रोत्साहन देणाऱ्या काही उपाययोजना २०१७-१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आल्या.

गृहनिर्माण क्षेत्राला उर्जितावस्था आणण्यासाठी अर्थसंकल्पात उल्लेखलेले काही मुद्दे खालीलप्रमाणे आहेत:-

- परवडणारे घर ह्या सुविधेला पायाभूत सुविधेचा दर्जा देणे.

---

**आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधल्या तसेच निम्न उत्पन्न गटातल्या प्रत्येक कुटुंबाला नवीन घर बांधण्यासाठी किंवा राहत्या घरात सुधारणा करण्यासाठी दीड लाख रुपयांची मदत केंद्र सरकारकडून दिली जाते.चोवीस तास पाणीपुरवठा, स्वच्छतेची सोय आणि वीजपुरवठा उपलब्ध असणाऱ्या, परवडणाऱ्या पक्क्या घरांच्या बांधकामाची कल्पना प्रत्यक्षात आणायचे सरकारचे लक्ष्य आहे.**

---

- सन २०१९ पर्यंत एक कोटी घरांची निर्मिती करणे.
- राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या माध्यमातून २० हजार कोटी रुपयांच्या कर्जासाठी पुनर्वित्तपुरवठा करणे.
- प्रधान मंत्री आवास योजनेसाठी २३ हजार कोटी रुपयांची तरतूद करणे.
- बांधकाम क्षेत्रातल्या विकासकांना विक्री न झालेल्या घरांवर करात सवलत देण्याची तरतूद केली गेली कारण प्रकल्प पूर्ण झालेल्या वर्षी भांडवली नफ्यावर कर भरण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल.
- परवडणाऱ्या घरांसाठी ३० आणि ६० वर्ग मीटर बिल्ट अप क्षेत्राच्या ऐवजी अनुक्रमे ३० आणि ६० वर्ग मीटर चटई क्षेत्राची अट लागू केली जाईल.
- स्थावर मालमत्तेसाठीच्या भांडवली नफ्यावरच्या कराचा कालावधी तीन वर्षांवरून दोन वर्षांपर्यंत कमी करण्यात आला.
- विकल्या न गेलेल्या घरांसाठी, बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतरच्या एक वर्षासाठी कर भरण्यातून सूट.
- इंदिरा आवास योजना भविष्यात ६०० जिल्ह्यांमध्ये विस्तारायची योजना
- मालमत्तेतून मिळणाऱ्या भांडवली नफ्याचा हिशोब करताना संदर्भासाठी धरायची तारीख ०१/०४/१९८१ वरून ०१/०४/२००१ करण्यात आली.

गृहनिर्माण क्षेत्रासाठी उचलण्यात आलेल्या या परिवर्तनशील पावलांचे विस्तृत विवेचन खाली केले आहे.

### परवडणाऱ्या घरांच्या निर्मिती क्षेत्राला पायाभूत सुविधांचा दर्जा

हा भारत सरकारचा उल्लेखनीय उपक्रम होता.परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीचे क्षेत्र पायाभूत सुविधेअन्तर्गत आणावे ही खूप काळ प्रलंबित मागणी पूर्ण झाल्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला आणि २०२२पर्यंत पर्यंत सर्वांसाठी घरे या मोहिमेला मोठे प्रोत्साहन मिळाले.खासगी विकासकांच्या सहभागामुळे या क्षेत्रात स्पर्धा वाढली आणि त्याचा परिणाम म्हणून पहिल्यांदाच घर खरेदी करणाऱ्या मध्यमवर्गीय आणि निम्न मध्यमवर्गीय

ग्राहकांना जास्त चांगल्या दर्जाचे पर्याय उपलब्ध झाले.

प्रधानमंत्री आवास योजनेमुळे स्वस्त घरांच्या निर्मितीला अजून एक चांगले प्रोत्साहन मिळाले. या योजनेअंतर्गत ९ लाखांपेक्षा जास्त गृहकर्ज घेणाऱ्या ग्राहकांना फक्त ४% आणि १२ लाखांपेक्षा जास्त कर्ज घेणाऱ्या ग्राहकांना ३%व्याजदर आकारला जाईल अशी घोषणा सरकारने केली आहे. मात्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक किंवा निम्न उत्पन्न गटातील ग्राहकांना या योजनेचा लाभ मिळणार की नाही याबाबत अजून संदिग्धता आहे. या योजनेअंतर्गत बांधल्या जाणाऱ्या प्रकल्पांच्या पूर्ततेच्या कालावधीची मर्यादादेखील ३ वर्षांवरून ५ वर्षांपर्यंत वाढवण्यात आली.त्यामुळे आता अधिकाधिक प्रकल्प नफ्याशी निगडीत कर सवलतीला पात्र ठरतील.जास्त मागणी असूनही परवडणाऱ्या घरांच्या निर्मिती क्षेत्रात आतापर्यंत खासगी विकासकांचा सहभाग खूप मर्यादित राहिलेला दिसतो.नफ्याशी निगडीत करसवलतीबरोबरच या प्रकारच्या गृहनिर्मितीला पायाभूत सुविधेचा दर्जा दिल्यामुळे विकासकांचा असे प्रकल्प जास्त प्रमाणात हाती घेण्याकडे कल वाढेल आणि त्यामुळे या क्षेत्रात खासगी विकासकांचा सहभाग वाढेल.

**स्वस्त किंवा परवडणाऱ्या घरांचे निकष**

स्वस्त किंवा परवडणाऱ्या घरांच्या निकषात बदल करण्यात आला असून अशी घरे आता ३०/६० वर्ग मीटर बिल्ट-अप क्षेत्राऐवजी ३०/६० वर्ग मीटर चटई क्षेत्राची असतील. या बदलामुळे असे प्रकल्प विकासकांसाठी जास्तीत जास्त फायदेशीर ठरतील आणि खरेदीदारांसाठी देखील हे क्षेत्र जास्त आकर्षक होईल.बिल्ट अप क्षेत्राऐवजी चटई क्षेत्राचा वापर केल्यामुळे, खरेदीदारांना अधिक ऐसपैस घरे मिळतील आणि विकासकांनाही त्यांचे प्रकल्प अधिक विस्तृत ग्राहकवर्गात विकता येतील. ३० वर्ग मीटरची मर्यादा ४ महानगरांच्या महानगरपालिकांच्या हद्दीत लागू असेल तर महानगरांच्या हद्दीसभोवतालचे क्षेत्र आणि देशाच्या उरलेल्या सर्व भागात ६० वर्ग मीटरची मर्यादा लागू होईल.

**स्थावर मालमत्तेसाठी भांडवली नफ्याकरिता गुंतवणुकीचा कालावधी ३ वर्षांवरून २ वर्ष करण्यात आला.**

२०१७-१८ च्या अर्थसंकल्पात स्थावर मालमत्तेच्या बाबतीत दीर्घकालीन भांडवली नफ्यासाठी गुंतवणुकीचा कालावधी सध्याच्या ३ वर्षांवरून २ वर्ष करण्याची तरतूद करण्यात आली. या नव्या नियमामुळे २ वर्षांनंतर मालमत्ता विकणाऱ्या नागरिकांवरचे कराचे ओझे लक्षणीयरीत्या कमी होईल आणि बांधकाम क्षेत्रात गुंतवणूक करायला प्रोत्साहन मिळेल. स्थावर मालमत्तेतून मिळणाऱ्या नफ्याचा हिशोब करण्याकरिता संदर्भासाठी आधार म्हणून धरायच्या वर्षात देखील सरकारने बदल केले.याआधी संदर्भासाठी १९८१ हे वर्ष धरले जायचे जे आता २००१ करण्यात आले आहे. या नव्या नियमामुळे लोकांना त्यांच्या स्थावर मालमत्तेची वाढीव किंमत मिळेल. ज्यामुळे त्यांचा एकंदर भांडवली नफा कमी होईल. तसेच,विकल्या न गेलेल्या घरांसाठी, पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतरच्या एका वर्षासाठीच्या करावर सूट दिल्यामुळे बांधकाम व्यावसायिकांना थोडा दिलासा मिळाला आहे.

**प्रधानमंत्री आवास योजनेमुळे स्वस्त घरांच्या निर्मितीला अजून एक चांगले प्रोत्साहन मिळाले. या योजनेअंतर्गत ९ लाखांपेक्षा जास्त गृहकर्ज घेणाऱ्या ग्राहकांना फक्त ४% आणि १२ लाखांपेक्षा जास्त कर्ज घेणाऱ्या ग्राहकांना ३%व्याजदर आकारला जाईल अशी घोषणा सरकारने केली आहे. मात्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक किंवा निम्न उत्पन्न गटातील ग्राहकांना या योजनेचा लाभ मिळणार की नाही याबाबत अजून संदिग्धता आहे.**

राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेकडून २० हजार कोटी रुपयांच्या व्यक्तिगत कर्जासाठी पुनर्वित्तपुरवठा केला जाईल.

सध्या गृहकर्जाचा भार असणारे, विशेषत: ज्यांना भूतकाळात कर्ज घेताना जास्त व्याजदर लावण्यात आला होता अशा कर्जदारांना राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या पुनर्वित्तपुरवठा योजनेमुळे दिलासा मिळेल.

मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी स्वाक्षऱ्या केलेल्या एकत्रित विकास करारपत्राला लागू होणारी भांडवली नफ्यावरच्या कराराची जबाबदारी

अर्थसंकल्पाने यापूर्वीची प्रचलित प्रक्रिया बदलून टाकली आहे आणि अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत की जे जमीनमालक त्यांच्या मालमत्तेच्या विकासासाठी विकासकाबरोबर एकत्रित विकास करार करतील त्यांना प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर भांडवली नफ्यावरचा कर लागू होईल. खूप काळापासून आवश्यक असलेला हा एक महत्त्वपूर्ण बदल होता.या बदलामुळे, या मुद्द्याबाबत अनेक गोष्टी स्पष्ट झाल्या, सध्याच्या अर्थविषयक नियमांबाबत असलेल्या संदिग्धतेमुळे सरकारी विभागासोबत कायदेशीर वादांचे प्रसंग निर्माण होणे नित्याचे झाले होते ते टळले. म्हणजे, एकत्रित विकास करार जर मालमत्तेच्या विकासासाठी केलेला असेल तर भांडवली नफ्यावरचा कर हा प्रकल्प पूर्ण

झाल्याच्या वर्षी भरावा लागेल.भांडवली नफ्यावरचा कर कमी करण्यासाठी केलेल्या इतर उपाययोजनांबरोबरच ह्या बदलामुळे फक्त जमीनमालकांनाच नव्हे तर बांधकाम व्यावसायिक आणि विकासक संस्थेला देखील दिलासा मिळेल, त्यांची जबाबदारी कमी होईल. या सकारात्मक वातावरणामुळे,जमीन हस्तांतरणाचे व्यवहार सुधारायला मदत होईल. गेली तीन वर्षे बांधकाम क्षेत्र नियमांच्या संदिग्धतेमुळे ताणाखाली होते त्यातून बाहेर पडल्यामुळे या क्षेत्रात जास्तीत जास्त जमिनीच्या व्यवहारांना सुरुवात होईल.

**जमीन सामायिकपणे वापराची योजना**

आंध्रप्रदेश राज्याच्या नव्या राजधानीच्या बांधकामासाठी भूमी अधिग्रहण विधेयकाचा वापर न करता अनेक जमीनमालकांची जमीन सामायिकपणे या कामासाठी वापरात आणायची नाविन्यपूर्ण कल्पना या वर्षीच्या अर्थसंकल्पात मांडण्यात आली.भूमी अधिग्रहण विधेयकाच्या पार्श्वभूमीवर हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.भूमी अधिग्रहण हा सतत वादाचा आणि चर्चेचा मुद्दा राहिला आहे. मोठ्या प्रमाणातल्या विकासासाठी तो एक मोठा अडसर ठरला होता आणि स्वस्त घरांच्या क्षेत्राच्या विकासावरही त्याचा वाईट परिणाम होत होता. अनेक जमीनमालकांची जमीन सामायिकपणे विकासासाठी वापरायच्या या नव्या योजनेमुळे जमिनीशी संबंधित वादाचे मुद्दे कमी होतील आणि विकासाचा वेग वाढेल. भांडवली नफ्यावरच्या करात सूट दिल्यामुळे सरकारच्या योजनेअंतर्गत राजधानीचे शहर वसवायला ज्या जमीन मालकांची जमीन वापरली जाणार आहे त्यांचा सरकारवरचा विश्वास वाढायला मदत होईल. मात्र, आंध्र प्रदेश राज्याची पुनर्रचना ज्या दिवशी झाली त्या दिवशी म्हणजे २ जून २०१४ रोजी, ज्या जमीन मालकांकडे जमिनीचे मालकी हक्क होते आणि आहेत अशाच जमीन मालकांना कर सवलत मिळणार आहे.

**अर्थसंकल्पाने यापूर्वीची प्रचलित प्रक्रिया बदलून टाकली आहे आणि अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत की जे जमीनमालक त्यांच्या मालमत्तेच्या विकासासाठी विकासकाबरोबर एकत्रित विकास करार करतील त्यांना प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर भांडवली नफ्यावरचा कर लागू होईल. खूप काळापासून आवश्यक असलेला हा एक महत्त्वपूर्ण बदल होता. या बदलामुळे, या मुद्याबाबत अनेक गोष्टी स्पष्ट झाल्या, सध्याच्या अर्थविषयक नियमांबाबत असलेल्या संदिग्धतेमुळे सरकारी विभागासोबत कायदेशीर वादांचे प्रसंग निर्माण होणे नित्याचे झाले होते ते टळले.**

शेवटी, सन २०२२पर्यंत सर्वांना हक्काचा निवारा उपलब्ध करून देण्यासाठी भारत सरकार करत असलेल्या नवनव्या उपाययोजनांमुळे स्थूल राष्ट्रीय उत्पादनात भरीव वाढ होईल अशी आशा आपण करू शकतो. गृहनिर्माण क्षेत्र हे त्याच्याशी संबंधित सुमारे २६५ इतर उद्योगांशी प्रत्यक्षपणे जोडले गेले असल्याने या क्षेत्राची वाढ त्यावर अवलंबून असलेल्या इतर उद्योगांच्या वाढीला कारणीभूत ठरेल. सध्या भारतात असलेली तरुण वर्गाची मोठी लोकसंख्या लक्षात घेता देशाला त्याचा उत्तम फायदा करून घेण्याची संधी आहे. या मोठ्या संख्येतल्या तरुणांना तेवढ्या प्रमाणात नोकऱ्या



उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक पावले उचलणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. बांधकाम क्षेत्र हे खूप पूर्वीपासूनच कामगार केंद्रित क्षेत्र राहिले आहे. या क्षेत्रात आर्थिक आघाडीवर जशा अनेक गुंतागुंतीच्या व्यवहारांचा समावेश आहे तसेच रोजगार किंवा नोकऱ्या उपलब्ध करून देण्यातही ते आघाडीवर आहे. भारताच्या तरुण वर्गाच्या आकांक्षा पूर्ण करण्यात बांधकाम क्षेत्राने मोठा वाटा उचलला आहे. त्याच धर्तीवर या तरुण वर्गाचा योग्य उपयोग करून घेतला तर तो मोठे लाभ मिळवून देऊ शकतो याचे भानदेखील आपल्याला भविष्यात येईल.

भारत सरकारच्या या नवनवीन योजनांमुळे, अनेक लाभांश, अनुदाने,करातल्या सवलतीसारखे फायदे आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे संस्थात्मक वित्तपुरवठा यामुळे बांधकाम विकासकांना प्रोत्साहन मिळाले आहे. त्यामुळे परवडणाऱ्या घरांच्या निर्मिती क्षेत्रात हे विकासक मोठ्या प्रमाणात रस घेतील आणि या क्षेत्रात मोठी वाढ होईल अशी शक्यता दिसत आहे.परवडणाऱ्या घरांच्या निर्मिती क्षेत्रात२०१७ साली जानेवारी ते सप्टेंबर या कालावधीत २७%ची वाढ झाली तर एकंदर निवासी गृहनिर्मितीचा दर ३३% ने कमी झाला. ही परिस्थिती कदाचित 'प्रधान मंत्री आवास योजना- सर्वांसाठी २०२२पर्यंत घरे' या मोहिमांची युद्ध पातळीवर अंमलबजावणी आणि बिगर बँकिंग वित्तपुरवठा कंपन्या आणि बँकांकडून या क्षेत्राकडे औपचारिक कर्जांचा वाढता ओघ यामुळे झाली असण्याची शक्यता आहे.

परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीसाठीचा वित्तपुरवठा हा सन २०२२पर्यंत सुमारे ६ लाख कोटीचा उद्योग झालेला असेल असा अंदाज व्यक्त होत आहे, त्या वेळेस सरकारने सर्वांसाठी घरे मिळवून देण्याचे लक्ष्य पूर्ण केलेले असेल. देशभरात परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीसाठी प्रोत्साहन देण्याकरिता सरकारने अनेक कार्यक्रम सुरु केले आहेत.उपलब्ध आकडेवारीवरून असे म्हणता येईल की सन २०१६-१७ मध्ये कर्जांचे वितरण आणि नवीन प्रकल्पांची सुरुवात या दोन्ही बाबतीत परवडणाऱ्या घरांच्या निर्मिती क्षेत्रात तीव्र वाढ झालेली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमध्ये गृहखरेदीच्या क्षमतेमध्ये वाढ करण्यासाठी कर्जाशी निगडीत अनुदान योजना परिणामकारक ठरली आहे.

■■■

*लेखक नवी दिल्लीतल्या PHDCCI या संस्थेचे प्रमुख संचालक म्हणून कार्यरत आहेत.उद्योगक्षेत्राशी संबंधित विविध धोरणविषयक समस्यांवर उपाययोजना शोधण्यासाठी ते भारत सरकार आणि राज्य सरकारांसोबत काम करत आहेत.*

*ई मेल: ranjeetmehta@gmail.com*



# शेतकऱ्यांचे कल्याण : बांधिलकीसह प्राधान्य

- डॉ. जगदीप सक्सेना



**शेती विकास म्हणजे, उच्च उत्पन्न, रोजगार आणि त्याचा परीणाम म्हणून आलेली समृध्दी याद्वारे ग्रामीण जनतेला बळकटी देणे, असा केंद्राचा शेतकरी कल्याणाचा दृष्टीकोन आहे. या शिवाय, प्रधानमंत्र्यांनी म्हटले आहे की, सन २०२२ मध्ये जेव्हा देश स्वातंत्र्याची पंचाहत्तरी साजरी करत असेल त्यावेळपर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झाले असेल. याचा पाठपुरावा म्हणून, कृषि मंत्रालयाने, शेतकरी कल्याणासाठी, एक सातकलमी धोरण आखले आहे. यामध्ये शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे म्हणून विविध गंभीर आणि संभाव्य घटकांचा समावेश आहे.**

भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार म्हणजे मेहनत करणारे लाखो शेतकरी. असे असतानाही, त्यांचे कल्याण हा बऱ्याच काळापासून एक दुर्लक्षित मुद्दा आहे. मात्र २०१४ मध्ये केंद्रात आलेल्या नव्या आणि जास्त संवेदनशील सरकारने, हा सामाजिक -आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा मुद्दा पुढे आणला. तेव्हापासून, शेती विकास म्हणजे, उच्च उत्पन्न, रोजगार आणि त्याचा परीणाम म्हणून आलेली समृध्दी याद्वारे ग्रामीण जनतेला बळकटी देणे, असा केंद्राचा शेतकरी कल्याणाचा दृष्टीकोन आहे. या शिवाय, प्रधानमंत्र्यांनी म्हटले आहे की, सन २०२२ मध्ये जेव्हा देश स्वातंत्र्याची पंचाहत्तरी साजरी करत असेल त्यावेळपर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झाले असेल. याचा पाठपुरावा म्हणून, कृषि मंत्रालयाने, शेतकरी कल्याणासाठी, एक सातकलमी धोरण आखले आहे. यामध्ये शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे म्हणून विविध गंभीर आणि संभाव्य घटकांचा समावेश आहे. उत्पादन खर्चाचा प्रभावीपणे वापर करून शेतजमिनीचे प्रति एकक उत्पादन वाढविणे; कापणीनंतरचे नुकसान कमी करणे आणि मूल्यवर्धित करणे; महत्वाच्या जोखमींवर सुरक्षा संरक्षण मिळण्यासाठी शेतीच्या विपणनामध्ये सुधारणा करणे; फलोत्पादन, पशुपालन, मत्स्यपालन, मधमाशी पालन, कुक्कुट पालन व एकात्मिक शेती यासारख्या विविध संलग्न कार्यांना चालना देण्यासाठी विशेष लक्ष केंद्रित करणे; यांसारख्या महत्वाच्या मुद्द्यांचा या धोरणात समावेश आहे.

### विपणन मंत्र

नुकत्याच झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्प २०१८-१९ मध्ये सरकारने एक महत्वाचे आणि बहुइच्छित पाउल उचलले. २३ महत्वाच्या रब्बी आणि खरीप पिकांना त्यांच्या उत्पादन मूल्यांच्या किमान दीडपट रक्कम किमान आधारभूत किंमत म्हणजे एम एस पी म्हणून जाहीर केली. तथापि या घोषणेच्या समर्थनार्थ अशी यंत्रणा बनविणे आवश्यक होते की, एखाद्या शेती उत्पादनाची किंमत खुल्या बाजारात एम एस पी पेक्षा कमी झाली तरीही त्या उत्पादनाची खरेदी एम एस पी लाच झाली पाहिजे. याची दखल घेवून नीती आयोगाने, केंद्र आणि राज्य सरकारच्या सल्ल्याने, बाजाराच्या अशा विरूद्ध परीस्थितीतही शेतकऱ्यांचे कल्याण पाहील, अशा प्रकारची यंत्रणा विकसित करणे अनिवार्य केले आहे, काही विशिष्ट परीस्थितीमध्ये शेतकऱ्यांचे अतिरीक्त उत्पादन विकत घ्यायलाही सरकार वचनबध्द असते. बाजारातील चढउतारांच्या वेळी आठ शेती उत्पादनांची किंमत मूल्य रोखून ठेवण्याचा धोका पत्करून मध्यप्रदेश सरकारने 'भावांतर भुगतान योजना' म्हणजेच किंमतीतील तुटीची वित्तपुरवठा

योजना सुरू केली होती. त्याचप्रमाणे, या योजनेच्या प्राथमिक अहवालाला प्रोत्साहन देवून इतर राज्यांनाही अशाप्रकारची योजना राबविण्याविषयी सुचविले होते. किंमती आणि मागणीचा अंदाज याचा विचार करून,योग्य धोरणे आणि पद्धती विकसित करणे, वायदा आणि पर्यायी बाजाराचा उपयोग करणे, गोदाम जमा प्रणालीचा विस्तार करणे, विशिष्ट आयात निर्यात संबंधींच्या मुद्द्यांबाबत वेळेवर निर्णय घेणे, या बाबींवर सरकारचे काम सुरू आहे

देशातील ८५ टक्यांहून जास्त शेतकरी लहान आणि किरकोळ श्रेणीत बसतात, ज्यांच्याजवळ विक्रीयोग्य अतिरिक्त माल, कमी असतो, त्यामुळे त्यांना जास्त व्यवहार खर्च सहन करावा लागतो. त्यामुळे सरकारने सन २०१५ मध्ये इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषि बाजार ( इ - एन ए एम) सुरू केला आहे. परवाना आणि परताव्यासाठी अडथळे दूर करणे आणि शेतकऱ्यांकडून मिळणाऱ्या परताव्यात वाढ करणे हे याचे उद्दीष्ट आहे. आतापर्यंत १६ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांच्या ५८५ कृषि उत्पन्न बाजार समित्या (ए पी एम सी), या ९० शेती वस्तूंचा ऑनलाईन व्यापार चालणाऱ्या मंचामध्ये सामील झाल्या आहेत. सध्या ९९ लाखांपेक्षा जास्त शेतकरी आणि एक लाख व्यापारी या, प्रादेशिक भाषेतही व्यवहार होणाऱ्या सेवेचा, लाभ घेत आहेत. जे शेतकरी ए पी एम सी ला संलग्न नाहीत ते या इ - एन ए एम सेवेच्या फायद्यांपासून वंचित राहिले. नुकताच सरकारने या दिशेने एक महत्वाचा निर्णय घेतला, तो म्हणजे खेडेगावातील २२,००० छोट्या बाजारांचे रूपांतर ग्रामिण कृषि बाजारात (जी आर ए एम एस) मध्ये करण्यात आले. हे जी आर ए एम एस इलेक्ट्रॉनिक पद्धतीने इ - एन ए एम ला जोडण्यात येतील, तसेच त्यांना ए पी एम सी च्या नियमांतून सूट देण्यात येइल. यामुळे दुर्गम भागातील शेतकऱ्यांनाही इ - एन ए एम सेवेमध्ये प्रवेश मिळून फायदा घेता येइल. सरकारने नुकताच या कारणासाठी २,००० कोटी रूपयांचा कृषि बाजार पायाभूत निधी मंजूर केला आहे.

शेतकरी कल्याण आणि समृद्धीचा आणखी एक प्रमुख कार्यक्रम म्हणजे, 'प्रधानमंत्री किसान संपदा योजना'. यामध्ये विपणन सहाय्यासह प्रक्रिया आणि मूल्यवर्धन सुविधा दिल्या जातात. या योजनेचा फायदा २० लाख शेतकऱ्यांना होईल असा अंदाज असून, यामुळे वर्ष २०१९-२० पर्यंत ५ लाख लोकांना, प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, आणि सुमारे ३१,४०० कोटी रूपये इतक्या गुंतवणुकीचा फायदा होईल. या योजनेमुळे मेगा फुड पार्क उभारले आणि चालविले जातील, एकात्मिक शीतसाखळ्या आणि मुल्यवर्धित पायाभूत सुविधा यांचा विस्तार केला जाईल, अन्नप्रक्रिया आणि जतन यांच्या क्षमतेचा विस्तार होईल, कृषि प्रक्रिया समूहांसाठी पायाभूत सुविधांचा विकास, तसेच शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी मागास आणि पुढारलेले यांच्यामध्ये संपर्क निर्माण केला जाईल. विविध कर प्रोत्साहन उपलब्ध करून देवून, १००% थेट परदेशी गुंतवणुकीला परवानगी देवून, कृषि प्रक्रिया एककांना सहज कर्ज उपलब्ध होण्यासाठी नाबार्ड कडून २००० कोटींचा विशेष निधी उपलब्ध करवून, इत्यादी मार्गांनी सरकार, अन्नप्रक्रिया विभागाला प्रोत्साहन देत आहे. शेतकरी मोठ्या प्रमाणात टॉमेटो, कांदे, आणि बटाटे यांची लागवड करतात. या भाज्या देशभरात वर्षभर खाल्ल्या जाणाऱ्या महत्वाच्या भाज्या आहेत. मात्र या भाज्या नाशवंत असल्यामुळे, हंगामी आणि प्रादेशिक उत्पादनात परिवर्तनशीलता आणल्याने शेतकरी आणि ग्राहकांना त्रास होवू शकतो. या पार्श्वभूमीवर, सरकारने नुकतीच ५०० कोटी रूपयांची, 'ऑपरेशन फ्लड' च्या धर्तीवर 'ऑपरेशन ग्रीन' ही योजना सुरू केली आहे. यामध्ये, शेतीची उपकरणे, प्रक्रिया सुविधा, पिकाच्या विपणनासाठी व्यावसायिक व्यवस्थापन, या गोष्टींना प्रोत्साहन देवून शेतकरी आणि ग्राहकांचे रक्षण केले जाते. याशिवाय कृषि वस्तूंच्या निर्यातीच्या बाबतीत उदारीकरणामुळे शेतकरी निर्यात-केंद्रित शेतीकडे वळले आहेत.

---

**शेतकरी कल्याण आणि समृद्धीचा आणखी एक प्रमुख कार्यक्रम म्हणजे, 'प्रधानमंत्री किसान संपदा योजना'. यामध्ये विपणन सहाय्यासह प्रक्रिया आणि मूल्यवर्धन सुविधा दिल्या जातात. या योजनेचा फायदा २० लाख शेतकऱ्यांना होईल असा अंदाज असून, यामुळे वर्ष २०१९-२० पर्यंत ५ लाख लोकांना, प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, आणि सुमारे ३१,४०० कोटी रूपये इतक्या गुंतवणुकीचा फायदा होईल.**

---

### शेतकऱ्यांना वित्तपुरवठा

जरी विविध बँक सुधारणा झाल्या तरी शेतीसाठी आवश्यक असलेली कर्जे विविध संस्थांकडून घेताना, शेतकऱ्यांना विविध आव्हानांना सामोरे जावे लागते. त्यामुळे, कृषि विभागासाठी देण्यात येणाऱ्या संस्थात्मक कर्जाच्या आकारात सरकार सातत्याने वाढ करत आहे. हे २०१४-१५ मध्ये ८.५ लाख कोटी इतके होते तर आता ११ लाख कोटी इतके आहे. आता किसान क्रेडीट कार्डाची सुविधा

मत्स्यव्यवसाय आणि पशुसंवर्धन करणाऱ्या शेतकऱ्यांनाही त्यांच्या

भांडवली गरजा भागविण्या साठी मिळू शकते. त्याशिवाय, कमी मुदतीच्या पीक कर्जासाठी व्याज अनुदान, कृषिपूरक कर्जात वाढ, आणि सामूहिक जबाबदारी गटांना प्रोत्साहन या, पात्र शेतकऱ्यांना वेळेवर आणि सुलभ कर्ज मिळावे म्हणून सरकारने केलेल्या आणखी काही उपाययोजना. सहकारी सोसायट्या आणि त्यांच्या सदस्यांना

आर्थिक सहाय्य प्राप्त होण्यासाठी सरकारने, राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाच्या अनुदानात लक्षणीय वाढ केली आहे.

सध्या बहुसंख्य शेतकरी हे जमिनीचे मालक नसून जमिन भाडेतत्वावर घेवून कसणारे लाभार्थी शेतकरी असतात. त्यामुळे त्यांना पीक कर्ज उपलब्ध होत नाहीत. म्हणून या भाडेतत्वावर शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना पारंपरिक सावकारांकडून जास्त दराने आणि जाचक अटींवर कर्ज घेणे भाग पडते. या संकटावर मात करण्यासाठी भारत सरकारच्या सूचनेनुसार, नीती आयोगाने, शेतजमीन भाडेतत्वावर देण्यासंबंधी एक आदर्श कायदा विकसित करण्यासाठी एक तज्ञ समिती स्थापन केली होती. अशा प्रकारे लाभार्थी शेतकऱ्यांना फायदेशीर असा 'आदर्श शेतजमीन भाडे करार कायदा, २०१६' अस्तित्वात आला. आता शेती आणि संबंधित उपक्रमांसाठी शेतजमीन भाड्याने देणे हा जमीनमालक आणि लाभार्थी शेतकरी यांच्यामधील कायदेशीर करार असतो. अशा प्रकारे जमिनीचा भाडेकरू, आर्थिक संस्थांकडून कर्ज घेवू शकतो तसेच, पीक विमा, आपत्ती निवारण इत्यादी केंद्र तसेच राज्य सरकारने देवू केलेले फायदेही त्याला मिळू शकतात.

संबंधित छोट्या धारकांचे उत्पन्न वाढावे म्हणून त्यांच्या विविध उपक्रमांना उत्तेजन देवून, शेतकरी उत्पादक संस्था (एफ पी ओ) तसेच महिला स्व-मदत गटांना सरकार प्रोत्साहन देत असते. सहकारी समितींच्या तत्वावर स्थापन झालेले आणि वार्षिक व्यवहार १०० कोटींपेक्षा कमी असलेल्या शेतकरी उत्पादक संस्थांना आयकरामध्ये सूट आहे.

## सुरक्षित उदरनिर्वाहाकडे

शेतकऱ्याच्या उदरनिर्वाहाला किंवा उत्पन्नाला धोकादायक ठरणारे घटक म्हणजे, विविध नैसर्गिक आपत्ती, किड्यांचा हल्ला आणि रोग पसरणे,

**कृषि विज्ञान केंद्रांच्या दूरवर पसरलेल्या जाळ्यामार्फत, प्रगत तंत्रज्ञानाने हवामान ओळखून, क्षेत्र स्तरावर नियमितपणे प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिके दिली जातात. कृषि विज्ञान केंद्रांनी, १५१ गावे हवामान दृष्ट्या स्मार्ट गावे म्हणून प्रमाणित केली आहेत; ती गावे आता इतर गावांसाठी आणि शेतकऱ्यांसाठी आदर्श गावे म्हणून काम करतात. याशिवाय शाश्वत शेतीसाठी राष्ट्रीय मिशन (नॅशनल मिशन फॉर सस्टेनेबल ॲग्रीकल्चर) ही संस्था हवामान बदलासंबंधित माहिती आणि ज्ञान वेळोवेळी प्रसारीत करीत असते.**

तसेच हवामानातील विविध बदल. अशा प्रकारच्या संकटांचा परीणाम शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहावर होऊ नये म्हणून, पिकांना जास्तीत जास्त संरक्षण देणारी आणि विम्याचा हप्ताही कमी असणारी नवीन सुधारीत प्रधानमंत्री फसल बीमा योजना २०१६ चा शुभारंभ झाला. या योजनेच्या विम्याच्या हप्त्यामध्ये शेतकऱ्याचा सहभाग अगदी कमी म्हणजे, रब्बी पिकांसाठी १.५ %, खरीप पिकांसाठी २% आणि वार्षिक बागायती पिकांसाठी ५% इतका आहे. या योजनेमध्ये विमा संरक्षण वाढविले असून त्यामध्ये हंगामानंतरची जोखीम तसेच १४ दिवसांपर्यंत नुकसानाचा समावेश आहे. वैयक्तिक शेतकरी पातळीवरच्या मूल्यांकनासाठी, पूर किंवा जलप्रलयासारख्या आपत्तीचा समावेशही स्थानिक आपत्ती म्हणून केला आहे. अचूकता आणि पारदर्शकता वाढावी यासाठी दूरस्थ संवेदी तंत्रज्ञानाचा वापर तसेच आयटी साधनांनी दावे देण्याचे प्रमाण वाढवले आहे. २०१८-१९ च्या केंद्रीय अर्थसंकल्पाच्या वाटपामध्ये शेतकऱ्यांना अनुकूल अशा तरतुदींनी सज्ज पीक विमा योजनेसाठीची रक्कम १३००० कोटींपर्यंत वाढविण्यात येणार आहे.

दुसऱ्या बाजूने हवामान बदलाच्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी आणि आपला उदरनिर्वाह सही सलामत ठेवण्यासाठी, सर्व पर्यावरणीय क्षेत्रातील शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. ६२३ जिल्ह्यांसाठी विकसित करण्यात आलेल्या जिल्हा आपत्ती योजना, मुख्य भागधारक म्हणून शेतकऱ्याला सहभागी करून घेवून, संपूर्ण देशभरात प्रसारीत करण्यात येत आहेत. कृषि विज्ञान केंद्रांच्या दूरवर पसरलेल्या जाळ्यामार्फत, प्रगत तंत्रज्ञानाने हवामान ओळखून, क्षेत्र स्तरावर नियमितपणे प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिके दिली जातात. कृषि विज्ञान केंद्रांनी, १५१ गावे हवामान दृष्ट्या स्मार्ट गावे म्हणून प्रमाणित केली आहेत; ती गावे आता इतर गावांसाठी आणि शेतकऱ्यांसाठी आदर्श गावे म्हणून काम करतात. याशिवाय शाश्वत शेतीसाठी राष्ट्रीय मिशन (नॅशनल मिशन फॉर सस्टेनेबल ॲग्रीकल्चर) ही संस्था हवामान बदलासंबंधित माहिती आणि ज्ञान वेळोवेळी प्रसारीत करीत असते.

एकीकृत शेती मॉडेल किंवा प्रणाली ही, फलोत्पादन,पशुपालन आणि

मत्स्यपालन याबरोबरच शेतातील पिकाला योग्य आणि समन्वययुक्त असून, तिचा अवलंब केल्यास, प्रतिकूल परीस्थितीतही शेतकऱ्याचा उदरनिर्वाह सुरक्षित राहू शकतो., शेतीच्या या नव्या दृष्टीकोनामुळे, जमिनीच्या प्रती एकक फायद्यात वाढ होते, तसेच, शेतीच्या कुठल्या ना कुठल्या प्रकारातून उत्पन्नाची खात्री असल्यामुळे, धोका कमी होतो. गेल्या ४ वर्षात शास्त्रज्ञांनी, विविध कृषि पर्यावरणीय विभागातील, लहान आणि किरकोळ शेतकऱ्यांना योग्य ठरतील असे, ३१ एकीकृत शेतीचे आदर्श प्रकार विकसीत आणि मान्य केले आहेत. गाव पातळीवर हे शेतीचे आदर्श प्रकार लोकप्रिय करण्यासाठी, देशभरात ठिकठीकाणी प्रात्यक्षिके आयोजित करण्यात येत आहेत. या बहुतेक सर्व आदर्श प्रकारांचा फलोत्पादन हा मुख्य घटक असला तरीही, त्याची क्षमता जास्त असल्यामुळे, शेतकऱ्यांच्या उत्पन्नाच्या वाढीसाठी, या प्रकारांचा स्वतंत्रपणेही विचार केला जाऊ शकतो.

फलोत्पादनाचे एकात्मिक विकास हे नवीन अभियान अतिशय व्यापक असून, फलोत्पादनामध्ये यांत्रिकीकरण, शीतगृह साखळी आणि मूल्य साखळीचा विकास, योग्य तंत्रज्ञानाचा विकास आणि हस्तांतरण, तसेच दर्जेदार लावणी सामग्रीची उपलब्धता यासारख्या घटकांना संपूर्णपणे पाठींबा देते. उत्पादनापासून ते विपणनापर्यंतची संपूर्ण साखळी एका ठिकाणी विकसित करून, बागायती पिकांच्या लागवडीत एकत्रित नवीन दृष्टीकोन हा फायदेशीर सिद्ध झाला आहे

## स्वरूप बदलणारी - सेंद्रीय शेती

वाढत्या आरोग्यविषयक समस्यांमुळे आपल्या अन्न प्राधान्यांमध्ये एक बदल घडला असून ते आता सेंद्रीय उत्पादनांकडे झुकले आहे. हा कल भारतात तसेच परदेशातही वाढत असल्यामुळे, सेंद्रीय उत्पादनांच्या किंमती वाढत चालल्या आहेत. सुदैवाने भारताचे हवामान आणि सामाजिक- आर्थिक परीस्थिती सेंद्रीय शेतीला अनुकूल आहे, आणि शेतकऱ्यांना प्रोत्साहन देवून तसेच, बाजाराच्या बाबतीत आवश्यक तो पाठींबा देवून, आपण याचा पुरेपुर उपयोग करून घेवू शकतो. याची दखल घेवून, भारत सरकारने, सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि सेंद्रीय उत्पादनांसाठी बाजारपेठांचे जाळे विकसित करण्यासाठी 'परंपरागत कृषि विकास योजना' सुरू केली

**फलोत्पादनाचे एकात्मिक विकास हे नवीन अभियान अतिशय व्यापक असून, फलोत्पादनामध्ये यांत्रिकीकरण, शीतगृह साखळी आणि मूल्य साखळीचा विकास, योग्य तंत्रज्ञानाचा विकास आणि हस्तांतरण, तसेच दर्जेदार लावणी सामग्रीची उपलब्धता यासारख्या घटकांना संपूर्णपणे पाठींबा देते. उत्पादनापासून ते विपणनापर्यंतची संपूर्ण साखळी एका ठिकाणी विकसित करून, बागायती पिकांच्या लागवडीत एकत्रित नवीन दृष्टीकोन हा फायदेशीर सिद्ध झाला आहे.**

आहे. समूहावर आधारीत दृष्टिकोन कार्यान्वित केला गेला. त्यामध्ये, ५० शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांच्या ५० हेक्टर जमिनीवर एकत्रितरित्या, बाजारात सेंद्रीय उत्पादन म्हणून मागणी असलेल्या बागायती पिकांची लागवड केली. प्रत्येक शेतकऱ्याला ३ वर्षासाठी ५०,००० रूपयांची आर्थिक मदत पुरविण्यात आली. या व्यतिरिक्त सेंद्रीय समूहाला त्यांच्या उत्पादनांचे संकलन आणि वाहतुकीसाठी तरतूद म्हणून रू १,२०,००० इतकी आर्थिक मदत देण्यात आली. या वर्षाअखेर पर्यंत १०,००० सेंद्रीय समूहांचे लक्ष्य साध्य करण्यासाठी, गेल्या ४ वर्षात सरकारने या योजनेअंतर्गत रू. ९४७ कोटी वितरीत केले आहेत. हे सेंद्रीय समूह, आदिवासी, पावसाळी, डोंगराळ आणि दुर्गम भागात, तेथील वंचित शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विशेष विकसित करण्यात आले.

सेंद्रीय पद्धतीमध्ये लागवडीचा खर्च २०% ने कमी होतो, त्यामुळे निव्वळ नफ्यामध्ये २०% ते २५% ने वाढ होते. बरीचशी अनुकूल परिस्थिती लक्षात घेऊन सरकारने ईशान्य विभागात सेंद्रीय मूल्य साखळी विकासासाठी 'मिशन' ही ४०० कोटी रूपयांची ३ वर्षांची (२०१५-२०१८) योजना सुरू केली. सन २०१६ मध्ये सिक्कीम हे भारतातील पहिले सेंद्रीय राज्य म्हणून घोषित करण्यात आले, आणि त्यानंतर ईशान्येकडच्या राज्यांना मोठ्या प्रमाणात सेंद्रीय शेती करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. ईशान्येचा प्रदेश हा सेंद्रीय उत्पादनासाठी भारतीय केंद्र म्हणून वेगाने उदयाला येत असून, आता निर्यातीकडे लक्ष लागले आहे.

## उत्पन्नात वाढ

विविध तांत्रिक अहवालांना अनुसरून, सरकार, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची खात्री असलेल्या विविध शेतीविषयक उपक्रमांवर लक्ष केंद्रीत करत आहे. वाढीव अर्थपुरवठा आणि एकात्मिक मधमाशी पालन विकास केंद्रांची स्थापना यामुळे मध उत्पादनाला चालना मिळाल्यामुळे, मध उत्पादनाने गेल्या ४ वर्षात एक नवा उच्चांक गाठला आहे. मध उत्पादनाचा एखादा छोटा, ५० खोक्यांचा उपक्रमही, शेतकऱ्याच्या नियमित उत्पन्नात २ ते अडीच लाख रूपयांची भर घालू शकतो. त्याचप्रमाणे, बांबू, त्याच्या प्रचंड व्यावसायिक क्षमतेमुळे, हिरवे सोने म्हणून ओळखला जातो.

बांबूला, त्याचे बिगर वन विभागातही वृक्ष म्हणून वर्गीकरण असल्यामुळे खूप संघर्ष करावा लागला आहे. सरकारने तो 'गवत' म्हणून पुन्हा वर्गीकृत केला आणि तो वनक्षेत्राच्या बाहेर काढला, त्यानंतर शेतीसाठी, कापणीसाठी, वाहतूक आणि हस्तकलेसाठी कच्चा माल म्हणून त्याचा वापर होऊ लागला. बांबू क्षेत्राला समग्र पद्धतीने प्रोत्साहन देण्यासाठी, नुकताच पुनर्रचना केलेला १२९० कोटी रूपयांचा, 'राष्ट्रीय बांबू अभियान' हा प्रकल्प सुरू झाला. मश्रूम हे त्याच्या उच्च मागणीमुळे आणि घरगुती आणि परदेशी बाजारपेठांमध्ये मिळत असलेल्या फायदेशीर किंमतीमुळे, प्रचंड व्यावसायिक क्षमता असलेले आणखी एक पीक. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी, घरामध्ये, मर्यादित साधनांमध्ये मश्रूम वाढविण्यासाठी, आर्थिक आणि तांत्रिक सहाय्य दिले जाते. शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळावे यासाठी, घराच्या मागच्या अंगणात, कुक्कुटपालन, बकरे आणि डुक्कर पालन, तसेच तलावातील मत्स्यपालन याला सरकार प्रोत्साहन देत आहे. 'मेरा गाव मेरा गौरव' या एका अभिनव योजनेअंतर्गत, कृषि शास्त्रज्ञ ४-४ जणांचे गट करून, शेतीमधील नवीन तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक आणि नवीन उपक्रमासाठी ५ गावे निवडतात आणि दत्तक घेतात. शेतकऱ्यांना त्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी ज्ञान, कौशल्य आणि माहिती यांनी सशक्त बनविले जाते.


शेतकरी कल्याणाच्या दिशेने आणखी एक पाउल म्हणजे, शेतकऱ्यांनी त्यांच्या उपयोगात नसलेल्या जमिनीवर सौर उर्जेचे उपकरण बसवावे म्हणून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी रूपरेषा बनविण्याचे, सरकारचे काम सुरू आहे. यामुळे दुहेरी उद्देश साध्य होइल, एक म्हणजे सौर पंप बसवून शेताला सिंचन मिळेल, तसेच निर्माण झालेल्या अतिरिक्त उर्जेचा पुरवठा ग्रीडला केल्यास उत्पन्नात वाढ होईल. वितरण कंपन्या किंवा परवानाधारकांकडून वाजवी रकमेच्या दरांवर सौर ऊर्जा खरेदी करीता एक यंत्रणा स्थापण्यासाठी, राज्य सरकारांना, प्रोत्साहन दिले जात आहे.

योग्य धोरणे आखणे, व्यवहार्य कार्यक्रम राबविणे आणि योग्य बजेट वाटप याद्वारा, सन २०२२ पर्यंत शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट व्हावे या ध्येयाचा, भारत सरकार प्रामाणिकपणे पाठपुरावा करत आहे. मात्र, आहे तेवढ्याच शेतजमिनीपासून अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी, राज्य सरकारे, सहकारी संस्था, शेतकरी संघटना, संबंधित उद्योग आणि शेतकरी या सर्वांनी एकमताने आणि समन्वयाने, हे ध्येय समजून काम केले पाहिजे.

■■■

*लेखक भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या हिंदी प्रकाशनांचे माजी मुख्य संपादक असून विज्ञान संवादक आहेत.*

*ई मेल: jgdsaxena@gmail.com*




## India 2018/भारत २०१८

भारत सरकारच्या प्रकाशन विभागाच्या वतीने हिंदी आणि इंग्रजी भाषेत दरवर्षी प्रकाशित केली जाणारी संदर्भ पुस्तिका India 2018/भारत २०१८ विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रकाशन विभागाच्या सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील कार्यालयात हे बहुप्रतीक्षित प्रकाशन विक्रीसाठी ठेवण्यात आले असून त्याची किरकोळ विक्री किंमत रु.३५० इतकी आहे. एकाच वेळी तीन किंवा जास्त पुस्तिका खरेदी करणाऱ्यांना आकर्षक सवलत दिली जाणार आहे. किमतीएवढ्या रकमेचा डीडी अथवा मनी ऑर्डर 'Business Manager, Publications Division, Mumbai' च्या नावे पाठविल्यास पुस्तिका रजिस्टर पोस्टाने घरपोच पाठविल्या जातील. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी पुढील पत्त्यावर संपर्क साधावा-

Business Manager, Sales Emporium, Publications Division,
701, 'C' Wing, 7th Floor, Kendriya Sadan, Sector 10,
CBD Belapur, Navi Mumbai-400614.
Ph.No. 022-27570686, Email: dpdsenavimumbai@gmail.

उपाय

# पेयजल पुरवठा, स्वच्छतेबाबत महाराष्ट्राची आघाडी

- बबनराव लोणीकर



**महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्रालयाने मागील साडेतीन वर्षाच्या कालखंडात भरीव कामगिरी केली आहे. गावागावांमध्ये पिण्याचे स्वच्छ पाणी पोहचविण्याबरोबरच मोठ्या प्रमाणावर शौचालये उभारुन राज्याला हागणदारी मूक्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. स्वच्छतेसंबंधीत या कामांमुळे नागरिकांचे आरोग्य सूधारण्यासही मदत होत आहे.**

पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्रालयाने मागील साडेतीन वर्षांत पेयजल आणि स्वच्छतेबाबत उल्लेखनीय कामगिरी केली. प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, जलयुक्त शिवार अभियानाच्या प्रभावी अंमलबाजवणीतील योगदान महत्वाचे आहे.यातील काही महत्वपूर्ण निर्णय व कामगिरीचा आढावा थोडक्यात पुढीलप्रमाणे.

**जलस्वराज्य-२ कार्यक्रम**

महाराष्ट्रातील प्रत्येक गाव, खेडे, वाड्या वस्त्यांना शाश्वत पाणी पुरवठा व्हावा, यासाठी प्रत्येक गावाला पाणी पुरवठा योजना देऊन गाव टंचाई मुक्त आणि टँकर मुक्त करण्याचा निर्धार असून त्या दृष्टीने गेल्या साडेतीन वर्षात अनेक पाणी पुरवठा योजना सुरु करण्यात आल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून राज्यात जागतिक बँकेच्या सहाय्याने जलस्वराज्य-२ कार्यक्रम ६ वर्ष (२०१४-२०२०) कालावधी करिता राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाचा खर्च १२८४ कोटी रुपये इतका आहे. राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता सेवा सुविधांचे नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण व शाश्वतता इत्यादी बाबी साध्य करणे हे जलस्वराज्य-२ कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.

जागतिक बँकेकडून मिळणारे अर्थसहाय्य हे 'प्रोग्राम फॉर रिझल्ट' या वित्तीय साधनांतर्गत उपलब्ध होणार असून उद्दिष्टपुर्ती आधारित निधी संवितरण निर्देशकांशी (Disbursement Linked Indicators-DLI)निगडीत आहे. असा उपक्रम राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

**जलस्वराज्य – २ कार्यक्रमांतर्गत राबविले जाणारे उपक्रम :**

जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत १२ जिल्ह्यांमध्ये सहा महसूल विभागातील प्रत्येकी २ या प्रमाणे राबवली जात आहे. या १२ जिल्ह्यांची निवड क्षेत्रीय आव्हानांनुसार पारदर्शकरित्या पूर्वनियोजित निकषांद्वारे केलेली आहे. सदर जिल्हे खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | विभाग | जिल्हे |
|---|---|---|
| १ | अमरावती | अमरावती, बुलढाणा |
| २ | औरंगाबाद | औरंगाबाद, नांदेड |
| ३ | कोकण | रायगड, रत्नागिरी |
| ४ | नागपूर | नागपूर, चंद्रपूर |
| ५ | नाशिक | जळगाव, अहमदनगर |
| ६ | पुणे | पुणे, सातारा |

जलस्वराज्य-२ कार्यक्रमामधील भौतिक गुंतवणूक मुख्य तीन घटकांतर्गत करण्यात येणार आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्राचे

बळकटीकरण. शहरालगतच्या भागातील जनतेला वाढीव पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या सेवा सुविधा पुरविणे. पाणी गुणवत्ता बाधित गावे वाड्या/वस्त्यांसाठी कमी खर्चाच्या रासायनिक दूषितीकरण सौम्य करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना.दुर्गम किंवा पाणी टंचाई असलेल्या भागांमध्ये पर्जन्यजल साठवण उपाययोजना आणि अतिशोषित पाणलोट क्षेत्रामध्ये जलधर स्वरावर पाणी व्यवस्थापन विकसित करणे.

अ) शहरालगतच्या भागातील जनतेला वाढीव पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या सेवा सुविधा पुरविणे (Peri-Urban Scheme)

जलस्वराज्य-२ कार्यक्रम मागणी आधारित तत्वावर असून राज्यातील १२ जिल्ह्यांसाठी प्रत्येकी रु.५० कोटी अंदाजे इतक्या रकमेच्या पाणी पुरवठा योजना हाती घेण्यात येत आहेत. शहरालगतच्या ग्रामपंचायती निश्चित करुन ७० लि. दरडोई दरदिवशी पाणी पुरवठा सेवा उपलब्ध करुन देण्याबाबतच्या सुधारित/नवीन पाणी पुरवठा उपाय योजनांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.शहरालगतच्या योजनेमध्ये स्वयंचलीत जलमापकासह १०० टक्के वैयक्तिक नळ जोडण्या देणे, या नळ जोडण्याद्वारे दिवसातून किमान ८ तास व ७ मिटर दाबाने शुद्ध पाणी पुरवठा करणे इत्यादी बाबींचा समावेश आहे.सदर योजनेच्या कामांची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत व सामाजिक उपक्रम जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे.शहरालगतच्या भागातील रु. ५०८.६० कोटी किंमतीच्या ५९ योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. यामध्ये एकूण ८६१६५ नळ जोडण्या अपेक्षित आहेत. ५९ योजनांपैकी ५० योजनांचे कार्यादेश देण्यात आले आहेत. यातील ४४ योजनांची कामे भौतिकदृष्ट्या सुरु करण्यात आलेली आहेत. ९ योजनांची निवीदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे.



**सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत उपाय योजना करण्यात येत आहेत. १२ जिल्ह्यातील ५०० पेक्षा कमी लोकसंख्येची १०२ टंचाईग्रस्त गावे हाताळावयाची असून सदर गावांना टंचाई कालावधीसाठी शुद्ध व शाश्वत पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत १०२ गावे अंतिम करण्यात आली आहेत. उपरोक्त १०२ योजनांपैकी ९४ योजनांच्या अंमलबजावणीसाठी कार्यादेश देण्यात आले. त्यापैकी ६३ योजना पुर्ण झाल्या असून ३१ योजना प्रगतीपथावर आहेत. प्रगतीपथावरील ३१ योजना जागेच्या अडचणीमुळे प्रलंबित असून जून २०१८ अखेर पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.**

ब) ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या टंचाईग्रस्त (Water Stressed)गावांसाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत उपाय योजना करण्यात येत आहेत. १२ जिल्ह्यातील ५०० पेक्षा कमी लोकसंख्येची १०२ टंचाईग्रस्त गावे हाताळावयाची असून सदर गावांना टंचाई कालावधीसाठी शुद्ध व शाश्वत पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत १०२ गावे अंतिम करण्यात आली आहेत.उपरोक्त १०२ योजनांपैकी ९४ योजनांच्या अंमलबजावणीसाठी कार्यादेश देण्यात आले. त्यापैकी ६३ योजना पुर्ण झाल्या असून ३१ योजना प्रगतीपथावर आहेत. प्रगतीपथावरील ३१ योजना जागेच्या अडचणीमुळे प्रलंबित असून जून २०१८ अखेर पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

क) पाणी गुणवत्ता (Water Quality)बाधित गावे/वाड्या/वस्त्यांसाठी कमी खर्चाच्या रासायनीक दुषितीकरण सौम्य करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

या उपक्रमात ११२ गावांची निवड अंतिम करण्यात आली असून ४६ ठिकाणी विविध क्षमतेचे आर.ओ. युनीट आणि ४० ठिकाणी डीफ्लोरिडेशन युनीट बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. याकरिता पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांच्यामार्फत कार्यादेश देण्यात आले आहेत.उपरोक्त ११२ योजनांपैकी ८६ योजनांच्या अंमलबजावणीसाठी कार्यादेश देण्यात आले. त्यापैकी ४३ योजना पूर्ण झाल्या असुन ३६ आर.ओ. व ७ डीफ्लोरिडेशन योजना प्रगतीपथावर आहेत.प्रगतीपथावरील ४३ योजना ऑगस्ट २०१८ अखेर पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

ड) प्रयोगशाळा बळकटीकरण (WQ Labs)

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या अधिपत्याखालील सहा विभागीय प्रयोगशाळांमार्फत पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची गुणवत्ता तपासणी केली जाते. जलस्वराज्य २ अंतर्गत या ६ विभागीय प्रयोगशाळांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे. राज्यातील यंत्रणे मार्फत संचलित ६ विभागीय प्रयोगशाळांना राष्ट्रीय अधिस्विकृती प्रयोगशाळा तपासणी व अधिशोषण बोर्ड (NABL Accreditation Certificate)प्राप्त झालेले आहे.

**मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम**

गाव टंचाईमुक्त व्हावे यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. हा कार्यक्रम सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या चार वर्षासाठी राबविण्यात येणार आहे. त्याकरिता २५०० कोटींची तरतुद करण्यात आली आहे. या कार्यक्रमातून १००३ नवीन ग्रामीण पाणीपुरवठा योजना राबविण्याचे प्रस्तावित असून ८३ प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजना पुनरुजिवीत करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. याशिवाय ५३१ ग्रामीण योजनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी प्रत्येक वर्षी १०० कोटी याप्रमाणे चार वर्षासाठी ४०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

**राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम**

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमाची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्यातील अंशत: हाताळलेल्या व गुणवत्ता बाधीत गावे/वाड्यांसाठी उपलब्ध निधी विचारात घेऊन वार्षिक कृती आराखडा तयार करण्यात येतो. या आराखड्यास राज्यस्तरीय योजना मंजूर समितीची मान्यता घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत मागील तीन



वर्षात ६,५१६ गावे/वाड्यांना पेय जलसुविधा निर्माण करण्यात आलेल्या. त्यासाठी ३,४८७ कोटी खर्च करण्यात आला. सन २०१७-१८ या वर्षाच्या कृती आराखड्यात प्रगती पथावरील १,३४९ गावे/वाड्या व नवीन २,७३२ गावे/वाड्यांचा समावेश असून त्यासाठी रु.८१४.४४ कोटी एवढ्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

**वॉटरग्रीड योजना**

मराठवाड्यातील जनतेला पाणी टंचाईशी सामना करावा लागू नये यासाठी गुजरात, तेलंगणा येथील वॉटरग्रीड प्रकल्पाप्रमाणे मराठवाडा वॉटरग्रीड योजना राबविण्यास मुंजरी देण्यात आली आहे. मराठवाड्यातील एकूण १२ हजार ९७८ गावांपैकी ९ हजार ७०८ गांवाना नळ पाणी योजना उपलब्ध करण्यात आली आहे. या गावासह मराठवाडयातील ७९ शहरांचाही यात समावेश असणार आहे. सन २०५० मध्ये पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाची आखणी करण्यात आली आहे.या प्रकल्पाचा जलस्त्रोत जायकवाडी, एलदरी, सिध्देश्वर, माजलगाव, मांजरा,उर्ध्व पैनगंगा, निम्न तेरणा,निम्न मनार, विष्णुपुरी, निम्न दुधना, सिना कोळेगाव, खडकपूर्णा,उजनी असा आहे. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च १५ हजार कोटी रूपये आहे. ग्रामीण जनतेला सुरक्षित शुद्ध पाणी पुरवठा करण्यात येणार आहे.

**हागणदारी मुक्त महाराष्ट्र**

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) ही केंद्र पुरस्कृत योजना असून पेयजल व स्वच्छता मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग अंतर्गत राबविण्यात येत आहे.

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत संपूर्ण देश हागणदारी मुक्त करण्याची घोषणा मा. पंतप्रधान यांनी केली. तथापि राज्यातील हागणदारी मुक्त ग्राम पंचायतींची प्रगती पहाता मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्र मार्च २०१८ अखेर हागणदारीमुक्त करण्याची घोषणा केली. त्यानुसार १७ एप्रिल २०१८ रोजी राज्यातील सर्व जिल्हे, ३५१ पंचायत समित्या व २७,६६७ ग्राम पंचायती हागणदारी मुक्त झाल्या आहेत.

२ ऑक्टोबर २०१४ पासून शासनाने निर्मल भारत अभियानाचे नामकरण स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) असे केले.याअंतर्गत वैयक्तिक शौचालयाच्या लाभार्थी घटकांना रु.१२०००(केंद्र हिस्सा रु. ९०००

व राज्य हिस्सा रु ३०००) अनुदान देण्यात येत होते. केंद्र शासनाच्या २८ ऑक्टोबर २०१५ च्या पत्रान्वये वैयक्तिक शौचालयांच्या प्रोत्साहन अनुदानाच्या हिस्स्यामध्ये ७५:२५ (केंद्र व राज्य) वरुन ६०:४० (केंद्र व राज्य) असा बदल करण्यात आला आहे.

### शौचालयांची संख्या

| एकूण ग्रामीण कुटुंबे :- १,१०,६५,९०९ | | | |
|---|---|---|---|
| पायाभूत सर्वेक्षण वेळची (निर्मल भारत अभियान) स्थिती | | स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत एप्रिल २०१८ अखेरची स्थिती | |
| शौचालय असलेली कुटुंबे | ५०,२५,०४७ (४५%) | शौचालय असलेली कुटुंबे | १,१०,६५,९०९ (१०० %) |
| शौचालय नसलेली कुटुंबे | ६०,४०,८६२ (५५%) | शौचालय नसलेली कुटुंबे | ० (०%) |

सन २०१३-१४ ते सन २०१७-१८ या या कालावधीत राज्यात मोठ्या प्रमाणावर शौचालयांचे काम पूर्ण करण्यात आले. योग्य नियोजन आणि देखरेखीमुळे हे शक्य झाले. वर्षनिहाय झालेली प्रगती शेजारच्या दोन तक्यांमध्ये दिली आहे.

| वर्ष | स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) (२०१३ ते आज पर्यंत) वैयक्तिक शौचालयांची प्रगती |
|---|---|
| २०१३-१४ | २२१८४९ |
| २०१४-१५ | ४८८४०२ |
| २०१५-१६ | ८८२०५३ |
| २०१६-१७ | १९१६४६० |
| २०१७-१८ | २२५२८८६ |
| २०१८-१९ | ६२३० |
| २०१८-१९ पर्यंत सार्वजनिक शौचालय व सामुहिक शौचालय वापर करणारी कुटुंबे | २७२९८२ |
| एकूण | ६०४०८६२ |

■■■

*लेखक महाराष्ट्र राज्याचे पेयजल व स्वच्छता खात्याचे मंत्री आहेत.*

*ई मेल:ministerwatersupply@gmail.com*



# दोन द्रुतगती मार्गांचे लोकार्पण

## विकास आराखडा

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २७ मे २०१८ रोजी दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात नव्याने बांधलेले दोन द्रुतगती मार्ग देशाला समर्पित केले. या पैकी पहिला मार्ग दिल्ली-मीरत द्रुतगती मार्गाचा, प्रवेश नियंत्रित १४ पदरी पहिल्या टप्प्यातील मार्ग असून तो निजामुद्दीन पूल ते दिल्ली-उत्तर प्रदेश सीमेपर्यंत विस्तारित आहे.

हा ८.३६० किलोमीटर राष्ट्रीय महामार्गाचा पट्टा विक्रमी वेळात म्हणजे १८ महिन्यांत पूर्ण करण्यात आला असून त्याचा उभारणीचा कालावधी ३० महिने अपेक्षित धरला होता. त्याला एकूण खर्च ८४१ कोटी ५० लक्ष रुपये आला आहे. देशातील हा १४ पदर असलेला पहिला राष्ट्रीय महामार्ग असून प्रदूषण कमी होईल अशा अनेक वैशिष्ट्यांनी समृद्ध आहे. महामार्गाच्या प्रत्येक बाजूस २.५ मीटरचा सायकल ट्रॅक, यमुना पुलावर लंबरूप उद्यान, सौर प्रकाश व्यवस्था आणि फक्त ठिबक सिंचनद्वारा झाडांना पाणी पुरवण्याची व्यवस्था यांचा त्यात समावेश आहे.

दिल्ली-मीरत द्रुतगती मार्गाचा उद्देश दिल्ली आणि मीरत दरम्यान जलद आणि सुरक्षित संपर्क व्यवस्था पुरवण्याचा आहेच आणि त्याही पुढे जाऊन उत्तराखंड आणि उत्तर प्रदेश यांच्यात संपर्क सुधारण्याचा आहे. या प्रकल्पाची एकूण लांबी ८२ किलोमीटर असून ४९७५ लाख १७ कोटी रुपये त्याचा एकूण खर्च येणार आहे. दिल्ली आणि दसना दरम्यान २८ किलोमीटरच्या पट्ट्यात समर्पित सायकल ट्रॅक असलेला हा पहिलाच द्रुतगती महामार्ग असेल. एकदा हा प्रकल्प पूर्ण झाला की दिल्लीहून मीरतला पोहोचण्यासाठी फक्त एक तास लागेल. एकूण ८२ किलोमीटर लांबीचा हा द्रुतगती मार्ग आहे. त्याचा शेवटचा टप्पा मार्च २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचा प्रयत्न असणार आहे. हे काम पुर्ण झाल्यानंतर पंजाब, हरियाणा, राजस्थान, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड राज्यातील वाहनांना दिल्लीत प्रवेश न करता उत्तरप्रदेश मध्ये थेट जाता येणार आहे. यामुळे राजधानी दिल्लीतील वाहनांची






*उत्तरप्रदेशातील बाधपत येथे महामार्ग लोकार्पण सोहळा पार पडला. त्याप्रसंगी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, उत्तरप्रदेशचे राज्यपाल राम नाईक, भूपृष्ठ वाहतूक आणि महामार्ग खात्याचे मंत्री नितीन गडकरी, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ तसेच हरियाणाचे मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर आदि.*

गर्दी कमी होईल. तसेच वेळ, इंधन बचतीबरोबरच पर्यावरणाची हानी कमी होणार आहे.

दुसरा जो प्रकल्प राष्ट्राला समर्पित केला जाणार आहे तो १३५ किलोमीटर लांबीचा पूर्व परिघीय द्रुतगती महामार्ग असून तो राष्ट्रीय महामार्ग १ वरील कुंडली ते राष्ट्रीय महामार्ग २ वरील पलवल असा आहे. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी ४६१७ कोटी ८७ लक्ष रुपये खर्च येणार आहे. हा द्रुतगती महामार्ग विक्रमी कालावधीत ५०० दिवसांत पूर्ण झाला असून त्याचा अपेक्षित कालावधी ९१० दिवसांचा निर्धारित केला होता. संपूर्ण १३५ किलोमीटर मार्गावर सौर ऊर्जा वापरण्यात येणारा हा देशातील पहिलाच द्रुतगती महामार्ग आहे. या परिघीय मार्गाच्या प्रत्येक ५०० मीटर अंतरावर रेनवॉटर हार्वेस्टिंग पुरवण्यात आले असून सर्व महामार्गावर बाजूला असलेल्या रोपांना ठिबक सिंचनाने पाणी देण्यात येत आहे.

दिल्लीच्या आजूबाजूला पश्चिम परिघीय द्रुतगती महामार्ग आणि पूर्व परिघीय द्रुतगती महामार्ग यांचा समावेश असलेला, दिल्लीच्या पश्चिम आणि पूर्व बाजूंना असलेल्या राष्ट्रीय महामार्ग १ आणि २ ला जोडणारा प्रकल्प उभारण्याचा समावेश दिल्लीच्या वाहतुकीच्या विळख्यातून सोडवणे आणि प्रदुषनातून मुक्त करणे या दुहेरी उद्दिष्टात केला होता. राष्ट्रीय राजधानीची वाहतूक याद्वारे वळवण्यात येणार आहे आणि दिल्लीची वाहतूक कोंडीतून सुटका करण्यात येणार आहे.

दिल्ली मीरत प्रकल्प देशाला समर्पित करताना प्रधानमंत्री मोदी यांनी केंद्रातील सरकारच्या उपलब्धी स्पष्ट केल्या होत्या. आपल्या सरकारने महामार्ग, रेल्वे, हवाई वाहतूक अशा पायाभूत सुधारणांवर लक्ष केंद्रित केल्याचे नमूद करतानाच त्यांनी सांगितले की, माझ्या सरकारच्या काळात दररोज २७ किलोमीटर लांबीचे महामार्ग बांधले जातात. आतापर्यंत ३५ हजार किलोमीटरचे महामार्ग बांधण्यात आले आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

■■■

# पंतप्रधानांचा संवाद

भारत सरकारकडून विविध योजना राबवण्यात येत आहेत. या योजनांचा लाभार्थ्यांना किती फायदा होत आहे याचा आढावा पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी घेतला. नुकतेच पंतप्रधानांनी या लाभार्थ्यांशी संवाद साधला. या संवादाचा मुख्य उद्देश या योजनेमुळे गरीब लाभार्थ्यांच्या जीवनात किती बदल झाला हे जाणून घेणे हा होता.

**आरोग्य योजनेतील लाभार्थ्यांशी संवाद**

१. भारतातील प्रत्येक नागरिकाला स्वस्त आरोग्याची सेवा मिळावी यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरु असल्याची माहिती पंतप्रधानांनी दिली.

२. जनऔषधी केंद्रांमुळे गरीब, अल्प मध्यम वर्ग आणि मध्यम वर्गीयांना कमी दरात औषधांची उपलब्धता होणार आहे. त्यामुळे औषधांच्या खर्चात मोठी बचत होणार आहे

३. केंद्र सरकारने भारतात ३६०० जनऔषधी केंद्रे सुरु केली आहेत. या केंद्रात स्वस्त दरात ७०० जनेरिक औषधी उपलब्ध होणार आहेत.

४. हृदयाच्या स्टेंटसाठी या आधी दोन लाख रुपयांचा खर्च होत होता. आता अवघा २९ हजार रुपये खर्च होणार आहे.

५. ५०० जिल्ह्यांमध्ये पंतप्रधान राष्ट्रीय डायलेसिस योजनेअंतर्गत सुमारे सव्वा दोन लाख रुग्णांना डायलेसिसची सोय करण्यात आली आहे.

६. इंद्रधनुष्य योजनेअंतर्गत ३.१५ कोटी मुले आणि ८० लाख गर्भवती महिलांसाठी लसीकरणाची सोय करण्यात आली आहे.

७. केंद्र सरकारने देशभरात ९२ मेडिकल कॉलेज सुरु केले आहेत तसेच एमबीबीएसच्या १५ हजार जागांची वाढ करण्यात आली आहे.

यामुळे देशातील प्रति व्यक्ती डॉक्टरची संख्या आणि हॉस्पीटलमध्ये वाढ होणार आहे

८. आयुष्यमान योजनेअंतर्गत देशातील १० कोटी कुटुंबांना आरोग्य कवच मिळणार आहे. या योजनेमुळे प्रत्येक कुटुंबाला ५ लाखांचे आरोग्य विमा कवच मिळणार आहे.






### यंग इनोव्हेटर आणि स्टार्ट अप उद्योजकांशी संवाद

केंद्र सरकारने नव उद्यमींसाठी दहा हजार कोटी रुपयांचा निधी उभारलाय. या निधीमुळे नव उद्यमींना स्टार्ट अपसाठी आणि इनोव्हेटरसाठी निधीची कमतरता भासणार ऩाही. भारतातील लोकसंख्या हा प्रश्न नसून संधी आहे. केंद्र सरकार डेमोग्राफिक डिव्हिडंडचा वापर करुन रोजगार निर्मितीवर भर देणार आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. स्टार्ट अप मधील उद्योजक त्यांनी तयार केलेल्या वस्तूंचे ई मार्केटिंग करु शकतील आणि सरकारला विक्री करु शकतील त्यासाठी सरकारने ई मार्केट (GEM) स्टार्ट अपसोबत लिंक केले आहे. स्टार्ट अपना तीन वर्षापर्यंत आयकरातून सूट देण्यात आली आहे. सहा कामगार कायदे आणि तीन पर्यावरण विषयक कायद्यात बदल करण्यात आला आहे. त्यामुळे तरुण उद्योजक स्वत: प्रमाणन करु शकतात. केंद्र सरकारने स्टार्ट अपसाठी स्टार्ट अप इंडिया हब तयार केले आहे. या डिजिटल प्लॅटफॉर्मवर नवीन उद्योजकांना स्टार्ट अप सुरु करण्यासंदर्भातील सर्व माहिती मिळणार आहे.

■■■




# १००० दिवसांत गावांच्या १०० टक्के विद्युतीकरणाचा प्रवास

**- ए. के. भल्ला**



**वीज प्रदान करण्याबरोबरच नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी ग्रामीण भागात दर्जेदार आणि विश्वासार्ह वीज पुरवठा करणे महत्वाचे असते. त्याचमुळे ग्रामीण भागात विद्युतीकरणासाठी वीज वितरणाशी संबंधित सर्व मुद्द्यांचा समावेश करत एका एकात्मिक योजनेची संकल्पना निश्चित करून भारत सरकारने ग्रामीण भागासाठी 'दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना' सुरू केली.**

आजच्या काळात वीज ही आपली सर्वांची मूलभूत गरज आहे. २१ व्या शतकात वीजेशिवाय जगण्याची कल्पनाही आपण करू शकणार नाही. सार्वत्रिक विद्युतीकरणाचे ध्येय सरकारने मनाशी बाळगले आणि ते साध्य करण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले. १५ ऑगस्ट २०१५ रोजी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना, पंतप्रधानांनी वीजेपासून वंचित असणाऱ्या, देशातील १८५०० गावांमध्ये पुढच्या १००० दिवसात वीज पोहोचविण्याची घोषणा केली. विद्युतीकरण न झालेल्या या गावांमध्ये निर्धारित कालमर्यादेत वीज पोहोचविण्याचे काम ऊर्जा मंत्रालयाकडे सोपविण्यात आले. असे आव्हानात्मक काम पूर्ण करण्यासाठी आधी त्याचा आवाका समजून घेणे ही पहिली पायरी होती. 'जर तुम्हाला एखाद्या गोष्टीचा अंदाज घेता येणार नसेल तर तुम्हाला त्याचे व्यवस्थापन करता येणार नाही', असे व्यवस्थापन शास्त्रात म्हटले जाते. ग्रामीण भागात जनगणना झालेली गावे ही प्राथमिक प्रशासकीय एकके आधारभूत मानली जातात आणि म्हणूनच समग्र विद्युतीकरणाचे ध्येय गाठण्याच्या दृष्टीने अर्थात गावांचे १००% विद्युतीकरण साध्य करण्यासाठी 'या' गावांचे विद्युतीकरण करणे, हा पहिला टप्पा निर्धारित करण्यात आला. वीज प्रदान करण्याबरोबरच नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी ग्रामीण भागात दर्जेदार आणि विश्वासार्ह वीज पुरवठा करणे महत्वाचे असते. त्याचमुळे ग्रामीण भागात विद्युतीकरणासाठी वीज वितरणाशी संबंधित सर्व मुद्द्यांचा समावेश करत एका एकात्मिक योजनेची संकल्पना निश्चित करून भारत सरकारने ग्रामीण भागासाठी 'दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना' सुरू केली.

### दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना

या योजनेमध्ये (i) वीज न पोहोचलेल्या गावांचे विद्युतीकरण (ii) पूर्वीपासूनच वीज पोहोचलेल्या गावांमधील प्रत्येक घराला वीज पुरवठा उपलब्ध करून देणे (iii) दर्जेदार आणि विश्वासार्ह वीज पुरवठा करण्यासाठी वीज पारेषण आणि वितरण यंत्रणेचे सक्षमीकरण आणि वृद्धी (iv) शेतकऱ्यांना खात्रीशीर वीजपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र फीडर (v) ग्राहकांच्या सोयीसाठी वीजेचे लेखापरिक्षण, तोटा भरून काढण्यासाठी फीडरच्या मीटरची तरतूद तसेच ट्रान्सफॉर्मर्सचे वितरण. ग्रामीण विद्युतीकरणाची स्वतंत्र घटक म्हणून, पूर्वी अस्तित्वात असणारी ग्रामीण विद्युतीकरण योजना, या नव्या दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेमध्ये सामावून घेण्यात आली.

या योजनेसाठी एकूण ७५८९३ कोटी रूपये खर्च अपेक्षित असून

त्यासाठी केंद्र सरकारने ६३०२७ कोटी रूपयांचे अर्थसंकल्पिय सहाय्य मंजूर केले आहे. या योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या प्रकल्पांवर सध्या वेगवेगळ्या टप्प्यात अंमलबजावणी सुरू आहे.

**१०० % ग्रामीण विद्युतीकरणासाठी नियोजन आणि धोरण**

वीज न पोहोचलेल्या सर्व गावांच्या विद्युतीकरणाचे काम, दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेंतर्गत मोहिमेच्या स्वरूपात हाती घेण्यात आले. २०१५-१६ पूर्वीच्या तीन वर्षांत ग्रामीण विद्युतीकरणाचे प्रमाण कमी (२०१२-१३ – २५८७, २०१३-१४ – ११९७, २०१४-१५ – १४०५) होते. तोच वेग कायम राहिल्यास ग्रामीण विद्युतीकरणाच्या कामाला आणखी १० वर्षांचा अवधी निश्चितच लागला असता. ही बाब लक्षात घेत, सद्यस्थिती, स्त्रोतांची उपलब्धता, कामाला गती देण्यासाठी करावयाच्या शक्य त्या उपाययोजना, देखरेख यंत्रणा अशा बाबी समजून घेण्यासाठी सर्व संबंधित भागधारकांशी चर्चा करण्यात आली आणि त्यातून नवीन कल्पना, धोरणे आणि दृष्टीकोन समोर आले. यात पुढील बाबींचा समावेश होता:

- **२०११ च्या जनगणनेतील संबंधित गावांचे निश्चितीकरण:**

  अद्याप वीज पुरवठ्यापासून वंचित असणाऱ्या गावांची नेमकी नावे, भौगोलिक स्थान, लोकसंख्याविषयक तपशील आदी जाणून घेण्यासाठी आणि त्यानुसार पुढील नियोजन करण्यासाठी सर्व राज्यांना २०११ च्या जनगणनेनुसार अशी गावे निश्चित करण्याची विनंती करण्यात आली. या कार्यक्रमापूर्वी शक्यतो गावांच्या संख्येच्या प्रमाणात प्रगतीची देखरेख केली जात असे.

- **दुर्गम/पोहोच नसलेल्या गावांमध्ये सोलार पीव्ही आधारित ऑफ ग्रीड सोल्युशन:**

  वीज न पोहोचलेली अशी बहुतांश गावे ही दुर्गम भागातील, बर्फाच्छादित टेकड्यांनी वेढलेली, घनदाट जंगलातील किंवा डाव्या विचारसरणीच्या अतिरेकीवादामुळे प्रभावित क्षेत्र, असल्याचे निरीक्षणातून स्पष्ट झाले. अशा गावांपर्यंत पोहोचणे, सामानाची वाहतूक करणे आणि वीज पुरवठ्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारणे हे खरोखरच एक आव्हान होते. त्यामुळे ज्या गावांमध्ये ग्रीडचा विस्तार शक्य नाही किंवा व्यवहार्य नाही, अशा गावांना सोलार फोटोव्हॉल्टीक आधारित यंत्रणेच्या माध्यमातून वीज पुरवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेंतर्गत अशा ऑफ ग्रीड गावांसाठी प्रकल्प मंजूर करण्यात आले.

**वीज न पोहोचलेली अशी बहुतांश गावे ही दुर्गम भागातील, बर्फाच्छादित टेकड्यांनी वेढलेली, घनदाट जंगलातील किंवा डाव्या विचारसरणीच्या अतिरेकीवादामुळे प्रभावित क्षेत्र, असल्याचे निरीक्षणातून स्पष्ट झाले. अशा गावांपर्यंत पोहोचणे, सामानाची वाहतूक करणे आणि वीज पुरवठ्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारणे हे खरोखरच एक आव्हान होते. त्यामुळे ज्या गावांमध्ये ग्रीडचा विस्तार शक्य नाही किंवा व्यवहार्य नाही, अशा गावांना सोलार फोटोव्हॉल्टीक आधारित यंत्रणेच्या माध्यमातून वीज पुरवण्याचा निर्णय घेण्यात आला.**

  प्रमाणित निविदा दस्तावेज विकसित करण्यात आले आणि ई-निविदांवर लक्ष केंद्रित करण्यात आले.

- **नाविन्यपूर्ण वित्तपुरवठा:**

  कामाला वेग येऊ लागला आणि या योजनेंतर्गत राज्यांना वित्त उपलब्धतेची हमी देण्याची आवश्यकता भासू लागली. हे काम पूर्ण करण्यासाठी अर्थसंकल्पीय सहाय्याबरोबरच ऊर्जा वित्त महामंडळ आणि ग्रामीण विद्युतीकरण महामंडळासारख्या वित्तीय संस्थांद्वारे रोख्यांच्या स्वरूपात बाजारातून निधी उभारण्याची परवानगी वित्त मंत्रालयाने ऊर्जा मंत्रालयाला दिली. मागच्या दोन वित्तीय वर्षांमध्ये अतिरिक्त अर्थसंकल्पीय स्त्रोत स्वरूपात ९००० कोटी रूपयांचा निधी उभारण्यात आला.

- **कामाच्या अंमलबजावणीसाठी संबंधित राज्यांना लवचिकता बहाल:**

  प्रत्येक गावाची विभिन्न भौगोलिक, लोकसंख्याविषयक आणि इतर स्थिती पाहता, प्रत्येक गावासाठी एकच नियम लावता येणार नाही, हे लक्षात आले आणि त्यामुळे सर्व संबंधित राज्यांना प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी टर्न की/ अंशत: टर्न की / विभागिय तत्वावर काम करण्याची लवचिकता बहाल करण्यात आली.

- **हाताळणारी राज्ये /डिस्कॉम्स :**

  आवश्यक तेथे संबंधित राज्ये/ डिस्कॉम्सना मदत देण्यात आली. प्रत्येक राज्यात नोडल संस्था स्थापन करण्यात आली, रोज राज्यांच्या अधिकाऱ्यांशी संवाद

साधून काम पूर्ण करण्याच्या आणि सुसंघटीत पद्धतीने काम करण्याच्या दृष्टीने वरीष्ठ अधिकारी नेमण्यात आले. राज्यांमधील डिस्कॉम्स/ऊर्जा विभागाचे सक्षमीकरण करण्याबरोबरच क्षमता वाढविण्यासाठी, त्यांना सहकार्य करण्याच्या उद्देशाने, या कामावर देखरेख ठेवण्यासाठी आणि कार्यक्रमाची वेगाने अंमलबजावणी करण्यासाठी आरईसीतर्फे गट आणि जिल्हा स्तरावर ग्राम विद्युत अभियंत्यांची नेमणूक करण्यात आली. हे ग्राम विद्युत अभियंते म्हणजे संबंधित स्थानिक क्षेत्रांमध्ये सुरू असलेल्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी डिस्कॉम्सना सहाय्य करणारे पदवीधर अभियंते आहेत.

- **महत्वपूर्ण टप्प्यांवर आधारित संनियंत्रण:**

ग्रामिण विद्युतीकरणाच्या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी आणि निर्धारित कालमर्यादेत हे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी या प्रक्रियेची १२ महत्वपूर्ण टप्प्यांमध्ये विभागणी करण्यात आली. या टप्प्यांमध्ये काम बहाल करण्यापासून सर्वेक्षण, सामानाची खरेदी, कामाच्या ठिकाणी सामान पोहोचणे, विद्युत उपकरणांची प्रत्यक्ष ठिकाणी उभारणी, कार्यान्वयन अशा सर्व बाबींचा समावेश आहे. प्रकल्पाचे पूर्णत्व आणि गावांच्या विद्युतीकरणाची खातरजमा करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन उपकरणांचा पुरेपूर वापर करण्यात आला.

- **पारदर्शकता आणि विश्वासार्हता:**

या गावांच्या विद्युतीकरणाची प्रक्रिया आणि प्रगतीसंदर्भातील माहिती जनतेपर्यंत पारदर्शकपणे प्रसारित होण्यासाठी 'गर्व' हे मोबाइल प ॲप कार्यान्वित करण्यात आले. ही माहिती जनतेला सार्वजनिक स्वरूपात उपलब्ध झाल्यामुळे यंत्रणेत अधिक विश्वासार्हतेचे वातावरण निर्माण झाले.

- **नियमित आढावा आणि देखरेख:**

नियमित आढावा आणि देखरेखीसाठी केंद्र सरकार, राज्य शासन तसेच डिस्कॉम स्तरावर यंत्रणा स्थापन करण्यात आली. अधिक चांगला समन्वय आणि प्रकल्प व्यवस्थापनाच्या दृष्टीने प्रादेशिक आढावा बैठकांचे आयोजनही करण्यात आले. अशा आढाव्यांदरम्यान प्रकल्पाची प्रगती रोखणारे मुद्दे विचारात घेण्यात आले आणि त्या समस्यांचे निराकरण करण्यात आले.

---

**धोरणानुसार राज्यांनी अंमलबजावणीला सुरूवात केली आणि अंमलबजावणीच्या पहिल्याच वर्षात विचारपूर्वक, सहकारी स्वरूपाचे नियोजन आणि धोरणाचे लाभ दिसून आले. २०१५-१६ साली ग्रामीण विद्युतीकरणाच्या प्रगतीमध्ये आधीच्या वर्षांच्या तुलनेत भरघोस वाढ (७१०८ गावांचे विद्युतीकरण) दिसून आली. आधीच्या तीन वर्षांच्या एकत्रित प्रगतीपेक्षाही हे प्रमाण जास्त होते.**

---

**प्रगती**

या धोरणानुसार राज्यांनी अंमलबजावणीला सुरूवात केली आणि अंमलबजावणीच्या पहिल्याच वर्षात विचारपूर्वक, सहकारी स्वरूपाचे नियोजन आणि धोरणाचे लाभ दिसून आले. २०१५-१६ साली ग्रामीण विद्युतीकरणाच्या प्रगतीमध्ये आधीच्या वर्षांच्या तुलनेत भरघोस वाढ (७१०८ गावांचे विद्युतीकरण) दिसून आली. आधीच्या तीन वर्षांच्या एकत्रित प्रगतीपेक्षाही हे प्रमाण जास्त होते. (२०१२-१३ : २५८७, २०१३-१४ : ११९७, २०१४-१५ : १४०५)

**कालबद्धरित्या टप्प्याटप्प्याने अशी प्रगती होत गेली:**

| घोषणेपासूनचे दिवस | विद्युतीकरण झालेली गावे |
|---|---|
| २०० | ६०२१ |
| ४०० | १०,२३३ |
| ६०० | १३,१७४ |
| ८०० | १४,७०१ |
| १००० | १८,४५२★ |

★१२७१ गावांमध्ये वस्ती नसल्याचे किंवा चराऊ कुरण म्हणून राखीव असल्याचे दिसून आले.

**अंमलबजावणीतील आव्हाने आणि उपचारात्मक उपाययोजना**

वीज न पोहोचलेली अशी बहुतांश गावे ही दुर्गम भागातील, बर्फाच्छादित टेकड्यांनी वेढलेली, घनदाट जंगलातील किंवा डाव्या विचारसरणीच्या अतिरेकीवादामुळे प्रभावित क्षेत्र असणारी होती, हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही वीजेपासून वंचित राहिलेल्या या गावांमधील गरीब नागरिकांना वीज पुरवठा करण्यातील मोठा अडसर असलेल्या या आव्हानांवर मात करणे खूपच महत्वाचे होते. जसजशी कामात प्रगती होत गेली, तसतसे समस्यांचे आव्हानही वाढत गेले. या प्रक्रियेतील महत्वाची आव्हाने पुढीलप्रमाणे होती:



पारंपरिक ग्रीड यंत्रणा अप्राप्य आणि अव्यवहार्य : २७६२ गावे

दुर्गम डोंगराळ भूभाग: २४५ गावे (जम्मू-कश्मीर ५४, अरूणाचल प्रदेश -१८२, मेघालय-९)

१ ते १० दिवसात सामानाची डोक्यावरून ने - आण: १०२ गावे (अरूणाचल - ९०, मणीपूर- १२)

हेलिकॉप्टरद्वारे वाहतूक: ५१ गावे (जम्मू कश्मीर ३५, अरूणाचल प्रदेश १६)

डाव्या विचारसरणीच्या अतिरेकीवादामुळे प्रभावित क्षेत्र: ७६१४ गावे (बिहार १०४४, झारखंड २४७८, छत्तीसगढ १०५१, मध्य प्रदेश १४, ओदीशा ३०२७)

वनविभाग मंजुरी : ४१५ गावे (झारखंड १५५, उत्तराखंड २३, ओदीशा ४५, आसाम ३२, मध्य प्रदेश १६०)

रेल्वे मंजुरी: ३८ गावे (बिहार ३७ आणि आसाम १)

प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान ९ राज्यांमधील जनगणनेत नोंद झालेल्या आणखी १२२७ गावांमध्ये वीज न पोहोचल्याचे स्पष्ट झाले. अशा गावांमध्येही विद्युतीकरणाचे काम तातडीने हाती घेण्यात आले, यावरून या योजनेच्या गतीमानतेचा अंदाज येईल. या १२२७ गावांपैकी ११९३ गावांचे विद्युतीकरण पूर्ण झाले असून उर्वरित ३४ गावे निर्जन असल्याचे आढळून आले आहे.

अशा प्रकारे राज्ये, डिस्कॉम्स, कंत्राटदार, विक्रेते, उपकरणांचे उत्पादक आणि राज्यातील नागरिक यांच्या सहकार्याने, माननीय पंतप्रधानांनी निर्धारित केलेल्या १००० दिवसांच्या कालमर्यादेच्या आधीच आम्हाला आमचे लक्ष्य पूर्ण करता आले.

मात्र ऊर्जा मंत्रालयाचा प्रवास अजूनही सुरूच आहे. देशातील प्रत्येक घरात वीजेचा प्रकाश पोहोचविणे, हे आमचे पुढचे लक्ष्य आहे. ३१ मार्च २०१९ पर्यंत देशातील शहरी आणि ग्रामीण भागातील घरांच्या सार्वत्रिक विद्युतीकरणाचे लक्ष्य निर्धारित करत, ते साध्य करण्यासाठी आम्ही 'प्रधानमंत्री सहज बिजली हर घर योजना'– सौभाग्य योजनेच्या अंमल बजावणीला सुरूवात केली आहे.

■■■

*लेखक केंद्रीय ऊर्जा खात्याचे सचिव असून कोळसा तसेच वाणिज्य मंत्रालयात त्यांनी महत्वाची पदे भूषविली आहेत.*

*ई मेल: secy-power@nic.in*



विशेष लेख

# युवक आणि समुदायाप्रती प्रतिबद्धता

-अमरेंद्र कुमार दुबे



**युवक या शब्दाचे तीन स्पष्ट गर्भितार्थ आहेत:पहिला, एका विशिष्ट वयोगटाकडे तो निर्देश करतो. दुसरे, हा शब्द अशा व्यक्तींच्या समूहाचा संकेत देतो जो शिक्षण आणि रोजगार या दृष्टीकोनातून संक्रमणाच्या अवस्थेत आहे आणि शेवटचा म्हणजे असा समूह ज्याच्याकडे जीवनावर परिणाम करणारे विशेष सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक-शारीरिक घटक आहेत.**

राष्ट्रीय युवक धोरणात (२०१४) युवकाची व्याख्या १५ ते २९ वयोगटातील व्यक्ती अशी करण्यात आली आहे. पण युवक वर्ग हा एकजिनसी मानता येणार नाही तर तो भिन्न भिन्न प्रकारचा असाच मानला जाणे अपरिहार्य आहे आणि असे मानण्याची कारणे समाजातूनच पुढे आलेली आहेत जशी की सांस्कृतिक पार्श्वभूमी, सामाजिक आर्थिक दर्जा, शैक्षणिक दर्जा, ज्या भागातून ते येतात ते भौगोलिक क्षेत्र आणि या सर्वांच्या वर युवकांच्या स्वत:च्या धारणा आणि आकांक्षा या पैलूमुळेही एकजिनसीपणाचा अभाव आहे.

युवक या शब्दाचे तीन स्पष्ट गर्भितार्थ आहेत:पहिला, एका विशिष्ट वयोगटाकडे तो निर्देश करतो. दुसरे, हा शब्द अशा व्यक्तींच्या समूहाचा संकेत देतो जो शिक्षण आणि रोजगार या दृष्टीकोनातून संक्रमणाच्या अवस्थेत आहे आणि शेवटचा म्हणजे असा समूह ज्याच्याकडे जीवनावर परिणाम करणारे विशेष सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक-शारीरिक घटक आहेत.

परंतु एका विशिष्ट वयोगटातील असणे यातून फार काही अर्थ सूचित केला जात नाही. युवकाच्या संदर्भात सर्वात महत्वाचे काय आहे तर हा असा वयोगट आहे जो पौगंडावस्थेतून प्रौढावस्थेकडे जातानाचे आणि कौशल्य किंवा शिक्षणातून रोजगाराकडे संक्रमणाचा साक्षीदार आहे. हा असा वयोगट आहे की ज्यात युवक स्वत:ला आपली उद्दिष्टे आणि आकांक्षा फलद्रूप करण्यासाठी काम करण्याच्या दृष्टीने जुळवून घेत असतो तसेच कोणत्या क्षेत्रांत आपल्याला अर्थपूर्णरित्या प्रतिबद्ध होता येईल याची चाचपणी करत असतो. यात खरोखर खूप मोठ्या प्रमाणावर क्रियाकलापांचा समावेश होतो – मग ते दुय्यम आणि तिय्यम क्षेत्रातील उपक्रमांत शिरण्याचे धाडस असो किंवा सार्वजनिक चांगले उपक्रम असोत किंवा स्वतंत्र व्यवसायात शिरणे असो. या प्रक्रियेत तो कौशल्य प्रशिक्षण किंवा आपल्या इच्छित कौशल्य क्षेत्रात शिक्षण मिळवू शकतो किंवा आपल्या इच्छित व्यवसायाच्या माध्यमातून उपजीविकेचा मार्ग प्रस्थापित करू पाहिल. एकदा व्यवसायात आल्यावर तो आपल्या कठोर मेहनतीच्या जोरावर यशस्वी ठरून प्रगती करू पाहिल. आणि ही अवस्था अशी आहे की, त्याच्या जीवनातील सांस्कृतिक पैलू तसेच मनोशारीरिक मुद्दे त्याला पूर्वीपेक्षाही जास्त प्रमाणात प्रतिबद्ध करतील. काही वेळा अशी प्रतीबद्धता जास्तच विस्तारित होईल. काही कमकुवत परिणामही यातून समोर आले आहेत.

### युवक गटासाठी प्राधान्य क्षेत्रे

युवक वर्गाचा हाच तो सामाजिक पैलू आहे जो भारत सरकारने आपल्या २०१४ च्या राष्ट्रीय युवक धोरणात

मान्य केला आहे.२ त्यात उद्दिष्टे आणि प्राध्यान्य क्षेत्रे खालीलप्रमाणे निश्चित केली आहेत.

| | उद्दिष्टे | प्राधान्य |
|---|---|---|
| १. | भारतीय आर्थिक विकासाकरता शाश्वत योगदान देईल असा सर्जनशील कामगार वर्ग तयार करणे | शिक्षण<br>रोजगार आणि कौशल्य प्रशिक्षण<br>व्यावसायिकता |
| २. | पुढील आव्हाने पेलण्यासाठी सुसज्ज अशी मजबूत आणि आरोग्यसंपन्न पिढी विकसित करणे | आरोग्य आणि आरोग्यदायी जीवनशैली<br>क्रीडा |
| ३. | राष्ट्रीय स्वामित्व हक्काची जाणीव तयार करण्यासाठी सामाजिक मूल्ये विकसित करणे आणि समुदायाची सेवा करण्यास चालना देणे | सामाजिक मूल्यांना चालना<br>सामुदायिक सहभाग |
| ४. | प्रशासनाच्या सर्व स्तरांवर सहभाग आणि नागरी प्रतिबद्धता | राजकारण आणि प्रशासनात सहभाग |
| ५. | जोखमीच्या ठिकाणी युवकांना आधार देणे आणि सर्व वंचित आणि दुर्बल युवकांसाठी न्यायोचित संधी तयार करणे | समावेशन<br>सामाजिक न्याय |

यातील प्रत्येक प्राधान्य क्षेत्र महत्वाचे आहे आणि युवकांच्या समग्र आणि विधायक विकासाकरता ज्यावर काम करणे आवश्यक आहे. आणि शिक्षण, रोजगार, आरोग्य, क्रीडा आदीवर भरपूर लिहिले गेले आहे आणि लिहिले जात आहे. इथे आपण फक्त दोन प्राधान्य क्षेत्रांवर चर्चा करणार आहोत.

अ) सामाजिक मुद्द्यांना चालना

आ) सामुदायिक प्रतिबद्धता

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, राष्ट्रीय मालकी हक्काची जाणीव तयार करण्यासाठी सामाजिक मूल्ये विकसित करणे आणि सामुदायिक सेवेला चालना देणे या उद्दिष्टाखाली ही दोन प्राधान्य क्षेत्रे निश्चित केली आहेत.

### सामाजिक मूल्यांना चालना

उत्पादक कार्य शक्ती ही युवकांची बनलेली असते आणि अनुभव मिळत जात हाच युवक आपापल्या जीवनाच्या क्षेत्रात नेतृत्व करणारा होतो. भारत राष्ट्र म्हणून संस्कृती, वांशिकता, भाषा, समाज आणि धर्म या बाबतीत विविधतेने संपन्न आहे. भौगोलिक विविधताही आहे, जो समाज भौगोलिक आव्हानांना ज्या विविध मार्गाने प्रतिसाद देतो आणि त्यांच्या जीवनशैलीला आकार मिळतो ते भौगोलिक विविधताच सुप्तपणे ठरवत असते. परंतु ही विविधता असूनही असे काही सामायिक धागे आहेत जे विविध समाज आणि वंशातून असतातच. संभवत: याचे सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणजे रामायण आणि महाभारत या महाकाव्याचे देता येईल, ज्यांचे सर्व भारतीय भाषांमध्ये भाषांतर झाले असून मूळ कथा सारखीच आहे, फक्त काही उपकथा (महाभारतात यांना उपाख्यान म्हटले आहे) मूळ विषयाभोवती फिरणाऱ्या परंतु विविध छटा असलेल्या आहेत. समकालीन काळाकडे वळताना, आयटीचा उपयोग आणि विविध समस्यांना सामोरे जात असताना युवकांच्या सर्वसाधारण भावना आणि धारणा पाहता देशभरात एकच छटा दिसते. आज युवक त्याचे जन्मस्थान किंवा वांशिकता कोणतीही असो, विकास, संपर्क, प्रतिबद्धता, आपली क्षमता दाखवण्यासाठी संधी याबाबत एकाच सुरात बोलत असतो. भारताची देश म्हणून विशिष्ट संस्कृती आहे आणि अनेक शतके जोपासना केलेल्या विशिष्ट परंपरा आणि चालीरीती ज्यांनी मिळून आपली सामाजिक मुल्ये बनली आहेत, त्याभोवती केंद्रित झाल्यामुळे मुख्यत: ही समानता आली आहे. ही सामाजिक मूल्ये भारतीय समाजासाठी सर्वसाधारणपणे आणि युवकांसाठी विशेषत: बांधून ठेवणारी आहेत.

### सामुदायिक प्रतिबद्धता

दुसरे प्राधान्य क्षेत्र म्हणजे युवकांसाठी सामुदायिक प्रतिबद्धता आहे. सामाजिक मूल्ये त्याच प्रमाणे सामाजिक आर्थिक चौकट यापासून त्याची उत्पत्ती झाली आहे. एनएसएस आणि एनवायकेएसने राबवलेल्या उपक्रमातून दर्शवल्याप्रमाणे सामुदायिक प्रतिबद्धता उपक्रमांच्या वैविध्यपूर्ण क्षेत्राच्या माध्यमातून जाते. युवक हा स्वाभाविकपणेच लोकसंख्येचा सर्वात मोठा भाग असल्याने समुदायाच्या

सेवेसाठी युवा शक्तीला गतिशील करता येते.

युवक व्यवहार विभागाकडे या अंतर्गत नेहरू युवा केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना अशा दोन मुख्य संघटना आहेत, युवकांसाठी स्वेच्छेने समुदायाची सेवा करण्यासाठी जुळवाजुळव करण्यास सहाय्य करतात. युवकांमध्ये स्वेच्छेने काम करण्याची जाणीव निर्माण करण्यासाठी तत्वत: हे केले आहे. उपक्रमांच्या विशाल क्षेत्रांत युवकांना प्रतिबद्ध करून घेण्यासाठी स्वैच्छिकता ही सक्तीच्या पद्धतीपेक्षा श्रेयस्कर आहे, हे दाखवून दिले आहे; एनएसएस/एनकेवायएसने हाती घेतलेल्या काही अपारंपरिक उपक्रमांवरून यावर जोर देण्यात आला आहे. परिस्थितीला युवकांच्या प्रतिसादाची ही यंत्रणा आहे ज्यात सामाजिक मुल्ये समोर येतात आणि अशा प्रतिबद्धतेतून सामाजिक बंध तयार होतात.

### नेहरू युवा केंद्र संघटन(एनवायकेएस)

१९७२ मध्ये स्थापन झालेली एनवायकेएस ही जगातील सर्वात मोठी युवक संघटना आहे. एनवायकेएसकडे सध्या १ लाख २९ हजार क्लबमधून नोंदणी करण्यात आलेले ८० लाख ७० हजार युवक आहेत. नेहरु युवा केंद्रांच्या माध्यमातून एनवायकेएसचे अस्तित्व ६२३ जिल्ह्यांत आहे. युवकांचे नेतृत्व गुण आणि व्यक्तिमत्व विकसित करणे आणि त्यांना राष्ट्र उभारणीच्या कार्यात गुंतवणे हे उद्दिष्ट आहे. एनवायकेएसचे उपक्रम प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा युवक समन्वयक आणि प्रत्येक ब्लॉकमध्ये दोन राष्ट्रीय युवा स्वयंसेवकांच्या माध्यमातून राबवण्यात येतात. या शिवाय, नवी दिल्लीत एनवायकेएसचे राष्ट्रीय मुख्यालयाशिवाय २९ विभागीय कार्यालये आहेत.

**अनेक उपक्रमांपैकी काही थोडक्यात खाली दिले आहेत.**

अ) **युवक नेतृत्व आणि समुदाय विकासावर प्रशिक्षण** : इतरांनी अर्थपूर्ण आयुष्य जगावे यासाठी मदत करण्याची नेत्याची भूमिका करण्यासाठी आणि राष्ट्र उभारणीत योगदान देण्यासाठी युवकांची क्षमता वाढवण्याचा या कार्यक्रमाचा उद्देश्य आहे. हा पाच दिवसांचा कार्यक्रम आहे. २०१७-१८ मध्ये, असे ४५० हून अधिक कार्यक्रम राबवण्यात आले आणि १९,००० युवकांना त्यात सहभागी करून घेण्यात आले.

**१९७२ मध्ये स्थापन झालेली एनवायकेएस ही जगातील सर्वात मोठी युवक संघटना आहे. एनवायकेएसकडे सध्या १ लाख २९ हजार क्लबमधून नोंदणी करण्यात आलेले ८० लाख ७० हजार युवक आहेत. नेहरु युवा केंद्रांच्या माध्यमातून एनवायकेएसचे अस्तित्व ६२३ जिल्ह्यांत आहे. युवकांचे नेतृत्व गुण आणि व्यक्तिमत्व विकसित करणे आणि त्यांना राष्ट्र उभारणीच्या कार्यात गुंतवणे हे उद्दिष्ट आहे. एनवायकेएसचे उपक्रम प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा युवक समन्वयक आणि प्रत्येक ब्लॉकमध्ये दोन राष्ट्रीय युवा स्वयंसेवकांच्या माध्यमातून राबवण्यात येतात.**

आ) **युवा परिषद आणि युवा कृती** : ग्रामीण युवकांना आपल्या उत्पादनाचे प्रदर्शन करून व्यक्त होण्यासाठी, आपले अनुभव सांगून युवक सक्षमीकरणासाठी उत्तम उपाय योजना सुचवण्याची संधी आणि व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा कार्यक्रम दरवर्षी सर्व जिल्हा एनवायके कडून आयोजित केला जातो. २०१७-१८ मध्ये, ३०० हून अधिक असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आणि दोन लाख सहा हजार युवकांना त्यात सहभागी करून घेण्यात आले.

इ) **युवा आदर्श ग्रामविकास कार्यक्रम** : युवकाने युवकांसाठी निवडक जिल्ह्यात एका गावाचा आदर्श गाव म्हणून विकास करायचा, हा या कार्यक्रमाचा उद्देश्य आहे. गावे हागणदारीमुक्त करणे, शंभर टक्के लसीकरण, मुलांची प्राथमिक शाळांमध्ये शंभर टक्के नोंदणी, स्वच्छता, प्रतिबंधात्मक आरोग्य सुविधा, सरकारच्या महत्वाच्या कार्यक्रमांना लोकप्रिय करणे आदि उपक्रमांचा यात समावेश असेल. २०१७-१८ मध्ये हा वर्षभर (३१.१२.२०१७ पर्यंत) चालणारा कार्यक्रम असून निवडक ७८ जिल्ह्यांत तो पार पाडला गेला.

ई) **आदिवासी युवा आदानप्रदान कार्यक्रम (टीवायईपी)** : हा कार्यक्रम दरवर्षी गृह व्यवहार मंत्रालयाच्या निधीतून आयोजित केला जातो. या कार्यक्रमांतर्गत, डाव्या अतिरेकी गटांच्या कारवायांनी ग्रस्त झालेल्या भागांतून आदिवासी युवकांना देशाच्या अन्य भागांत नेले जाते आणि देशाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची जाणीव करून दिली जाते, विकासात्मक उपक्रम त्यांना दाखवण्यात येतात आणि देशाच्या इतर भागांतील लोकांशी भावनात्मक दुवा विकसित करण्याबाबत त्यांना सक्षम केले जाते. २०१७-१८ मध्ये, २००० आदिवासी युवकांसाठी असे दहा कार्यक्रम आयोजित केले गेले.

उ) **एक भारत श्रेष्ठ भारत (आंतरराज्य युवक आदानप्रदान कार्यक्रम)** : ३१ ऑक्टोबर, २०१५ रोजी सरदार वल्लभ भाई पटेल यांच्या १४० व्या जयंती दिनी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक भारत श्रेष्ठ भारत ची घोषणा केली. देशातील विविधतेतील ऐक्य साजरे करणे आणि देशवासियांमधील विद्यमान पारंपरिक भावनात्मक संबंधांची चौकट कायम राखून ती मजबूत करणे, सर्व राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांतील वर्षभर चालणाऱ्या सुनियोजित प्रतिबद्धतेद्वारे सखोल आणि रचनात्मक प्रतिबद्ध कार्यक्रमाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रवृत्तीला चालना देणे, प्रत्येक राज्यातील समृद्ध वारसा आणि संस्कृती, चालीरीती आणि परंपरा यांचे प्रदर्शन घडवून लोकांना देशाचे वैविध्य समजून घेण्यास सक्षम करणे, हे या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. केंद्रीय मनुष्य बळ विकास मंत्रालयाच्या प्रशासकीय समन्वयांतर्गत हा कार्यक्रम आहे.

नेहरू युवा केंद्र संघटनेने आंतरराज्य युवा आदानप्रदान कार्यक्रम एक भारत श्रेष्ठ भारत कार्यक्रम २०१७-१८ मध्ये १५ राज्यांच्या जोडीमध्ये राबवला. उदाहरणार्थ, तेलंगण आणि हरियाना, केरळ आणि हिमाचल प्रदेश, तमिळनाडू आणि जम्मू आणि काश्मीर, ओडिशा आणि महाराष्ट्र, झारखंड आणि गोवा, कर्नाटक आणि उत्तराखंड, मेघालय आणि उत्तर प्रदेश, सिक्कीम आणि दिल्ली, मणिपूर आणि मध्य प्रदेश आदी.

ऊ) **इतर उपक्रम**: एनवायकेएस विविध मंत्रालयांच्या सहकार्याने इतरही अनेक उपक्रम राबवत असते जसे की, वनीकरण, रक्तदान शिबिरे आणि स्वेच्छापूर्वक रक्तदाता नोंदणी, मुलांचे लसीकरण (ऑपरेशन इंद्रधनुष), माता लसीकरण, आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करणे इत्यादी. यातील सर्वात ताजा कार्यक्रम म्हणजे सध्या सुरु असलेल्या स्वच्छ भारत उन्हाळी प्रशिक्षणात युवकांचा सहभाग असून तो केंद्रीय पेयजल आणि मलनिस्सारण मंत्रालयाच्या छत्रछायेखाली राबवण्यात येईल, ज्यात युवक स्वच्छतेशी संबंधित मुद्दे आणि आरोग्य तसेच पोषक आहाराबाबत युवक शंभर तास स्वयंसेवी काम करतील. त्याचप्रमाणे, जलसंपदा मंत्रालयाच्या छत्रछायेखाली एनवायकेएस युवकांना स्वच्छ गंगा कार्यक्रमाखाली नमामि गंगा प्रकल्पात गुंतवून घेतले जाणार आहे.

**नेहरू युवा केंद्र संघटनेने आंतरराज्य युवा आदानप्रदान कार्यक्रम एक भारत श्रेष्ठ भारत कार्यक्रम २०१७-१८ मध्ये १५ राज्यांच्या जोडीमध्ये राबवला. उदाहरणार्थ, तेलंगण आणि हरियाना, केरळ आणि हिमाचल प्रदेश, तमिळनाडू आणि जम्मू आणि काश्मीर, ओडिशा आणि महाराष्ट्र, झारखंड आणि गोवा, कर्नाटक आणि उत्तराखंड, मेघालय आणि उत्तर प्रदेश, सिक्कीम आणि दिल्ली, मणिपूर आणि मध्य प्रदेश आदी.**

**राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस)**: विद्यार्थी युवकाचे व्यक्तिमत्व आणि चारित्र्य स्वयंसेवी समुदाय सेवेच्या माध्यमातून विकसित करण्याच्या प्राथमिक उद्देश्याने १९६९ मध्ये एनएसएस सुरु करण्यात आली. सेवेतून शिक्षण हा एनएसएसचा उद्देश्य आहे. एनएसएसची वैचारिक अभिमुखता महात्मा गांधी यांच्या तत्वांपासून प्रेरणा घेऊन झाली आहे. त्यामुळे एनएसएसचे ब्रीदवाक्यच 'मी नाही पण तू' असे अगदी यथोचित आहे. एनएसएसची स्थापना १९६९ मध्ये ३७ विद्यापीठांमध्ये होऊन ४० हजार स्वयंसेवक सहभागी झाले होते. सध्या, एनएसएसकडे ३० लाख ६६ हजार नोंदणीकृत स्वयंसेवक ३९१ विद्यापीठे, दोन मंडळे आणि १६,२७८ एसएससी शाळांमध्ये असलेल्या ३९,६९५ एनएसएस शाखांमध्ये विखुरलेले आहेत.

**मुलभूत आराखडा/कार्यक्रम रचना**: एनएसएसचा आराखडा असा आहे की योजनेत समाविष्ट असलेल्या प्रत्येक शैक्षणिक संस्थेत १०० विद्यार्थी स्वयंसेवकांचे मिळून बनलेले किमान एक तरी युनिट असावे (साधारणपणे) ज्याचे नेतृत्व कार्यक्रम अधिकारी या हुद्द्यावरच्या एका शिक्षकाकडे असावे. प्रत्येक एनएसएस युनिट एक गाव किंवा झोपडपट्टी आपल्या उपक्रमांकरता घेते. प्रत्येक एनएसएस स्वयंसेवकाने दरवर्षी कमीत कमी १२० तास असे दोन वर्षे २४० तास सेवेसाठी देणे आवश्यक आहे. या शिवाय, प्रत्येक स्वयंसेवकाने दत्तक घेतलेल्या गावात किंवा नागरी वस्तीतील झोपडपट्टीत एनएसएस युनिटने आयोजित केलेल्या सात दिवसांच्या विशेष शिबिरात सहभाग घेणे अनिवार्य आहे.

**एनएसएस अंतर्गत हाती घेण्यात येत असलेल्या उपक्रमांचे स्वरूप:** समाजाला सेवा देणे हा एनएसएस उपक्रमांचा गाभा आहे. या उपक्रमांचे

नेमके स्वरूप समाजाच्या गरजांना प्रतिसाद यावर विचार करून ठरवले जाते. एनएसएस स्वयंसेवक ज्या क्षेत्रांत काम करतात त्यापैकी काही शिक्षण, आरोग्य, कुटुंब कल्याण आणि स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, सामाजिक सेवा कार्यक्रम, महिलांची अवस्था सुधारण्यासाठी कार्यक्रम, उत्पादन अभिमुख कार्यक्रम, आपत्ती/नैसर्गिक संकटांमध्ये मदत आणि पुनर्वसन कार्य ही क्षेत्रे आहेत. त्याशिवाय, एनएसएस स्वयंसेवक प्रजासत्ताक दिन कवायती शिबिरे, साहस शिबिरे, राष्ट्रीय एकात्मता शिबिरे आणि ईशान्य एनएसएस महोत्सव, राष्ट्रीय युवा महोत्सवात सुविचार आणि युवक परिषद अशा काही महत्वाच्या उपक्रमांमध्ये सहभागी होत असतात.

**स्वयंसेवी सहभागाची काही उदाहरणे**

स्वयंसेवी सामाजिक सहभागाचे काही लाभ हेवा करण्याजोगे आहेत. त्यामुळे युवकांना समुदाय आणि त्याच्या भोवतीचे वातावरण, अडचणी तसेच लाभ समजून घेण्यास मदत होते. यामुळे त्यांचा प्रत्यक्ष अनुभव वाढतो जो त्यांना एखाद्या समस्येचे किंवा स्थितीचे विश्लेषण करताना तुलनात्मक पवित्रा घेण्यास मदत होते. युवकाने एकदा प्रत्यक्ष परिस्थिती पाहिली की त्याचा त्या मुद्यावरील दृष्टीकोन विस्तारित होतो. याची मदत त्याला तार्किक आणि योग्य भूमिका घेण्यासही होते. त्याला हे समजून जाते की, एखादी परिस्थिती त्याने अन्यत्र पाहिलेल्या परिस्थितीच्या अगदी विरोधी असू शकते आणि परिस्थितीनुसार दोन्ही खऱ्या असू शकतात. त्यामुळे त्याला इतरांचे दृष्टीकोन मान्य करण्यासही मदत होते. थोडक्यात, असे सांगता येईल की, स्वैच्छिकता ही पौगंड अवस्थेतून प्रौढ अवस्थेत संक्रमण होत असताना ज्या समस्यांना सामोरे जावे लागते ते मुद्दे हाताळताना साधनीभूत ठरणारा भावनात्मक गुणक वाढवण्यात योगदान देते. एनवायके/एनएसएसएस राबवत असलेल्या काही उपक्रमांच्या उदाहरणांवरून वरील गोष्ट अगदी स्पष्ट दिसते.

अ) **गिरीविकास प्रकल्प**: आदिवासी लोकांना राष्ट्रीय मुख्य प्रवाहात मिसळणे शक्य करण्यासाठी शिक्षण/साक्षरता यांची भूमिका लक्षात घेऊन नेहरू युवा केंद्र, पलक्कड, केरळ यांनी जिल्हा प्रशासनाच्या पाठींब्याने प्रायोगिक तत्वावर गिरीविकास प्रकल्प हाती घेतला. दीड एकर परिसरात पसरलेल्या गिरीविकास शिबिरात शैक्षणिक आणि प्रशासकीय भाग होते, मुले आणि मुलांचे वसतिगृह पलक्कडमधील मालाम्पुझा गावात आहे. केरळ राज्य अनुसूचित जमाती विकास विभागाने या प्रकल्पाला सहाय्य केले होते.

**स्वयंसेवी सामाजिक सहभागाचे काही लाभ हेवा करण्याजोगे आहेत. त्यामुळे युवकांना समुदाय आणि त्याच्या भोवतीचे वातावरण, अडचणी तसेच लाभ समजून घेण्यास मदत होते. यामुळे त्यांचा प्रत्यक्ष अनुभव वाढतो जो त्यांना एखाद्या समस्येचे किंवा स्थितीचे विश्लेषण करताना तुलनात्मक पवित्रा घेण्यास मदत होते. युवकाने एकदा प्रत्यक्ष परिस्थिती पाहिली की त्याचा त्या मुद्यावरील दृष्टीकोन विस्तारित होतो. याची मदत त्याला तार्किक आणि योग्य भूमिका घेण्यासही होते.**

या प्रकल्पात शालांत परीक्षेसाठी बसलेल्या आणि अनुत्तीर्ण झालेल्या अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना ते परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी १० महिने निवासी कोचिंग देण्यात येते आणि अभ्यासाला अनुकुल वातावरण, शैक्षणिक आणि अभ्यासक्रमाच्या सुविधा पुरवण्यात येतात. आदिवासी विद्यार्थ्यांच्या मनातील न्यूनगंड नाहीसा करून त्यांना पोषक आहार, शिस्त आणि कठोर मेहनत अशासारख्या महत्वाच्या पैलूंची शिकवण त्यांच्या अंगी बाणवण्यात येऊन त्यांचे व्यक्तिमत्व घडवले जाते.

नियमित एसएसएलसी अभ्यासक्रमाशिवाय, विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा आणि संगणक शिकवण्यात येतो, योगासने, क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रम घ्यायला लावले जाते; आरोग्य आणि सामाजिक मुद्यांच्या विविध पैलूंची त्यांना माहिती करून देण्यात येते आणि सामाजिक विचारवंत, प्रख्यात साहित्यिक, राजकीय नेते आणि अधिकारी यांची भाषणे ऐकण्याची तसेच संवाद साधण्याची संधी मिळते.

गिरीविकास प्रकल्पाने आदिवासी मुले आणि मुलींना एसएसएलसी परीक्षा यशस्वीपणे देण्यास सक्षम केले आणि एकंदरीत उत्तीर्ण होण्याची टक्केवारी ८८ इतकी वाढली.

आ) **मादक द्रव्यांचे सेवन आणि मद्यसेवनाला प्रतिबंध** : एनवायकेएसने सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या आर्थिक बळावर एक वर्ष चालणारा मादक पदार्थ सेवन आणि मद्यविकार बाबत जागृती आणि शिक्षण या नावाचा पथदर्शी प्रकल्प अमलात आणला. पंजाबातील १०

जिल्ह्यांतील ७५ तालुक्यातील ३००० गावे आणि मणिपूरमधील ७ जिल्ह्यांतील २५ तालुक्यांत प्रकल्प अमलात आणला गेला.

एकीकडे, प्रकल्पाने कोवळी मुले आणि तरुण, व्यसनाचा धोका असलेले कमकुवत गट तसेच त्यांचे कुटुंबीय आणि समुदायाचे सदस्य यांच्यावर लक्ष केंद्रित केले तर दुसरीकडे विविध भागधारकांचा जसे की ग्राम आधारित एनवायकेएस क्लब्स, महिला गट, ग्राम पंचायती, स्थानिक राजकीय आणि धार्मिक नेते, गावावर प्रभाव टाकणारे लोक आणि सेवा पुरवठादार यांचे सामुहिक रित्या समर्थन अमली पदार्थांचे व्यसन आणि अति मद्य सेवन या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी मिळवले.

प्रकल्पाचे प्राथमिक उद्दिष्ट दारूचे आणि अमली पदार्थाच्या आहारी जाण्याचे दुष्परिणाम याबाबत जागृती तयार करून लक्ष्यीत वर्गाला आणि भागधारकांना त्याबाबत शिक्षित करणे होते तसेच व्यसन टाळण्याच्या पद्धती आणि आरोग्यसंपन्न आणि अर्थपूर्ण जीवन जगण्यासाठी व्यसनाच्या आहारी गेलेल्यांना व्यावसायिकाच्या मदतीने उपचार करण्याची गरज हे पटवून देण्याचे उद्दिष्ट होते.

या प्रकल्पांतर्गत ३७,५०० प्रशिक्षित स्थानिक युवक क्लब सदस्यांनी वैयक्तिक संपर्क आणि सहकर्मी शिक्षण कार्यक्रम अंतर्गत ३,७५,००० युवकांमध्ये जागृती केली आणि अमली पदार्थ किंवा मद्याच्या आहारी गेलेल्या ६२,६५४ व्यक्ती निश्चित केल्या. त्याशिवाय, अमली पदार्थांचा वापर आणि त्यांचे परिणाम असे प्रश्न हाताळण्यासाठी गावातील समुदायांसाठी सामुहिक जनजागृती, एकत्र करणे, माहितीचा प्रसार, शिक्षण आणि प्रेरित करणे अशा ग्रामस्तरावरील उपक्रम हाती घेण्यात आले.

इ) **नमामि गंगे आणि युवक (एनवायकेएस):** नेहरु युवा केंद्र संघटनेने गंगा नदीतील प्रदूषण थांबवण्यासाठी जागृती, राष्ट्रीय नदी गंगेचा कायाकल्प करण्याच्या दृष्टीने ८ जून २०१५ रोजी राष्ट्रीय स्वच्छ गंगा मोहीम (एनएमसीजी) बरोबर सामंजस्य करार केला असून त्यानुसार नमामि गंगे कार्यक्रमात युवकांना सहभागी करून घेणे असे नाव या प्रकल्पाला देण्यात आले आहे.

**उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगाल या चार राज्यांतील गंगा काठावरील २९ जिल्ह्यांतील १२०३ ग्राम पंचायती आणि २३३६ गावे यांचा नमामि गंगे प्रकल्पांतर्गत समावेश आहे. या प्रकल्पांतर्गत गंगा नदी काठावरील गावांमध्ये २४२६ तरुण क्लब स्थापन झाले आहेत आणि १३,००० गंगादूत प्रकल्पाचा हिस्सा म्हणून काम करत आहेत.**

या प्रकल्पाचा उद्देश्य प्रशिक्षित आणि उच्च प्रेरित स्थानिक युवकांचा संवर्ग तयार करणे, प्रदूषित गंगेचा दुष्परिणाम आणि प्रभाव याबाबत जीवनाच्या सर्व थरांतील लोकांना जाणीव करून देऊन त्यांचा पाठिंबा मिळवणे, जागृती करून लक्ष्यीत वर्गाला शिक्षित करणे आणि स्वच्छ गंगा संबंधी विद्यमान सरकारी योजना आणि सेवांची माहिती पुरवणे हा आहे. सध्या उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगाल या चार राज्यांतील गंगा काठावरील २९ जिल्ह्यांतील १२०३ ग्राम पंचायती आणि २३३६ गावे यांचा नमामि गंगे प्रकल्पांतर्गत समावेश आहे. या प्रकल्पांतर्गत गंगा नदी काठावरील गावांमध्ये २४२६ तरुण क्लब स्थापन झाले आहेत आणि १३,००० गंगादूत प्रकल्पाचा हिस्सा म्हणून काम करत आहेत.

ई) **शुद्ध पाण्याचे प्रश्न:** जमशेदपूरमधील करीम सिटी महाविद्यालयातील एनएसएस स्वयंसेवकांनी दत्तक घेतलेल्या गावातील पिण्यासाठी आणि इतर कामांसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याच्या स्त्रोतांतील नमुने चाचणीसाठी गोळा करण्याचा उपक्रम हाती घेतला. महाविद्यालयाच्या रासायनिक प्रयोगशाळेत परीक्षा करण्यात आली. तिचा अहवाल जिल्हा प्रशासन अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला. जिल्हा प्रशासनाने मग या पाण्याची फेरपरीक्षा करून प्रदूषण कमीत कमी करण्यासाठी आणि ग्रामस्थांना शुद्ध पाणी पुरवण्यासाठी आवश्यक ते उपाय केले.

उ) **अलागप्पा चेत्तीयार गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, कराईकुड, तामिळनाडू (एनएसएस):** महाविद्यालयाच्या एनएसएस युनिटने जल प्रवाह आणि अतिक्रमण यांचे विश्लेषण केले आणि हे जल प्रवाह पालावानगुडी गावातील सर्व टाक्यांशी कसे जोडता येतील याच्या शक्यतेचा अभ्यास केला. बांधकाम अभियांत्रिकी विभागाच्या सहाय्याने त्यांनी पालावानगुडी गावातील नकाशाची रूपरेखा ठरवली

आणि स्थानिकांच्या मदतीने खोल करण्याचे काम, अतिक्रमण हटवणे, राडारोडा हटवणे अशी कामेही हाती घेण्यात आली. अखेर त्याचे सुपरिणाम दिसू लागले आणि टाक्या पावसाच्या पाण्याने भरल्या. सर्व जलस्रोत आता पाण्याच्या प्रवाहासाठी सम पातळीवर आणण्यात आले आहेत. रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि गावाच्या पाण्याच्या गरजांवर यामुळे कायमस्वरूपी तोडगा मिळाला आहे. (दिनमलारच्या मदुराई आवृत्तीत हे वृत्त प्रसिद्ध)

ऊ) **सिधी उन्नती प्रकल्प (एनएसएस)** : अहमदाबादच्या सिधी बस्ती या नागरी झोपडपट्टीत सिधी मुस्लीम जमात राहते. सारसपूर आर्टस अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या एनएसएस शाखेने नागरी भागातील ही मुस्लीम वस्ती दत्तक घेतली जी दशकाहून अधिक काळ कचरा टाकण्याचा विभाग होती आणि रहिवाशांसाठी जीवन खूपच अवघड बनले होते. सारसपूर महाविद्यालयाच्या एनएसएस स्वयंसेवकांनी त्या भागातील सर्व घाण आणि कचरा हटवला, स्वच्छता अभियान सुरु केले आणि हा भाग व्यवस्थित आणि स्वच्छ ठेवण्यासाठी चळवळ सुरु केली. एनएसएस स्वयंसेवकांच्या सततच्या चार वर्षांच्या प्रयत्नांनी सिधी नागरी झोपडपट्टी भाग कचरा मुक्त विभाग राहिला. याचा फायदा ३०० हून अधिक सिधी मुस्लीम आणि जवळपासच्या महाविद्यालयांतील २००० हून अधिक विद्यार्थ्यांना झाला. सारसपूर आर्टस अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या एनएसएस स्वयंसेवकांनी त्यांची घरे स्वच्छ ठेवून त्यांना रंगरंगोटी केली, त्यांची स्वच्छतागृहे सुधारली आणि ती उपयोगी बनवली. त्याशिवाय, एनएसएस युनिटने त्यांचे लोकनृत्य सिधीधमालला प्रोत्साहन देण्यास सहाय्य केले, मुलींसह दोनशे सिधी नागरिकांसाठी संगणक शिक्षणाचे वर्ग आयोजित केले, सिधी महिला आणि मुलींसाठी मजेदार खेळ आणि सांस्कृतिक उपक्रम घरबसल्या शिकता यावेत यासाठी सिधी बस्तीमध्ये लर्न विथ फन आयोजित करण्यात मदत केली.

ऋ) **एलईडी बल्ब शिबिरे (एनएसएस)**: केरळमधील १४ जिल्ह्यांत वेगवेगळ्या वेळी व्यावसायिक उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाच्या एनएसएस शाखेने दोन दिवसांच्या ३०८ उन्हाळी शिबिरांचे आयोजन केले ज्यात एलईडी बल्ब तयार करणे, कुटुंबांकडून खराब झालेले आणि फेकून दिलेले एलईडी बल्ब दुरुस्तीसाठी गोळा करणे, सामाजिक आर्थिक दुर्बल लोकांना एलईडी बल्बचे वितरण करणे, ग्रामस्थांमध्ये ऊर्जा वाचवण्याबाबत जागृती करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करणे असे विविध प्रकारचे प्रकल्प आणि कार्यक्रम यात घेण्यात आले. केरळ ऊर्जा व्यवस्थापन केंद्राकडून एलईडी बल्ब तयार करण्याचे तसेच त्यांची दुरुस्तीचे प्रशिक्षण स्वयंसेवकांना देण्यासाठी चार तास खर्च करण्यात आले. १५,४०० एनएसएस स्वयंसेवक आणि ३०८ प्रकल्प अधिकारी या शिबिरांत सहभागी झाले होते.

■■■

*लेखक युवक कल्याण आणि क्रिडा मंत्रालय, भारत सरकारचे सचिव आहेत.*

*ई मेल: secy-ya@nic.in*

## लेखकांना आवाहन

योजना मासिकासाठी लेख पाठविताना लेखकांनी UNICODE (Mangal) किंवा KRUTI DEV या फॉन्ट मध्येच आपले लेख पाठवावेत, ही विनंती.

# उर्जेची प्रकाशवाट....

**- चंद्रशेखर बावनकुळे**



**महाराष्ट्रात साडेतीन वर्षांपूर्वी सत्तेत आलेल्या सरकारने ऊर्जा क्षेत्राची विसकटलेली घडी पून्हा बसविण्याचे काम केले आहे. राजकीय इच्छाशक्तीच्या जोरावर राज्यातील भारनियमन संपवून अधिकची (सरप्लस) वीज असलेले राज्य अशी महाराष्ट्राची ओळख आता निर्माण करण्यात आली आहे. यासाठी ऊर्जा खात्याने विविध पातळ्यांवर नियोजनबध्द काम केले आहे.**

राज्याच्या ऊर्जाक्षेत्राची दिशा कुठे चालली, याबद्दलचा विचार केला तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने सूत्रे स्वीकारली तेव्हा ऊर्जाक्षेत्राची घडी कमालीची विस्कटलेली होती. नवे सरकार सत्तेवर आल्यानंतर सुमारे साडेतीन वर्षाचा जो कालावधी गेला त्या काळात या क्षेत्राला दिशा देऊन ऊर्जा क्षेत्रासमोरील आव्हानांचा सामना करण्यापलिकडे कोणताही पर्याय नव्हता. इच्छाशक्तीच्या माध्यमातूनच या राज्याचे भारनियमन संपले आणि अधिकची (सरप्लस) वीज असलेले राज्य म्हणून महाराष्ट्र राज्य देशात ओळखले जाऊ लागले. साडेतीन वर्षाच्या काळात राज्याच्या ऊर्जा क्षेत्राने देशात आपली वेगळी ओळख निर्माण केली.

**महानिर्मिती**

- महानिर्मिती ही शासकीय वीजनिर्मिती कंपनी आहे. औष्णिक, जल, वायू व सौर प्रकल्पातून राज्यासाठी वीज निर्मिती करण्यात येते. महानिर्मितीची वीज निर्माण करण्याची क्षमता १३८१७ मेगावॉट आहे. यात औष्णिक वीजनिर्मिती १०३८० मेगावॉट आहे. ६७२ मेगावॉट पवनऊर्जा, २५८५ मेगावॉट जलविद्युत आणि १८० मेगावॉट सौर ऊर्जा निर्माण केली आहे.
- कोळसा वाहतुकीच्या धोरणात बदल केला. जवळच्या कोळसा खाणीतून वीजनिर्मिती केंद्रांना कोळसा पुरवठा करुन ९४५ कोटींची बचत केली. केंद्र शासनाच्या मदतीने गरेपालमा ही मोठी कोळसा खाण महानिर्मितीला मिळाली. वीज उत्पादनाचा दर ३० पैशांनी कमी झाला.
- औष्णिक वीजनिर्मिती केंद्राच्या कामात सुधारणा, कार्यक्षमता वाढली. इंधन तेलाचा वापर कमी करण्यात यश आले.
- सांडपाणी पुनर्वापर प्रकल्प. नागपूरचे सांडपाणी प्रक्रिया करून कोराडी येथील सुपरक्रिटिकल वीजनिर्मिती केंद्राला पुरविले जाते. १३० दशलक्ष लिटर पाणी या प्रकल्पाला मिळते. देशातील हा पहिला यशस्वी प्रयोग ठरला.
- कोराडीचा ३६६० मेगावॉट क्षमतेचा वीजनिर्मिती प्रकल्पच १४ एप्रिलला पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.
- राख उपयोगिता धोरण :वीजनिर्मिती केंद्रातून निघणाऱ्या राखेचा वापर करुन पर्यावरण संवर्धनाच्या मोहिमेला हातभार. २ जून २०१६ रोजी महाजेम्स ही महाजेनकोची उपकंपनी स्थापन करण्यात आली.

**महावितरण**

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिनांक २५ फेब्रुवारी रोजी आपल्या "मन की बात" या लोकप्रिय जनतेशी संवाद कार्यक्रमात राज्याच्या ऊर्जा विभागाने केलेल्या कामाची दखल घेत मुंबईतील समुद्रात असलेल्या एलिफेंटा बेटावरील लेण्यांमध्ये वीज पोहोचवणे ही विकासाची नवी सुरूवात असल्याचा उल्लेख करून ऊर्जा विभागाचे कौतुक केले.

गेल्या साडेतीन वर्षापासून मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या नेतृत्वात ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे ऊर्जा विभागाचा रथ महत्प्रयासाने विकासाकडे नेत आहेत. स्वातंत्र्यानंतर ७० वर्षापासून एलिफंटा लेण्यांच्या परिसरात वीज गेली नाही. पण ऊर्जा विभागाने मात्र यंदा या परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या जीवनातील ७० वर्षापासून असलेला अंधार दूर केला, याचाही उल्लेख पंतप्रधानांनी आपल्या "मन की बात" मध्ये केला. प्रकाशपर्वाच्या सुरूवातीमुळे अंधार नाहीसा होऊन जीवन प्रकाशमान होणार असल्याचेही पंतप्रधानांनी म्हटले.

**स्वातंत्र्यानंतर ७० वर्षापासून एलिफंटा लेण्यांच्या परिसरात वीज गेली नाही. पण ऊर्जा विभागाने मात्र यंदा या परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या जीवनातील ७० वर्षांपासून असलेला अंधार दूर केला, याचाही उल्लेख पंतप्रधानांनी आपल्या "मन की बात" मध्ये केला. प्रकाशपर्वाच्या सुरूवातीमुळे अंधार नाहीसा होऊन जीवन प्रकाशमान होणार असल्याचेही पंतप्रधानांनी म्हटले.**

एलिफंटा लेण्यांच्या घारापुरी गावात राहणाऱ्या नागरिकांच्या जीवनात आता प्रकाशपर्व सुरू झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही ऊर्जा विभागाने समुद्र तळाखालून ७.५ किमी लांब केबल टाकून केलेल्या कामाचे कौतुक केले. घारापुरी बेटावर वीज पोहेचल्यामुळे पर्यटनाला चालना आणि स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

यापुढे जावून घारापुरी बेटाच्या सभोवताली दोन कोटी रूपये खर्च करून एलईडीद्वारे झगमगाट करण्याचा मनोदेय ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा आहे. या बेटावरील विद्युतीकरणाचे अत्यंत अवघड काम महावितरणने पूर्ण करणेही कौतुकास्पद बाब आहे.

- महावितरणकडून राज्यात २३७०० विजेचा विक्रमी पुरवठा : महावितरणने सोमवार, २३


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 230/-;** 2 Yrs. **Rs. 430/-;** 3 Yrs. **Rs. 610/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ______________________ date ______________

Name (in block letters) : ______________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ______________________

Phone No. / email : ______________________

PIN : ☐☐☐☐☐☐

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

**सभासद शुल्क मनी ऑर्डर किंवा डिमांड ड्राफटद्वारे पाठवावे,**

**अथवा** www.bharatkosh.gov.in/product **येथे ऑनलाईन भरावे.**

एप्रिल २०१८ ला राज्यात २३ हजार ७०० एवढया मेगावॅट विजेचा यशस्वीपणे पुरवठा केला. मागील काही वर्षात वीज यंत्रणेची मोठया प्रमाणात सक्षमीकरण व आधुनिकीकरण करण्यात आल्यामुळे विजेच्या एवढया विक्रमी मागणीचा पुरवठा करणे महावितरणला शक्य झाले. राज्यात महावितरणच्या कार्यक्षेत्रात २३ एप्रिल २०१८ ला २३ हजार ७०० मेगावॅट एवढया विजेची कमाल मागणी नोंदविण्यात आली. महावितरणने विजेची ही संपूर्ण मागणी यशस्वीपणे पूर्ण केली. राज्यात वीज यंत्रणेचे सक्षमीकरण व आधुनिकीकरण मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. तसेच या यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीची कामेही नियमितपणे केली जातात. त्यामुळे एवढया मोठया प्रमाणातील विजेच्या मागणीचा पुरवठा महावितरणला पूर्ण करता येणे शक्य झाले आहे.

- पैसे भरून प्रलंबित असलेल्या सुमारे २ लाख २४ हजार कृषीपंप ग्राहकांना आता उच्चदाब वितरण प्रणालीतून वीज कनेक्शन देण्यात येणार : सध्याच्या पध्दतीनुसार शेतकऱ्यांना ६५ व १०० केव्हीए क्षमतेच्या रोहित्रातून १५ ते २० कृषी ग्राहकांना विद्युत पुरवठा करण्यात येतो. यामुळे लघुदाब वाहिनीची लांबी वाढते व वीज हानी मोठ्या प्रमाणात होते. शिवाय शेतकऱ्यांना कमी दाबाने वीज पुरवठा होतो. वीज पुरवठ्यात वारंवार बिघाड होऊन वीज पुरवठा खंडित होणे, तांत्रिक वीज हानी, रोहित्र बिघाड, विद्युत अपघात आदींना महावितरणला सामोरे जावे लागते. या सर्व अडचणींवर एचव्हीडीएस योजनेद्वारे मात करता येणे शक्य होणार आहे. उच्चदाब प्रणालीत उच्चदाब वाहिन्यांवरील विद्युत प्रवाह मोठया प्रमाणात कमी होईल. या प्रणालीमुळे वाहिन्यांवर आकडे टाकून वीज चोरी करता येणार नाही. या योजनेवर ४४९६.६९ कोटी व नवीन उपकेंद्रासाठी लागणारा अंदाजे खर्च ५५१.४४ कोटी अशा एकूण ५०४८.१३ कोटी रूपये इतक्या खर्चाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. तसेच विदर्भ व मराठवाडा विभागातील कृषीपंपांना वीज जोडणी देणे या योजनेअंतर्गत सन २०१८-१९ व २०१९-२० साठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येईल.

गेल्या तीन वर्षात ४ लाखावर कृषीपंपांना वीज कनेक्शन देण्यात आले असून महावितरणद्वारे प्रति कनेक्शन १.५ लाख इतका निधी खर्च करण्यात आला. एचव्हीडीएस योजनेअंतर्गत प्रति कृषीपंप २ लाख खर्च अपेक्षित आहे.

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, Ministry of Information & Broadcasting**
**Room No. 48 to 53, Soochna Bhavan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi - 110003.**
**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022-2756 6582 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

सध्याच्या लघुदाब प्रणालीपेक्षा उच्चदाब वितरण प्रणालीचे फायदे अधिक आहेत. गेल्या मार्च २०१८ पर्यंत २ हजार ४८७ कृषी पंपांचे ऊर्जीकरण होणे अपेक्षित आहे. त्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून कामाचे कार्यादेशही देण्यात आले आहेत. या वर्षात नोव्हेंबर २०१७ अखेर पर्यंत ४८ हजार ४३७ कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्यात आले असून ३० हजारावर कृषीपंपांचे वीज कनेक्शनचे काम प्रगतीपथावर आहे.

हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण होण्यासाठी महावितरणच्या मुख्यालयात एक स्वतंत्र कक्ष स्थापण्यात येणार आहे. एचव्हीडीएस योजना लागू झाल्यानंतर लघुदाब व उच्चदाब वितरण प्रणाली या दोन्ही प्रणाली कार्यरत राहतील. मागील साडेतीन वर्षात ऊर्जा विभागाने वीज वितरण क्षेत्रात केलेली उल्लेखनीय कामगिरी पुढील प्रमाणे आहे.

- भारनियमनमुक्त राज्य : १२ तास भारनियमनात हे राज्य बुडाले होते. राज्य भारनियमन मुक्त करण्यात यश.
- लोकाभिमुख कारभार : महावितरणचा कारभार लोकाभिमुख व्हावा म्हणून ४ प्रादेशिक कार्यालयांची निर्मिती २ ऑक्टोबर २०१६ पासून करण्यात आली.
- शेतकऱ्यांना १२ तास वीजपुरवठा करण्याचा निर्णय. घरगुती ग्राहकांना २४ तासात नवीन वीजजोडणीचा निर्णय. विदर्भ मराठवाड्यातील ४ लाख कृषी पंपांना वीज कनेक्शन. 2 लाख कनेक्शनची आजही मागणी.
- कृषी पंपांना 10 तास रात्री व 8 तास दिवसा तीन फेजचा वीजपुरवठा चक्राकार पध्दतीने. उपसा जलसिंचन योजनांना 16 तास तीन फेज वीजपुरवठा.
- वितरणहानी कमी करण्यात यश. २०१५-१६ मध्ये ३०५२ उपकेंद्रे कार्यान्वित उच्च दाब वाहिन्यांमध्ये वाढ. उच्च दाब वाहिन्या २.२ लाख किमीव्रुन ३.५ लाख किमीपर्यंत पोहोचल्या. लघुदाब वाहिन्या ४.७८ लाख किमीवरून ६.२८ लाख किमीपर्यंत पोहोचल्या.
- मोबाईल ॲपची सुविधा. इंग्रजी, मराठी भाषेत उपलब्ध. मे २०१७ पर्यंत १६ लाखांहून अधिक ग्राहकांनी ॲप डाऊनलोड केले.
- विदर्भ मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी, डी प्लस क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना वीजदरात सवलत.
- इन्फ्रा २, दीनदयाल ग्राम ज्योती योजना अशा विविध योजनांद्वारे कोट्यवधी रुपयांच्या सेवासुविधा राज्यातील जनतेला उपलब्ध. पायाभूत सुविधा निर्माण करणे, वीजपुरवठा करणारी यंत्रणा अधिक मजबूत करणे.

**महापारेषण**

- वीजनिर्मिती आणि महावितरण यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून महापारेषणची भूमिका आहे. राज्यातील २.७५ कोटी वीज ग्राहकांना वीजपुरवठा केला जातो.
- वितरण कंपनीपर्यंत वीज वाहून आणण्यासाठी पारेषण प्रणालीत ७६५ केव्ही, एचव्हीडीसी प्रणाली, ४०० केव्ही, १३२ केव्ही वाहिन्यांसाठी ७०० अति उच्चदाब उपकेंद्राचा त्यात समावेश आहे. येत्या ५ वर्षात पारेषण प्रणाली अधिक मजबूत करण्यासाठी १०० नवीन उपकेंद्रे निर्माण केली जाणार आहेत.
- सन २०१२-१३ मध्ये १८२६८ मेगावॉट असलेली राज्याची मागणी. सन २०१६-१७ मध्ये २३०५५ मेगावॉट इतकी झाली. मागणीएवढी वीज कोणत्याही अडचणींशिवाय यशस्वी पारेषित. यंत्रणेवर कुठेही ताण नाही. हे एक विकासाचे आणि यशाचे मापदंड मानले जाते.

**महाऊर्जा**

- येत्या २०२५ पर्यंत राज्यातील सर्वच सुमारे ४५ लाख कृषीपंपांना टप्प्याटप्प्याने सौरऊर्जेद्वारे वीजपुरवठा करण्याचे राज्य शासनाचे नियोजन आहे. त्यामुळे कृषीपंपांना दिवसा तसेच पुरेशी व स्वस्त वीज मिळावी ही शेतकरी बांधवांची मुख्य मागणी पूर्ण होईल, सोबतच क्रॉस सबसीडी कमी झाल्याने प्रामुख्याने औद्योगिक व वाणिज्यिक वीजदर सुद्धा कमी होतील.
- कृषीपंपांसोबतच राज्यातील नळयोजना व उपसा जलसिंचन योजना संपूर्णपणे सौर ऊर्जेवर आणण्याची अंमलबजावणी सुरु आहे. गावांमधील सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांचे ७.५ एचपीपर्यंतचे पंप लवकरच सौर पंपांनी बदलण्याचे काम हाती घेण्यात येत आहे. १४,४०० मेगावॉटचे अपारंपरिक ऊर्जा निर्मिती करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. येत्या डिसेंबर २०१९ पर्यंत हे उद्दिष्ट पूर्ण होणार.
- आगामी काळ सौर ऊर्जानिर्मितीचा काळ. शाश्वत, स्वच्छ वीज ग्राहकांना देण्याची गरज.
- शासनाने सौर ऊर्जेचे नवे धोरण आणले. तसेच ऊर्जा संवर्धन

धोरणही नुकतेच मंजूर केले. ऊर्जा संवर्धन धोरण राबविणारे महाराष्ट्र देशातील एकमेव राज्य आहे. सौर ऊर्जा धोरणानुसार गेल्या ३१ मार्चपर्यंत ७५५४ मेगावॉटचे सौर ऊर्जेचे प्रकल्प निर्माण करण्यात आले.

- पाच वर्षात १४४०० मेगावॉट सौर ऊर्जा निर्मितीचे महाऊर्जाचे लक्ष्य. ऊर्जानिर्मितीचे आव्हान असले तरी ऊर्जाक्षेत्रासाठी मोठी संधी आहे.
- मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी : ग्रामीण भागात गावठाण व कृषी वाहिनी वेगळी झाली आहे, अशा ठिकाणी कृषी वाहिनीचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्यासाठी ही योजना शासनाने जाहीर केली. राळेगणसिध्दी (अहमदनगर) व कोळंबी (यवतमाळ) येथे प्रायोगिक तत्त्वावर सुरु होत आहे.
- ऊर्जा संवर्धन धोरणाअंतर्गत पाच वर्षात १००० मेगावॉट ऊर्जा बचतीचे लक्ष्य.
- अटल सौर कृषी पंप योजनेअंतर्गत १० एकराच्या आतील जमीन असलेल्या शेतकऱ्यांना एनर्जी इफिशिएन्सी पंपाचे वाटप करणार. ९० टक्के अनुदान. मे २०१७ पर्यंत २७३७ पंप आस्थापित झाले.


■■■

*लेखक महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जाखात्याचे मंत्री आहेत.*

*ई मेल: min.energy@maharashtra.gov.in*

**आगामी अंक**

**ऑगस्ट २०१८**
**'सामाजिक सबलीकरण'**



# नवीकरणीय ऊर्जा विस्तार कार्यक्रम २०२२

- मनोज कुमार
- डॉ. अभिनव त्रिवेदी



**नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने (एम.एन.आर.ई) स्वच्छ ऊर्जा मिळण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. यासाठी जगातला सर्वाधिक क्षमतेचा नवीकरणीय ऊर्जा विस्तार कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. गेल्या चार वर्षात (मे २०१४ - मार्च २०१८) नवीकरणीय ऊर्जेची क्षमता ३७.३३ GW इतकी वाढली आहे. यामुळे एकंदरीत ६९ GW (२०%) नवीकरणीय ऊर्जा निर्माण क्षमता यंत्रणा स्थापन झाली आहे.**

भारताच्या ऊर्जा विषयक गरजांवर जे उपाय योजण्यात येतात त्याचा एक अविभाज्य भाग म्हणून नवीकरणीय ऊर्जा क्षेत्र उदयाला येत आहे. गेल्या काही वर्षात देशाच्या ऊर्जा क्षेत्रामध्ये नवीकरणीय ऊर्जेचा लक्षणीय प्रभाव दिसुन येत आहे. वर्ष २०२२ पर्यंत १७५ GW नवीकरणीय ऊर्जा स्थापन करण्याचे लक्ष्य साध्य करण्याच्या मार्गावर देश वाटचाल करत आहे.

नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने (एम.एन.आर.ई) स्वच्छ ऊर्जा मिळण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. यासाठी जगातला सर्वाधिक क्षमतेचा नवीकरणीय ऊर्जा विस्तार कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. गेल्या चार वर्षात (मे २०१४ - मार्च २०१८) नवीकरणीय ऊर्जेची क्षमता ३७.३३ GW इतकी वाढली आहे. यामुळे एकंदरीत ६९ GW (२०%) नवीकरणीय ऊर्जा निर्माण क्षमता यंत्रणा स्थापन झाली आहे. वर्ष २०२२ पर्यंत १७५ GW नवीकरणीय ऊर्जा यंत्रणा स्थापन करण्याचे उद्दीष्ट गाठण्यासाठी नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने अनेक नव्या योजना सुरु केल्या आहेत. पवन-सौर संकरीत ऊर्जा प्रकल्प, समुद्र किनाऱ्यावर पवन ऊर्जा प्रकल्प, जेव इंधन आणि उसाच्या चिपाडापासून ऊर्जा निर्मिती प्रकल्प, उद्योगांसाठी जैव इंधन वायू निर्मिती, सौर उद्याने आणि अती भव्य सौर ऊर्जा प्रकल्प, कालव्यांच्या तीरावर ग्रिड कनेक्टेड सौर PV ऊर्जा प्रकल्प, आणि जैव इंधनावर आधारीत ग्रीड ऊर्जा निर्मिती कार्यक्रम अशा सर्व प्रकल्पांच्या विकासासाठी नव्या योजना सुरु केल्या आहेत.

या सर्व प्रकल्पांमध्ये राष्ट्रीय सौर मिशन हा सर्वाधिक महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. यामधून ऊर्जा निर्मितीसाठी सौर ऊर्जा वापराला प्रोत्साहन देण्यात येते. कोळसा किंवा खनिज वायूच्या सहाय्याने ऊर्जा निर्मितीसाठी जो खर्च येतो तितक्याच खर्चात सौर ऊर्जा निर्माण करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. सौर ऊर्जा (रू. २.४४/ युनिट) किंवा पवन ऊर्जा (रू.२.६४/ युनिट) निर्मितीचे दर किमान पातळीवर आणण्यात आले असून पारदर्शक पध्दतीने लिलाव प्रक्रिया केल्यामुळे तसेच अनेक सुविधा पुरवल्यामुळे हे ऐतिहासिक दर गाठण्यात आले. यामुळे नवीकरणीय क्षेत्रात मोठे पाठबळ मिळाले आहे.

सौर उर्जेच्या कमी होत जाणाऱ्या दरांचा तक्ता कालक्रमानुसार शेजारी दिला आहे.

नवीकरणीय उर्जेच्या विविध योजनांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी भारत सरकार अनेक उपाय योजना आहे. जनरेशन बेस्ड इन्सेंटीव्हज, (जी. बी.आय.) , भांडवलात आणि व्याजात

अनुदान देणे, व्हायबिलिटी गॅप फंडींग, सवलतीच्या दरात अर्थपुरवठा करणे, आर्थिकदृष्टया प्रोत्साहन देणे अशा अनेक पातळयांवर उपाय केले जात आहेत. नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने या व्यतिरिक्तही अनेक पावले उचलली आहेत. नवीकरणीय ऊर्जा खरेदीसाठी अनेक विशेष पावले उचलली आहेत. नवीकरणीय ऊर्जा खरेदी (आर.पी.ओ.) बंधनकारक

| क्रं. | कालखंड | क्षमता | किमान दर (रू./ Kwh) | योजना | राज्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | फेब्रुवारी-२०१७ | ७५० MW | ३-३० | राज्य योजना | मध्यप्रदेश (रेवा सौर उद्यान) |
| २ | मे -२०१७ | २५० MW | २-६२ | व्हि.जी.एफ | राजस्थान (भाडला IV सौर उद्यान |
| ३ | मे-२०१७ | ५०० MW | २-४४ | व्हि.जी.एफ | राजस्थान (भाडला III सौर उद्यान |
| ४ | ऑगस्ट-२०१७ | ५०० MW | २-६५ | राज्य योजना | गुजरात (विना सौर ऊर्जा |

*स्त्रोत - नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय.*

करणे आणि नवीकरणीय ऊर्जा निर्मिती बंधनकारक (आर.पी.ओ.) करण्यासाठी विद्युत कायदा आणि दर धोरणामध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. हरीत ऊर्जा (कॉरीडॉर) मार्ग प्रकल्पाद्वारे नवीकरणीय उर्जेचे स्थलांतर करणे, एकात्म ऊर्जा विकास योजनांमधल्या (आय.पी.डे.एस.) वितरण कंपन्यांना प्रोत्साहन देण्यासाठी उपाय करणे, नेट -मीटरींग आवश्यक करणे, द्विपक्षीय आणि आंतरराष्ट्रीय दात्यांमार्फत निधी उभारणे, हरीत हवामान निधी उभारणे अशा अनेक उपायांचा समावेश मंत्रालयाने केला आहे.

**नवीन आणि नवीकरणीय मंत्रालयाने घेतलेले पुढाकार याप्रकारे आहेत.**

**सौर ऊर्जा**

- 'सौर उद्याने आणि अती भव्य सौर ऊर्जा प्रकल्प' योजनांची क्षमता सुधारण्यात आली आहे. ही क्षमता २० GW वरुन ४० GW इतकी करण्यात आली आहे.
- नवीन इमारती बांधताना किंवा चटई क्षेत्र वाढवून देताना छतावर सौर प्रकल्प बसविणे बंधनकारक करण्यासाठी इमारतीच्या उप नियमांमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. छतावरच्या सौर प्रकल्पाला बँकांच्या किंवा राष्ट्रीय गृहनिर्माण बँकाच्या गृहकर्जातच समाविष्ट करण्यासाठी उपनियमांमध्ये सुधारणा केल्या आहेत.
- स्मार्ट शहरांचा विकास करताना छतावरच्या सौर फोटो व्होल्टाईक यंत्रणेला बंधनकारक करण्यासाठी आणि १०% नवीकरणीय ऊर्जा घेणे बंधनकारक करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे आखण्यात आली आहेत.
- सौर ऊर्जा प्रकल्प स्थापन करण्यासाठी करमुक्त रोखे उभारणे आणि याद्वारे समभागांचे नियोजन करण्यात येते.
- सौर ऊर्जा खरेदी करण्यासाठी उर्जेच्या दरावर आधारीत स्पर्धात्मक लिलाव प्रक्रिया तयार करणे.
- छतावरील सौर प्रकल्प उभारण्यासाठी केंद्रातून आर्थिक सहाय्य देण्यात येते. सर्वसाधारण श्रेणी असलेल्या राज्यांमधल्या घरगुती, संस्थांसाठी, समाजिक क्षेत्रासाठीच्या प्रकल्पांना ३०% पर्यंत सहाय्य देण्यात येते. विशेष श्रेणी दिलेल्या राज्यांमधल्या अशा प्रकल्पांना ७०% पर्यंत सहाय्य देण्यात येते.
- सौर ऊर्जा प्रकल्पासाठी लागणारे, तांत्रिक पात्रता असलेले मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी सूर्य मित्र कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत ११ हजाराहून अधिक माणसांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

**पवन ऊर्जा**

- पवन ऊर्जा स्थापन करण्याच्या क्षमते संदर्भात जागतिक क्रमवारीत, चीन, अमेरीका आणि जर्मनी नंतर भारत चौथ्या क्रमांकावर आहे.
- राष्ट्रीय पवन ऊर्जा संस्थेद्वारा (एन. आय.डब्ल्यू.इ.) देशाच्या पवन ऊर्जा क्षमतेबाबत फेरतपासणी करण्यात आली. टर्बाईन हबची उंची १०० मीटर असेल तर ३०२GW पवन ऊर्जा निर्माण करण्याची क्षमता असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.
- भारताला लांबलचक समुद्र किनारा

लाभला आहे. या किनाऱ्यावर पवन ऊर्जा प्रकल्पाचा विकास करणे शक्य आहे. यासाठी राष्ट्रीय किनारपट्टी पवन ऊर्जा धोरणाला केंद्रीय मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे.

- तामिळनाडू राज्यात वाऱ्याचा अंदाज वर्तवण्याची प्रक्रीया करण्यात येत आहे. त्या अनुभवावरुन आता राष्ट्रीय पवन ऊर्जा संस्थेने गुजराथ आणि राजस्थान या राज्यांशी सामंजस्य करार केले आहेत.
- बहुतेक टर्बाईन हबची उंची १०० मीटर्स पेक्षा जास्त असल्याने पवन स्त्रोतासाठी करण्यात आलेले मेसो स्केल मॅप १२० मीटर उंचीचे आहेत.

### जैव ऊर्जा

- जैव इंधन प्रकल्पाला केंद्र सरकारकडून अर्थ सहाय्य देण्यात येते. यामध्ये जैव इंधन दहन, जैव इंधनातून वायू निर्मिती आणि उसाच्या चिपाडापासून सहनिर्मिती करणे या प्रकल्पांचा समावेश आहे.
- कॅप्टीव्ह ऊर्जा निर्मितीसाठी ऑफ ग्रीड जैव इंधन प्रकल्पाला प्रोत्साहन देणे.
- प्रामुख्याने ग्रामीण आणि अर्ध नागरी घरांसाठी कुटुंबाच्या गरजेपुरता आकार असलेला जैव इंधन प्रकल्प स्थापन करण्यात येत आहे. राष्ट्रीय जैव इंधन आणि खत व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत (एन.बी.एम. एम.पी.) असे प्रकल्प स्थापन करण्यात येतात. नवीकरणीय उर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी दरपत्रकात सुधारणा.
- सौर नवीकरणीय ऊर्जा खरेदी करणे बंधनकारक केले आहे. यासाठीची मर्यादा वाढवण्यात आली आहे. वर्ष २०२२ पर्यंत ही मर्यादा ८% इतकी करण्यात येणार आहे.

**सौर उर्जेवर आधारीत जनित्रे स्थापन करणे, जैव इंधनावर आधारीत जनित्रे स्थापन करणे, पवन ऊर्जा यंत्रणा बसविणे, सूक्ष्म जलविद्युत प्रकल्प स्थापन करणे, नवीकरणीय ऊर्जा वापरुन रस्त्यांवरचे दिवे बसवणे, दुर्गम ग्रामीण भागात नवीकरणीय उर्जेच्या सहाय्याने वीज पोहोचवणे अशा कामासाठी बँकेकडून 15 कोटी रुपयांपर्यंत कर्ज मिळण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. घरगुती वापरासाठी 10 लाख रुपयांपर्यंत वैयक्तीक कर्ज मिळू शकते.**

- कोळसा किंवा लिग्नाईटवर आधारीत असलेल्या नवीन प्रकल्पांमध्ये नवीकरणीय ऊर्जा निर्मिती बंधनकारक करण्यात येत आहे.
- नवीकरणीय विद्युत उर्जेचे दर परवडण्यासाठी नवीकरणीय उर्जेचे एकीकरण करण्यात येत आहे.
- सौर आणि पवन उर्जेचे आंतर राज्यीय प्रेषण (ट्रान्समिशन) करण्यासाठी लागणारे शुल्क काढून टाकण्यात आले आहे.
- सौर आणि विना सौर नवीकरणीय उर्जेची खरेदी करणे बंधनकारक करण्याबाबत ऊर्जा मंत्रालयाने सूचना दिली आहे. सुधारीत दर धोरणाचा पाठपुरावा करत दिर्घकालीन वाढीचा मार्ग आखण्यात आला आहे. वर्ष २०१६-१७, २०१७-१८ आणि २०१८-१९ साठीचे नियोजन पुढील प्रमाणे आहे.

| वाढीचा मार्ग | २०१६ आणि १७ | २०१७ आणि १८ | २०१८ आणि १९ |
|---|---|---|---|
| विना सौर ऊर्जा | ८-७५ % | ९-५० % | १०-२५ % |
| सौर ऊर्जा | २-७५ % | ४-७५ % | ६-७५ % |
| एकूण | ११-५० % | १४-२५ % | १७-०० % |

### हरीत ऊर्जा मार्ग (ग्रीन एनर्जी कॉरीडॉर)

- तामिळनाडू, राजस्थान, कर्नाटक, आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, हिमाचल प्रदेश आणि मध्यप्रदेश ही राज्ये नवीकरणीय उर्जेबाबत समृध्द आहेत. या आठ राज्यांनी राज्यांतर्गत प्रेषण यंत्रणा राबवायला सुरवात केली आहे. मोठया प्रमाणावर उपलब्ध असलेली सुमारे २०,००० MW नवीकरणीय ऊर्जा स्थलांतरीत करण्याच्या उद्देशाने ही यंत्रणा उभारण्यात येत आहे.

  या प्रकल्पात सुमारे ९४०० ckm प्रेषण वाहिन्या आणि सुमारे १९,००० MVA एकूण क्षमता असलेली उपकेंद्रे असून संपूर्ण प्रकल्पाचा खर्च १०,१४१ कोटी रुपये इतका आहे.

### इतर पुढाकार

- आंतरराष्ट्रीय सौर आघाडी (आय. एस.ए.) करण्यात आली असून या आघाडीला डिसेंबर २०१७ मध्ये कायदेशीर मान्यता मिळाली आहे. यामध्ये भारताने पुढाकार घेतला असून सोबत फ्रान्स आहे. आंतरराष्ट्रीय नवीकरणीय ऊर्जा समाजाचे मुख्य कार्यालय भारतात उघडण्यात आले आहे. आय.एस.ए. ही आंतरराष्ट्रीय संघटना असून

त्यात १२१ देशांचा समावेश आहे. हे सर्व देश कर्कवृत्त आणि मकरवृत्ताच्या दरम्यान येतात.

- सौर उर्जेवर आधारीत जनित्रे स्थापन करणे, जैव इंधनावर आधारीत जनित्रे स्थापन करणे, पवन ऊर्जा यंत्रणा बसविणे, सूक्ष्म जलविद्युत प्रकल्प स्थापन करणे, नवीकरणीय ऊर्जा वापरुन रस्त्यांवरचे दिवे बसवणे, दुर्गम ग्रामीण भागात नवीकरणीय उर्जेच्या सहाय्याने वीज पोहोचवणे अशा कामासाठी बँकेकडून १५ कोटी रुपयांपर्यंत कर्ज मिळण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. घरगुती वापरासाठी १० लाख रुपयांपर्यंत वैयक्तीक कर्ज मिळू शकते.
- विद्युत कायदा २००३ अनुसार, नवीकरणीय ऊर्जा निर्मिती आणि वितरण प्रकल्पांसाठी १०० % पर्यंत थेट विदेशी गुंतवणूकीला (एफ.डी.आय.) मान्यता देण्यात आली आहे.

■■■

*लेखक मनोज कुमार उपाध्याय निती आयोगामध्ये ऊर्जा, हवामान बदल या विषयाचे उपसल्लागार असून धोरण विषयक संशोधनाचे काम पाहतात. अभिनव त्रिवेदी याच विभागातील तज्ञ आहेत.*

*ई मेल: mk.upadhyay@nic.in*
*abhinav.tivedi@nic.in*

## सुवर्णसंधी!

योजना मासिकाचे जुने अंक वाचकांच्या खास आग्रहास्तव उपलब्ध करून देण्यात येत आहेत. इच्छुकांनी यासाठी योजना कार्यालयात संपर्क साधावा.

दूरध्वनी- ०२२-२७५६६५८२
email : myojanadpd@gmail.com



मिंमासा

# फरार आर्थिक गुन्हेगार विधेयक २०१८

**- डॉ. सीएमए व्ही. मुरली**




**सरकारच्या मते भारतीय दंड विधान, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, काळापैसा विरोधी कायदा यासारखे अनेक कायदे असले तरी आर्थिक गुन्ह्यांच्या वाढीस आळा घालण्यासाठी तसेच आर्थिक गुन्हेगारांना शिक्षा करण्यासाठी सरकारने अर्थसंकल्पीय अधिवेशनात एका नव्या कायद्याची घोषणा केली होती. त्यामुळे अशा गुन्हेगारांची मालमत्ता जप्ती, विक्री व त्यातून येणारा पैसा कर्जदार संस्थांना देणे यासारखे अधिकार सरकारला मिळणार आहेत.**

सध्या जगातील आर्थिक परिस्थिती ही दोलायमान आहे. त्याच्या जोडीला आपल्या देशाने जागतिकीकरणासाठी दारे खुली केली आहेत. त्यामुळे आपल्यालाही काही धक्के बसत आहेत. आतापर्यंत जागतिक आर्थिक चढउतारांचे धक्के आपल्याला फार बसत नव्हते पण आता उदारीकरणानंतर आंतरराष्ट्रीय आर्थिक घडामोडींचे परिणाम होत आहेत. भारतीय उद्योगांनी आता जगात पंख पसरले असून त्यांचा विस्तार झाला आहे. बँकाकडून त्यांनी भांडवल घेतले आहे. एरवी जरा नियमांच्या आड राहून आडेवेढे घेणाऱ्या बँकाही कर्जे देत आहेत. त्यात आर्थिक वाढीची अपेक्षा आहे. पण आता बँकांना त्याचे काही चटके बसत आहेत. सरकारच्या मते भारतीय दंड विधान, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, काळापैसा विरोधी कायदा यासारखे अनेक कायदे असले तरी आर्थिक गुन्ह्यांच्या वाढीस आळा घालण्यासाठी तसेच आर्थिक गुन्हेगारांना शिक्षा करण्यासाठी सरकारने अर्थसंकल्पीय अधिवेशनात एका नव्या कायद्याची घोषणा केली होती. त्यामुळे अशा गुन्हेगारांची मालमत्ता जप्ती, विक्री व त्यातून येणारा पैसा कर्जदार संस्थांना देणे यासारखे अधिकार सरकारला मिळणार आहेत. नीरव मोदी व मेहूल चोकसी या मामा-भाच्यांच्या कारस्थानात पंजाब नॅशनल बँकेला मोठा आर्थिक फटका बसला. त्यामुळे केंद्रीय मंत्रिमंडळाने फरार आर्थिक गुन्हेगार विधेयक मंजूर केले आहेत. त्यामुळे आर्थिक गुन्हेगारांचा बंदोबस्त होईल व गुंतवणूकदार, बँक ग्राहक यांचा बँकिंग व्यवस्थेवरचा विश्वास वाढणार आहे.

विधेयकामागील तर्कसंगतता व पूर्वपीठिका- कर्ज दिल्यानंतर काही उद्योग बुडित खाती निघतात त्यामुळे ते कर्जाची परतफेड करत नाहीत. त्यामुळे बँकिंग क्षेत्रावर परिणाम झाला आहे. कर्जबुडवेगिरी करणारे काही बडे लोक देशातून पळून जातात. त्यांना आपले कुणी काही करू शकत नाही असे वाटत असते. त्यांना काही शिक्षा होण्याआधीच ते परदेशात पळून जातात कारण त्यांना देशात राहिल्यास कारवाईची भीती असते. अधिकाऱ्यांचा ससेमिरा पाठीशी लागू नये म्हणून ते पळून जातात. त्यांनी बुडवलेली रक्कम कोट्यवधींच्या घरात असते. त्याची परतफेड होण्याची शक्यताच मग संपून जाते. देशातील बँका, चौकशी संस्था, अभियोक्ता संस्था या सर्वांना अंधारात ठेवून हे बडे उद्योगपती परदेशात पळून जातात. शिवाय त्यांची संपत्ती परदेशातही असते. त्यामुळे तेथेही ते आरामात राहतात. सध्याचे नागरी व फौजदारी कायदे हे यात पुरेसे ठरत नाहीत. त्यामुळे अशा कर्जबुडवेगिरी करणाऱ्या लोकांमुळे अर्थव्यवस्थेला फटका बसतो.

एखादा आर्थिक गुन्हेगार परदेशात पळून गेल्यानंतर त्याला पुन्हा भारतात आणण्याची प्रक्रिया जटील असते. त्यात काही वर्षे जातात. आता सरकार यातील पळवाटा बंद करण्यासाठी विचार करीत असून त्यात सध्याच्या कायद्यात सुधारणा केल्या जात आहेत. आर्थिक गुन्हेगार जर देशाबाहेर पळून गेले तर त्यांच्यावर कडक कारवाईची तरतूद त्यात होत आहे. अशा कठोर उपाययोजना केल्याशिवाय सरकारला गत्यंतर नाही. यात त्यांची गैरमार्गाने मिळवलेली संपत्ती जप्त करणे यासारख्या उपायांनी जरब बसू शकते. नवीन विधेयकातील तरतुदीनुसार आर्थिक गुन्हे करून पळून जाणाऱ्या गुन्हेगारांना ते दोषी न ठरताही त्यांची भ्रष्टाचाराने मिळवलेली मालमत्ता जप्त करण्यात येऊ शकेल. ही संयुक्त राष्ट्रांच्या जाहीरनाम्यात बसणारी तरतूद आहे. हे विधेयक कायदेशीर कारवाईपासून पळ काढणाऱ्या आर्थिक गुन्हेगारांना लक्ष्य करणारे आहे. दिवाणी व फौजदारी न्यायालयात खटला सुरू होण्याच्या अगोदरच त्या गुन्हेगारांवर कारवाई यात करता येईल. फरार आर्थिक गुन्हेगार विधेयक २०१८ हे १२ मार्च रोजी लोकसभेत सादर करण्यात आले असून त्याच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, भारतातील कायदेशीर प्रक्रियेचा मारा टाळण्यासाठी पळून जाणाऱ्या आर्थिक गुन्हेगारांना अटकाव करण्यासाठी भारतीय कायदेशीर प्रक्रियेचे पावित्र्य राखण्यासाठी हे विधेयक आहे.

**विधेयक काय आहे.**

ज्या आर्थिक गुन्हेगारांनी १०० कोटी किंवा त्यापेक्षा अधिक रकमेचे घोटाळे केले आहेत ते या नवीन विधेयकाच्या कक्षेत येतात. हे विधेयक कायद्याचे राज्य पुन्हा प्रस्थापित करून आर्थिक गुन्हेगारांना भारतात परत आणण्यास भाग पाडणारे आहे. यात आर्थिक गुन्हेगारांची मालमत्ता जप्त करण्याची तरतूद आहे. त्यातून फरार गुन्हेगारांकडून मालमत्ता विकून वसुली करता येईल. सदर गुन्हेगार जर फरार घोषित करण्यापूर्वी भारतात परत आला तर त्याला दिलासा देण्यात येईल त्यासाठी तो संबंधित न्यायालयात उपस्थित झाला तर संबंधित कायद्याखाली त्याच्याविरोधात होणारी कारवाई टळू शकेल. हे विधेयक विचारपूर्वक केले असून वकीलामार्फत सुनावणी करून गुन्हेगारांना उत्तर देण्यास वेळ दिला जाईल, भारत किंवा परदेशात असतानाही त्या व्यक्तीला नोटीस दिली असता त्याला उच्च न्यायालयात अपील करण्याची संधी राहील. कायद्याच्या चौकटीत राहून गुन्हेगाराची मालमत्ता विकून पैसे वसूल करण्यासाठी प्रशासक नेमता येईल. काळा पैसा प्रतिबंधक कायदा , पुरावा कायदा व भादंवि नुसार विचार करता हे विधेयक त्याला पूरक आहे.

**नवीन विधेयकातील तरतुदीनुसार आर्थिक गुन्हे करून पळून जाणाऱ्या गुन्हेगारांना ते दोषी न ठरताही त्यांची भ्रष्टाचाराने मिळवलेली मालमत्ता जप्त करण्यात येऊ शकेल. ही संयुक्त राष्ट्रांच्या जाहीरनाम्यात बसणारी तरतूद आहे. हे विधेयक कायदेशीर कारवाईपासून पळ काढणाऱ्या आर्थिक गुन्हेगारांना लक्ष्य करणारे आहे. दिवाणी व फौजदारी न्यायालयात खटला सुरू होण्याच्या अगोदरच त्या गुन्हेगारांवर कारवाई यात करता येईल.**

फरारी आर्थिक गुन्हेगाराची व्याख्या- या विधेयकानुसार फरारी आर्थिक गुन्हेगार म्हणजे अशी व्यक्ती जिच्यावर संबंधित आर्थिक गुन्हयात वॉरंट भारतातील न्यायालयाकडून बजावण्यात आलेले असेल व ती व्यक्ती नंतर गुन्हेगारी खटल्याला तोंड द्यावे लागू नये म्हणून भारतातून परदेशात निघून गेली असेल व गुन्हेगारी खटल्यास सामोरे जाण्यासाठी भारतात परत येण्यास नकार देत असेल.

अंमलबजावणी- पीएमएलए कायद्यानुसार संचालक म्हणजे या कायद्याच्या कलम ४९ (१) अन्वये नेमलेला संचालक व कलम ४९(१) अन्वये नेमलेला उपसंचालक असा अर्थ आहे. संचालक किंवा उपसंचालक हे अधिकारी पीएमएलए कायदा २००२ अनुसार विशेष न्यायालयात संबंधित व्यक्तीला फरारी आर्थिक गुन्हेगार जाहीर करण्यासाठी अर्ज करू शकतील. या अर्जात खालील गोष्टी असणे आवश्यक आहे.

१) संबंधित व्यक्ती फरारी आर्थिक गुन्हेगार असण्याची कारणे

२) त्याच्या ठावठिकाण्याबाबत माहिती

३) ज्या मालमत्तांच्या जप्तीची मागणी केली त्यांची यादी

४) बेनामी किंवा परदेशातील ज्या मालमत्तांच्या जप्तीची मागणी केली त्याची यादी

५) संबंधित मालमत्तांमध्ये हितसंबंध असलेल्या व्यक्तींची यादी ( सदर मालमत्तेवर दावा सांगणाऱ्या व्यक्ती)

या तपशीलासह मिळालेल्या अर्जावर विशेष न्यायालय विधेयकातील कलम दहा नुसार संबंधित व्यक्तीने विशिष्ट ठिकाणी नोटीस दिल्यानंतर सहा आठवड्यात उपस्थित राहण्याचे समन्स जारी करील. जर ती व्यक्ती त्यावेळेत त्या ठिकाणी उपस्थित राहिली नाही तर तिला फरारी आर्थिक गुन्हेगार जाहीर केले जाईल व तिच्या मालमत्तेची जप्ती

करण्यात येईल.जर ती व्यक्ती ठराविक वेळेत, ठराविक ठिकाणी न्यायालयात उपस्थित राहिली तर विधेयकातील तरतुदीनुसार खटल्याची कारवाई करण्यात येणार नाही.

मालमत्तेवर टाच व जप्ती- संचालक किंवा उपसंचालक पदावर नेमलेली व्यक्ती अर्जात उल्लेख केलेली मालमत्ता न्यायालयाच्या लेखी आदेशाने जप्त करू शकते.

हंगामी जप्ती- अर्जात उल्लेख केला नसेल तरी संचालक किंवा उपसंचालक पदावरील व्यक्ती कलम ४ अन्वये मालमत्ता तात्पुरती जप्त करू शकतात. सदर मालमत्ता गुन्ह्यातून मिळालेल्या पैशातून खरेदी केली आहे हे दाखवणारी कारणे त्यात असू शकतात. अर्थात ती व्यक्ती फरारी आर्थिक गुन्हेगार असते. तात्पुरत्या जप्तीनंतर संचालक किंवा उपसंचालकाने न्यायालयात त्याबाबत अर्ज करणे आवश्यक असते. न्यायालयाने मुदतवाढ दिली नाही तरी ही तात्पुरती जप्ती १८० दिवस राहू शकते. जर सरतेशेवटी संबंधित व्यक्ती फरारी आर्थिक गुन्हेगार ठरली नाही तर मालमत्ता जप्तीतून मुक्त करण्यात येईल.

**संचालकांचे अधिकार**

संचालक किंवा त्याने अधिकार दिलेली दुसरी व्यक्ती संबंधित व्यक्तीला फरारी आर्थिक गुन्हेगार ठरवू शकते. अर्थात त्यासाठी त्याच्या हातात कागदोपत्री सबळ पुरावे असणे आवश्यक आहे. त्याला ठरवून दिलेल्या क्षेत्रातील कुठल्याही भागात तो अधिकारी घुसून मालमत्तेची तपासणी करू शकतो. त्यानंतर मालक, कर्मचारी किंवा इतर व्यक्तींकडे नोंदी, पुरावे तपासणीसाठी उपलब्ध करून देण्यासाठी मागू शकतो. गुन्हयातून निर्माण झालेली मालमत्ता व त्याचे आर्थिक स्त्रोत तपासण्याचा त्याला अधिकार असेल. संचालक किंवा त्याने अधिकार दिलेली व्यक्ती तपासलेल्या नोंदीवर खुणा करू शकतात., तसेच मालमत्तेसंबंधात कुणाचेही जबाब घेऊ शकतात.

**आर्थिक फरारी गुन्हेगाराबाबत घोषणा**

अर्जाच्या सुनावणीनंतर न्यायालय संबंधित व्यक्तीला फरारी आर्थिक गुन्हेगार घोषित करू शकते. त्याची मालमत्ता, भारतातील व परदेशातील बेनामी मालमत्ता जप्त करता येतील. त्या काळात मालमत्तेचे सर्व हक्क हे केंद्र सरकारच्या हातात असतील व त्यावर कुठला बोजा नसेल.

प्रशासक - केंद्र सरकार त्यांच्या सह सचिव दर्जाच्या खालच्या नसलेल्या अधिकाऱ्यांना प्रशासक म्हणून नेमू शकते. कलम १५ नुसार ही उपाययोजना करता येते. प्रशासक मालमत्ता स्वीकारणे व त्याचे व्यवस्थापन करणे ही कामे करतो. त्याबाबत तसा आदेश आधी निघणे आवश्यक असते. केंद्राच्या ताब्यातील मालमत्ता तो निकाली काढू शकतो त्यासाठी आदेशाची प्रत असावी लागते. आदेशाच्या ९० दिवसात कुठल्याही मालमत्तेची विल्हेवाट लावता येत नाही.

अपील – विशेष न्यायालयाच्या निकालावर उच्च न्यायालयात अपील करता येते. निकालानंतर तीस दिवसात अपील करणे आवश्यक असून उच्च न्यायालय त्याची सुनावणी ठराविक ३० दिवसांच्या मुदतीनंतर करू शकते पण त्यात अपीलावर लगेच सुनावणी न घेण्याचे कारण न्यायालयाला द्यावे लागेल.

निष्कर्ष- केंद्र सरकारने आणलेले हे नवे विधेयक फरारी आर्थिक गुन्हेगारांवर वचक ठेवण्यास प्रभावी ठरू शकते. त्यातून मालमत्ता विकून वसुली करता येणार असल्याने अर्थव्यवस्थेला बसलेला फटका कमी होईल. आर्थिक गुन्हे करून पळून जाण्याचा विचार करणाऱ्यांना त्यामुळे वचक बसेल.

■■■

*लेखक दक्षिण भारत प्रादेशिक परिषद - एसआयारसीचे माजीप्रमुख आहेत. ही संस्था इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊटंटस ऑफ इंडियाचा भाग आहे.*

*ई मेल:* victorgrace321@gmail.com




विकास समर्पित मासिक

**योजना**

नियमित वाचा, वर्गणीदार व्हा.

# उडान योजनेचे यश व पुढील आव्हाने

-सिंधू भट्टाचार्य



**'उडे देश का आम नागरिक' या ब्रीदवाक्यातच उडान योजनेचे उद्दिष्ट सामावलेले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २७ एप्रिल, २०१७ रोजी शिमला- दिल्ली विमान प्रवासाने उडान योजनेचा शुभारंभ केला. याच दिवशी पंतप्रधानांनी नांदेड-हैद्राबाद आणि कडपा- हैद्राबाद दरम्यानच्या विमान उड्डानांना हिरवा झेंडा दाखवला. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात लहान शहरांतील ३१ तर दुसऱ्या टप्प्यात अशी अजून २९ विमानतळे सक्रिय करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते.**

भारतातल्या हवाई वाहतूक सेवेचे एक वैशिष्ट्य म्हणजे, येथील अनेक लहान मोठ्या शहरी भागात उत्तम हवाई वाहतूक सेवा देण्याची क्षमता असलेली परंतु विविध कारणांमुळे वापरात नसलेली शेकडो विमानतळे अस्तित्वात आहेत. अधिकृत सरकारी आकडेवारीनुसार गेल्या वर्षभरात देशातील ४०० च्या आसपास हवाईपट्ट्या व विमानतळांपैकी फक्त ७५ विमानतळांचाच हवाई वाहतूकीसाठी वापर झाला. पहिल्या व दुसऱ्या विश्वयुध्दांचा वेळी देशाच्या अनेक भागात लहान मोठी विमानतळे उभारण्यात आली होती. युध्दांनंतर मात्र यापैकी बऱ्याचशा विमानतळांचा वापरच झाला नाही. यापैकी काही विमानतळांवर प्राथमिक स्तरावरच्या पायाभूत सोयी असूनही आजच्या काळाच्या गरजेनुसार चांगली सेवा कार्यान्वित करण्यासाठी या विमानतळांचा कायापालट होणे आवश्यक आहे व त्याकरिता बराच गुंतवणूक निधी लागेल. तर काही विमानतळे व्यावसायिक व्यावहारिकतेशिवाय केवळ राजकिय हेतूंतून तात्पुरत्या सोयींसाठी बांधण्यात आली असून या विमानतळांवरून फारतर एक दोनदाच विमानांचे उड्डान झाले असावे. आजच्या घडीला भारत जगातील सर्वाधिक वेगाने विस्तारत जाणारे हवाई वाहतूकीचे केंद्र मानण्यात येते. असे असूनही भारतातील हवाई वाहतूक सेवा ही प्रामुख्याने दिल्ली, मुंबई, बंगळूरू, चेन्नई, कोलकत्ता व हैद्राबाद या महानगरांत केंद्रित झालेली दिसून येते. भारतीय विमानपत्तन प्राधिकरण अर्थात Airports Authority of India ने दिलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार देशातील एकूण हवाई दळणवळणापैकी सुमारे ६० टक्के हवाई वाहतूक एकूण प्रवासी संख्येच्या दोन तृतीआंश प्रवासी देशातल्या महानगरांतील विमानतळांचाच वापर करतात परिणामी या काही मोजक्या विमानतळांवर वाहतूकीचा अधिभार पडतो. देशातील हवाई वाहतूक सेवेची जलद व अधिक कार्यक्षम दर्जात्मकता टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने धोरणात्मक पावले उचलताना सरकार मोठ्या शहरांतील विमानतळांवरील गजबजाट कमी करण्याबरोबरच लहान शहरांतील ओस पडलेली विमानतळेही हवाई वाहतूकीसाठी वारंवार वापरली जातील यासाठी प्रयत्नशील आहे. तसेच लहान शहरांपासून मोठ्या शहरांना जोडणाऱ्या विमानप्रवासांचे दर परवडण्यासारखे ठेवण्याचे निश्चित करण्यात आले आहे. या प्रभावशाली धोरणात्मक निर्णयामुळे लहान शहरांतील सर्वसामान्य नोकरदार, मध्यम व लघु उद्योजकांना त्यांच्या शहरांतील विमान वाहतूकीचा वापर करण्यास सोपे होऊन देशांतर्गत विमान वाहतूकीला प्रोत्साहन मिळत आहे.

गेल्या वर्षी केंद्र सरकारने उडान योजना कार्यान्वित केल्यापासून

देशातील लहान शहरे विशेषत: ईशान्य भारतातील दुर्गम शहरांपर्यंत विमान वाहतूक पुनरूज्जिवित होण्यास मदत झाली आहे. 'उडे देश का आम नागरिक', या ब्रीदवाक्यातच उडान योजनेचे उद्दिष्ट सामावलेले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २७ एप्रिल, २०१७ रोजी शिमला- दिल्ली विमान प्रवासाने उडान योजनेचा शुभारंभ केला. याच दिवशी पंतप्रधानांनी नांदेड-हैद्राबाद आणि कडपा-हैद्राबाद दरम्यानच्या विमान उड्डानांना हिरवा झेंडा दाखवला. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात लहान शहरांतील ३१ तर दुसऱ्या टप्प्यात अशी अजून २९ विमानतळे सक्रिय करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते.

उडान योजनेच्या आतापर्यंतच्या उपलब्धी बाबत दिल्ली- शिमला उड्डाणसेवेचे उदाहरण देता येईल. शिमल्याहून सुरूवातीला आठवड्यातील पाच दिवस विमान उड्डाण सेवा चालववण्याचे निश्चित करण्यात आले होते. यातही दिल्लीहून शिमल्यासाठी ३५ प्रवासी जागा उपलब्ध होत्या तर शिमला विमानतळावरील निर्बंधांमुळे परतीच्या प्रवासात केवळ १५ जागाच उपलब्ध होत्या. वाजवी तिकिट दर व कार्यक्षम वाहतूक सेवा यांमुळे २०१२ पासून वापरात नसलेले शिमला विमानतळ पुन्हा प्रवाश्यांनी गजबजू लागले असल्याचे चित्र उडान योजनेमुळेच प्रत्यक्षात दिसू लागले आहे. एकेकाळपर्यंत उड्डाणासाठी सुकर नसलेला हा विमानप्रवास नव्याने सुरू करण्यासाठी अचानक हवाई परिवहन कंपन्या कशा पुढे आल्या या प्रश्नाचे उत्तरही उडान योजनेतच सामावले आहे. उडान योजनेअंतर्गत केंद्र सरकार व राज्य सरकार आधी निश्चित केलेल्या करारानुसार या योजनेसाठी व्यवहार्यता तफावत निधी अर्थात Viability Gap Funding- व्हिजीएफ.अनुदान देऊ करण्यास कटीबध्द आहे.

**भारतातील हवाई वाहतूक सेवा ही प्रामुख्याने दिल्ली, मुंबई, बंगळूरू, चेन्नई, कोलकत्ता व हैद्राबाद या महानगरांत केंद्रित झालेली दिसून येते. भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी देशांतर्गत विमान वाहतूकीची बाजारपेठ मानली जाते. हवाईवाहतूकीची ही उच्च वाढ कायम राहण्यासाठी हवाई वाहतूकीने देशातील सर्व प्रदेश जोडले जाणे आवश्यक आहे. त्याबरोबरच महानगरांतील विमानतळाची क्षमता वाढविणे देखील महत्वाचे आहे, परंतु हवाई वाहतूकीच्या वाढीसाठी, प्रांतीय जोडणी विकसित करणे अधिक आवश्यक आहे.**

या उड्डाणाबाबत उडान योजना राबवताना सुरूवातीला प्रती प्रवासी अनुदानाची रक्कम साडे तीन हजार रूपये होती. व्हिजीएफ करारानुसार, प्रत्येक उड्डाणाच्या एकूण प्रवासी जागांपैकी ५० टक्के जागासाठी अनुदान, एअरलाइन्ससाठी तीन वर्षांसाठी विशेष मार्ग एकाधिकार आणि लँडिंग एअरपोर्ट्सवर इतर सवलती (स्वस्त ईंधन, कोणतेही विमानतळ शुल्क इत्यादि) साठी सूट इ. देण्यात आल्या. याबदल्यात विमानचालक कंपनीने उडान च्या प्रवाश्यांकडून प्रतीतास २५०० रूपये असे प्रवासीभाडे प्रत्येकी ५०० किमीच्या प्रवासासाठी आकारावे असे निश्चित करण्यात आले.

व्हीजीएफला कराराअंतर्गत वित्तपुरवठा कसा केला जातो या प्रश्नाचे उत्तर असे की, महानगरांतून येणाऱ्या विमानांना प्रत्येक उड्डाणामागे ५००० रूपये सरकारला द्यावे लागतात, जेणेकडून उडान योजनेचे परस्पर अनुदानित राहतील. परंतु हा शुल्कदर केवळ नफादायक मार्गांवरच लागू आहे. उडान योजनेच्या पहिल्या वर्षी या शुल्कप्रणालीतून ३०० कोटी रूपये वसूली प्राप्त झाली. यामध्ये राज्य सरकार व केंद्र सरकार प्रत्येकी रूपये ६० कोटी व रूपये २०० कोटी एवढे अतिरिक्त शुल्क जोडू शकले. अशा प्रकारे उडान योजनेच्या शुभारंभाच्या वर्षी ५६० कोटी रूपये एवढी रक्कम व्हिजीएफद्वारे जमा झाली.

उडान योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीचे आणखी एक उदाहरण म्हणजे ही योजना लागू करण्याच्या दिवसापासून वर्षभराच्या काळात शिमला-दिल्ली मार्गावरील विमान उड्डाणात एकूण १२ हजार प्रवाश्यांनी प्रवास केला. यामध्ये प्रती उड्डाणच्या उपलब्ध प्रवासी जागांपैकी ९० टक्के जागा भरलेल्या असायच्या. तसेच एकूण प्रवासी जागांपैकी उडान याजनेअंतर्गत प्रवास भाडे सरासरी १९७० रूपये प्रती व्यक्ती तर या योजनेत नसलेल्या प्रवासी जागांचे भाडे सरासरी ४००० रूपये होते. उडान योजनेचे महत्व अधोरेखित करणारे अजून एक उदाहरण म्हणजे सिक्कीमच्या पूर्वेकडील भागात असलेले राजधानी गंगटोक पासून ३५ किमीवर वसलेले पाकयोंग हे शहर लवकरच हवाई वाहतूकीने जोडले जाणार आहे. स्पाईसजेट ही विमान परिवहन सेवा देणारी कंपनी लवकरच पेकयोंग-दिल्ली या मार्गावर विमानसेवा सुरू करणार आहे. याव्यतिरिक्त पेकयोंग- गुवाहाटी, पेकयोंग-कोलकत्ता या मार्गांवरही विमान सेवा सुरू करण्याची योजना लवकरच अंमलात आणली जाणार आहे. याशिवाय उडान योजनेमुळे पुनरूज्जिवित झालेल्या विमानतळांमध्ये पंजाबमधील अदमपूर, भटिंडा व पठाणकोट, राजस्थानातील बिकानेर, जैसलमेर गुजरातमधील भावनगर, जामनगर, व मुद्रा यांचा समावेश आहे. तसेच काही विमानतळे जिथून सध्या विमान उड्डाण होतात परंतु सेवा मर्यादित स्वरूपात आहेत,

त्यांनाही उडान योजनेचा लाभ मिळतो आहे.

भारतीय विमानतळ प्राधिकरणच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की केंद्राकडून यूडीएएन योजनेच्या अंतर्गत ओस पडलेल्या विमानतळांसाठी ४५०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. वर्षानुवर्षे हवाई वाहतूकीसाठी वापर न झालेल्या विमानतळांना कार्यान्वित करण्याची गरज लक्षात घेऊन त्यानुसार नागरी विमान महासंचलनालयाकडून अर्थात डीजीसीए कडून उड्डाण परवाना मिळवावा लागेल. त्यानंतरच अशा ठिकाणी हवाई वाहतूक नव्याने सुरू करता येईल. छत्तीसगडमधील जगदलपूर या बरीच वर्ष वापरात नसलेल्या विमानतळाला नुकताच विमान उड्डाणाचा परवाना मिळाला असून लवकरच येथून हवाई वाहतूक सुरू होईल. याप्रमाणे, छत्तीसगढमधील अंबिकापूर परवाना मिळण्याच्या प्रतिक्षेत आहे तर बिलासपूर येथे विमानतळावरील कार्यान्वयनासाठी काम चालू आहे. ओडिशामध्ये, उक्केला आणि जेयपूर येथून उड्डाण कवकरच सुरू होतील तर झारसुगुडापासून विमानप्रवास आधीच सुरू झाले आहेत.

भारत हा जगातील सर्वात वेगाने वाढणारी देशांतर्गत विमान वाहतूकीची बाजारपेठ मानली जाते आणि हवाईवाहतूकीची ही उच्च वाढ कायम राहण्यासाठी हवाई वाहतूकीने देशातील सर्व प्रदेश जोडले जाणे आवश्यक आहे. त्याबरोबरच महानगरांवरील विमानतळाची क्षमता वाढविणे देखील महत्वाचे आहे, परंतु हवाई वाहतूकीच्या वाढीसाठी, प्रांतीय जोडणी विकसित करणे अधिक आवश्यक आहे. फक्त प्रस्थापित विमानचालक कंपन्यांच नव्हे तर उडान योजनेअंतर्गत व्हीजीएफने एअर डेक्कन आणि एअर ओडिशासारख्या नवीन विमान परिवहक कंपन्यांनाही आकर्षित केले आहे. पहिल्या टप्प्यात या विमान कंपन्यांनी प्रांतीय जोडणीत मोठ्या प्रमाणात वाढ केली. आता, इंडिगो, स्पाईसजेट आणि जेट एअरवेज सारख्या मोठ्या विमानचालक कंपन्याही उडान योजनेत सामील होण्यास उत्सुक आहेत.

परंतु, कोणत्याही महत्वाकांक्षी

---

**देशातील एकूण हवाई दळणवळणापैकी सुमारे ६० टक्के हवाई वाहतूक आणि एकूण प्रवासी संख्येच्या दोन तृतीआंश प्रवासी देशातल्या महानगरांतील विमानतळांचाच वापर करतात परिणामी या काही मोजक्या विमानतळांवर वाहतूकीचा अधिभार पडतो. देशातील हवाई वाहतूक सेवेची जलद व अधिक कार्यक्षम दर्जात्मकता टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने धोरणात्मक पावले उचलताना सरकार मोठ्या शहरांतील विमानतळांवरील गजबजाट कमी करण्याबरोबरच लहान शहरांतील ओस पडलेली विमानतळेही हवाई वाहतूकीसाठी वारंवार वापरली जातील यासाठी प्रयत्नशील आहे. तसेच लहान शहरांपासून मोठ्या शहरांना जोडणाऱ्या विमानप्रवासांचे दर परवडण्यासारखे ठेवण्याचे निश्चित करण्यात आले आहे.**

---

वाहतूक योजनेप्रमाणेच उडाणच्या बाबतीतही बऱ्याच बाबी योजनेत समाविष्ट करून घेणे अजूनही बाकी आहे. देशातील सर्वच अनुषंगित विमानतळे जी कार्यान्वित करण्यास परिकल्पित करण्यात आले होती त्यांचे अजूनही पुनरुज्जीवन झालेले नाही, देशातील सर्व विमानमार्ग (नवीन आणि प्रस्थापित) ज्यांच्यासाठी बोली लागली आहेत अजून सुरु झालेले नाहीत आणि उडान योजनेअंतर्गत अद्याप हेलिकॉप्टर सेवाही सुरू झालेली नाही.

उडान योजनेअंतर्गत पुनरूज्जिवित काही विमानमार्गांवर याआधी विमानवाहतूकीच्या फार फेऱ्या झालेल्या नाहीत. तसेच या मार्गांना निधीची कमतरता भासते तसेच दूरस्थ स्थानांपासून प्रमुख शहरांना जोडल्या जाण्याच्या बाबतीत आर्थिक व दळणवळणीय समस्यांनाही तोंड द्यावे लागते. बोलीच्या पहिल्या फेरीनंतर पाच विमान वाहक कंपन्यांना १२८ विमानमार्ग वाहतूकीसाठी उपलब्ध करून देण्यात आले, जे सप्टेंबर २०१७ च्या अखेरीस वाहतूकीसाठी खुले होणार होते. एक वर्षानंतर, यापैकी निम्म्या मार्गांवर विमान वाहतूक कार्यान्वित झालेली आहे. प्रस्थापित विमान कंपन्या जसे एलायन्स एअर, स्पाइसजेट आणि ट्रूजेट यांनी त्यांना दिलेल्या बहुतेक किंवा सर्व मार्गांवर सेवा सुरू करण्यात यशस्वी ठरले आहेत. परंतु पहिल्याच फेरीत एकूण विमानमार्गांच्या तीन-चतुर्थांश विमानमार्ग मिळालेल्या एअर ओडिशा आणि एअर डेक्कनसारख्या लहान कंपन्या केवळ १५ टक्के मार्गांवरच सेवा सुरू करू शकल्या आहेत. एअर ओडिसाने प्राप्त झालेल्या एकूण प्रवासी मार्गांपैकी ५० मार्गांवर आपली सेवा सुरू केली आहे तर एअर डेक्कनने परवाना मिळालेल्या ३४ पैकी १० मार्गिकांवर उड्डाणसेवा देण्यास प्रारंभ केला आहे. जेट जुनच्या अखेरीपासून उडान सेवा सुरू करेल अशी अपेक्षा आहे तर इंडिगो आणि स्पाइसजेटची सेवा जुलैमध्ये सुरू होण्याची शक्यता आहे.

तसं पाहता, उडान अंतर्गत विमान सेवेचा दर्जा हा उल्लेखनीय नाही. नागरी विमान प्राधिकरणाच्या एप्रिल महिन्यातील आकडेवारीनुसार एअर ओडिशा आणि एअर डेक्कनच्या उडान योजनेअंतर्गतच्या विमानसेवा एका महिन्यात त्यांच्या विमानांवर केवळ एक तृतीयांश जागा भरू शकले तसेच रद्द

केलेल्या तिकिटांचे प्रमाणही सर्वाधिक होते. स्वाभाविकच, प्रवाश्यांच्या तक्रारींचे प्रमाणही जास्त होते. त्यामुळे या नवीन विमानसेवा पायाभूत सुविधांच्या समस्यांशी झगडात आहेत. त्यामुळे या नव्या कंपन्यांना सुरळीत होण्यासाठी आणखी काही काळ जावा लागेल. उडान योजनेतील आणखी एक कमतरता म्हणजे या योजनेअंतर्गत अद्याप न सुरू होऊ शकलेली हेलिकॉप्टर सेवा. पहिल्या फेरित अनुदान निधीच्या कमतरतेमुळे एकाही कंपने ही सेवा देण्याची बोली लावली नव्हती. तर दुस-या फेरीत अजूनही ही सेवा देण्याचे परिक्षण सुरू आहे. आतापर्यंत देशात कुठेही नियोजित हेलिकॉप्टर सेवा उपलब्ध नसल्याने आताची परिस्थिती लक्षात घेउनच हेलिकॉप्टर सेवा सुरू करण्याबाबत नवे नियम तयार करावे लागतील.

अंतिम मुद्दा असा की, ज्या विमान परिवहन कंपन्यांनी उडान योजनेत भाग घेतला आहे त्यांना तीन वर्षांच्या कालावधीनंतर जेव्हा व्हिजीएफ निधी करार संपुष्टात आल्यानंतर सवलतीच्या दरात विमानसेवा देणे परवडणारे ठरणार नाही कारण आंतरराष्ट्रीय बाजारात विमान चालवायला लागणाऱ्या ईंधन तेलाचे दर वाढत आहेत. उडान योजना सर्वसामान्यांच्या पसंतीस पडावी व अधिकाधिक प्रवासी या योजनेत जोडले जावे, यासाठी सरकारनेही विमान परिवहन कंपनीच्या सेवेचा दर्जा पाहून त्यांच्याशी बोलणी करून काही मार्गांवरील उडान फेऱ्यांसाठी निश्चित करण्यात आलेल्या व्हिजीएफ सवलत निधीची तीन वर्षांची अट शिथिल करण्यास सुरूवात केली आहे.

■■■

*लेखिका गेल्या २४ वर्षांपासून व्यापार, नागरी विमान वाहतूक, रेल्वे व वाहने, दूरसंचार व किरकोळ बाजार इ. बाबतच्या केंद्र सरकारच्या धोरणांवर पत्रकारिता करित आहेत. देशातील नावाजलेल्या इंग्रजी वृत्तपत्रांत या विषयांवर स्तंभलेखन, सल्लागार संपादिका इ. बरोबरच आकाशवाणीच्या विविध चर्चात्मक कार्यक्रमांत यांचा तज्ञ म्हणून नेहमी सहभाग असतो.-*

*ई मेल:* sinjain@gmail.com





**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

**एका पुस्तकाची किरकोळ विक्री**
**किंमत ३० रुपये प्रत्येकी**

**चार पुस्तकांचा संच**
**१०० रु.**

# New Arrivals




Visit our
**Book Gallery**
at
Soochna Bhawan,
CGO Complex
Lodhi Road,
New Delhi-110003




**To buy online visit: www.bharatkosh.gov.in**

For placing orders, please contact: Ph : 011-24367260, 24365609, e-mail: businesswng@gmail.com

**Publications Division**

**Ministry of Information & Broadcasting, Government of India**

Soochna Bhawan, CGO Complex, Lodhi Road, New Delhi-110003

**website: www.publicationsdivision.nic.in**

@ DPD_India

www.facebook.com/publicationsdivision
www.facebook.com/yojanaJournal

# भगीरथ परिवारातील यशवंत



## निरंजन दिवाकर
**UPSC 2018 (IFS)**
**All India Rank 3**

## भुवनेश्वर पाटील
**UPSC 2018**
**All India Rank 59**





## किरण सावंदकर
**UPSC 2018**
**All India Rank 459**

**UPSC** Foundation Batch 2018-19 | Batch Starts 3 July 2018

**Bhagirath IAS Academy**
UPSC • MPSC


ऑफीस १ : मंत्री हाईटस्, २ रा. मजला, शनिवार पेठ, पुणे-३०
**Ph.: 020-65233450 | 7378406920**
ऑफीस २ : २ रा मजला केसरीवाडा, नारायणपेठ, पुणे -३०
**Ph.: 020-64013450 | 9970298197**
**Web:**www.bhagirathacademy.co.in
**E-mail:** bhagirathacademypune@gmail.com
**Facebook:** Bhagirath IAS Academy

**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No. NMB/137/2016-18

Published Date: 12th **July,** 2018
Date of Posting : 16th **July,** 2018

UPSC / MPSC व इतर सर्व स्पर्धा परीक्षांच्या नवीन पुस्तकांच्या माहितीसाठी व वेगवेगळ्या सवलतींसाठी आजच आपल्या स्मार्ट फोन मध्ये Teligram App डाऊनलोड करून आमचा Teligram Channel Join करा.

**Link - @Ksagarfocus**




पृष्ठे ३६० ₹ २९५

**के'सागरीय लेखणी**

- जिला आहे ३७ वर्षांचा प्रदीर्घ लेखनानुभव
- जिने घडविलेत १९८६ पासून हजारो अधिकारी.
- जिने प्रत्येकवेळी घेतलाय बदललेल्या अभ्यासक्रमाचा यशस्वी परामर्श

**क्लास कोणताही लावा, यश मिळवायचे असेल तर पुस्तके अभ्यासा के'सागरचीच!**




| | | |
|---|---|---|
| पृष्ठे १०४८ ₹ ५९५ | पृष्ठे २३२ ₹ २०० | पृष्ठे ३६० ₹ २७५ |
| पृष्ठे ४७२ ₹ ४२५ | पृष्ठे ४६४ ₹ ३७५ | पृष्ठे १५२ ₹ १५० |
| पृष्ठे २८० ₹ २६५ | पृष्ठे ५२० ₹ ३९५ | पृष्ठे ३३६ ₹ २८५ |

go online (free Shipping*) www.ksagar.com
www.facebook.com/ksagarbooks

स्पर्धा पुस्तकांसंदर्भात योग्य मार्गदर्शन करू शकणारे अभ्यासू विक्रेते
सर्व स्पर्धा परीक्षांची सर्व प्रकाशनांची
सर्व पुस्तके असणारी महाराष्ट्रातील तीन स्वतंत्र दालने-

K'Sagar बुक सेंटर
K'Sagar's हाऊस ऑफ बुक्स

अप्पा बळवंत चौक, पुणे
८०८७७२२२७७, ९५४५५६७८६२/६३,
(०२०) २४४५३०६५/२४४८३१६६

Editor - **Umesh Ujgare**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Director General, on behalf of Publication Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.
Posted at - Mumbai - Patrika Channel Sorting Office,GPO, Mumbai - 400 001.